सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | गुरुवार, २२ मे २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक १९३ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# सोलापुरात कोसळधार घरांमध्ये पाणी, जनजीवन विस्कळीत

- मिलिंद नगरात एक घर पडले
- सखल भागात पाणी साचल्याने नागरिकांचे रात्रभर जागरण
- मुसळधार पावसामुळे शहरातील रस्ते झाले जलमय









**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ मे-**

सोलापूर शहरात आज सायंकाळपासूनच अवकाळी मुसळधार पाऊस झाला. या पावसामुळे शहरातील विविध भागातील अनेक घरांमध्ये पाणी शिरले. मिलिंद नगरात एक घर पडल्याची घटना घडली. शहरातील रस्त्यांना नद्याच्या स्वरूप आल्याचे चित्र पाहायला मिळाले. ड्रेनेज लाईन तुंबल्याने उलट पाणी घरात साचल्याने अनेकांना रात्र जागून काढावी लागली. सोलापूर शहरात सायंकाळी साडेचार पासूनच पाऊस सुरू झाला. बघता बघता मुसळधार पाऊस झाला.

विजेचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाल्याने जनजीवन विस्कळीत झाले. शहरातील अवंती नगर, कुंभार वेस, सिव्हिल चौक, हरीभाई देवकरण प्रशाला, रामलाल चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, निराळे वस्ती रोड, सम्राट चौक, आसरा रोड, अवंती नगर ते स्पर्श हॉस्पिटल, बलदवा हॉस्पिटल जवळ यासह विविध ठिकाणी रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. मंगळवार बाजार समोर, कुंभार वेस येथील नालाही तुडुंब भरला असल्याचे दिसून आले.यामुळे जनजीवन विस्कळीत झाले. सायंकाळी चाकरमान्यांची चांगलीच धांदल उडाली. प्रभाग क्रमांक चार मधील श्रीराम नगर, हंडे प्लॉट, बुधवार पेठ परिसरातील मिलिंद नगर, जय मल्हार चौक, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे नगर, सम्राट चौक, गणेश नगर बाळे, अवंती नगर , कमला नगर , भवानी पेठ परिसर, घोंगडे वस्ती, दमानी नगर यासह अशा विविध भागात घराघरांमध्ये पाणी शिरले. यामुळे घरातील साहित्याचे मोठे नुकसान झाले. घरातील पाणी उपसण्याचे काम रात्री लोकांना करावे लागले. काहींना रात्र जागून काढावी लागली. बुधवार पेठ येथील मिलिंद नगरात पावसामुळे एक घर पडले. कोणतीही जीवित हानी झाली नाही. काही घरांमध्ये पाणी शिरले होते. महानगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे या भागातल्या नागरिकांना त्रास सहन करावा लागला असल्याचा आरोप माजी गटनेते आनंद चंदनशिवे यांनी केला आहे. शहरातील विविध ठिकाणी रस्त्यांना नद्यांचे स्वरूप आल्याचे दिसून आले होते. यामुळे वाहतूक करणे अडचणीचे ठरले. काही ठिकाणी रस्त्यावर साचलेल्या पाण्यात रिक्षा व दुचाकी वाहने बंद पडल्याचे पाहायला मिळाले.

### महापालिकेने मान्सून पूर्व कामे नेटकी करण्याची गरज

सोलापूर महापालिका प्रशासनाकडून मान्सून पूर्व कामे अद्याप पूर्ण झाले नसल्याचे दिसून येते. नाले, ड्रेनेज लाईन सफाई व्यवस्थित करण्याची आवश्यकता आहे.सकल भागात पाणी निचरा होण्याची व्यवस्था करण्याची गरज आहे. तातडीने यासंदर्भात कार्यवाही करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.



## विचारपुष्प



समर्पित मानसिकतेमुळे ध्येयनिष्ठ कार्यकर्त्याची आंतरिक शक्ती वेगळीच असते. अहंकाररहित समर्पण भावनेमुळे कार्यकर्त्यामध्ये एक प्रचंड मनोबल निर्माण होते. असे मनोबल राहिले तर शारीरिक शक्ती कमी असली तरी कार्यकर्ता प्रचंड कार्य करू शकतो.
- **दत्तोपंत ठेंगडी,**
भारतीय मजदूर संघ, भारतीय किसान संघ, स्वदेशी जागरण मंचाचे संस्थापक

## महत्त्वाचे

### वृद्धांना मिळणार दरमहा ३५०० रुपये पेन्शन

**भुवनेश्वर :** ओडिशा सरकारने या वर्षी जूनपासून ८० वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या आणि ८० टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या व्यक्तींना दरमहा ३,५०० रुपये वाढीव पेन्शन देण्याचा निर्णय घेतला आहे. अपंग व्यक्तींच्या सामाजिक सुरक्षा आणि सक्षमीकरण विभागाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, सरकारने त्यांच्या सामाजिक कल्याण योजनांअंतर्गत वाढीव पेन्शन मंजूर केले आहे. राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम आणि मधु बाबू पेन्शन योजनेच्या सर्व लाभार्थ्यांना आता ३,५०० रुपये वाढीव मासिक पेन्शन मिळेल. पूर्वीचे वेतन दरमहा १,५०० रुपये होते. मंगळवारी एसएसईपीडी विभागाने सर्व जिल्हा सामाजिक सुरक्षा अधिकाऱ्यांना उपजिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या पात्र लाभार्थ्यांच्या यादीच्या आधारे जूनपासून वाढीव पेन्शन लागू करण्याचे निर्देश दिले.

### चार दिवस शून्य सावलीचे!

**अकोला :** 'हा खेळ सावल्यांचा' असा एक बोलपट येऊन गेला. खगोलीय घटनेत ही घटना प्रत्यक्ष दरवर्षी घडते. याला 'शून्य सावली दिन' म्हणतात. त्याचा अनुभव अकोलेकरांना आता येणार आहे, अशी माहिती येथील खगोल अभ्यासक प्रभाकर दोड यांनी दिली आहे. सूर्य म करवृत्त ते कर्कवृत्त या भ्रमण कालावधीत जेव्हा नेमका आपल्या ठिकाणच्या अक्षवृत्ताशी समकोनीय स्थितीत येतो तेव्हा तेथे माध्यान्हाचे वेळी, नेहमी सोबतीला असणारी सावली अचानक आपली साथ सोडते. यालाच शून्य सावली दिवस म्हणून ओळखतात. पृथ्वीचा अक्ष तिच्या कक्षेशी २३.५ अंशांनी कलून फिरत असल्याने वर्षातील २१ मार्च आणि २२ सप्टेंबर या दोन विषुवदिनीच सूर्योदय निश्चित पूर्वेला होतो. पृथ्वी मध्याचे २७ अंशाच्या पट्ट्यात या खगोलीय घटनेचा आनंद घेता येतो; तो सर्वांनी घ्यावा, असे आवाहन खगोल निरीक्षक प्रभाकर दोड यांनी केले.

## अबुझमाडच्या जंगलात तुंबळ संघर्ष

# २७ नक्षलवादी ठार, बसवराजूचा समावेश?

◆ **नारायणपूर, २१ मे**

अबुझमाडचे घनदाट जंगल आणि इंद्रावती नॅशनल पार्कच्या भागात बुधवारी नक्षलवादी आणि पोलिस यांच्यात तुंबळ संघर्ष उडाला. यामध्ये २६ नक्षलवादी ठार तर कित्येक जखमी झाले. तसेच एक पोलिस जवान हुतात्मा झाला. मृतांमध्ये नक्षलवादी चळवळीचा कणा समजला जाणारा नंबाला केशव राव ऊर्फ बसवराजूचा समावेश असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अबुझमाडच्या जंगलाच्या एका विशिष्ट भागात प्रतिबंधित माओवादी संघटनेच्या सेंट्रल कमिटी आणि पॉलिट ब्युरोच्या वरिष्ठ सदस्यांसोबतच माड डिव्हिजन आणि पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मीचे सदस्य लपून बसल्याची



गुप्त माहिती मिळाली. माहितीच्या आधारे नारायणपूर, दंतेवाडा, बिजापूर आणि कोंडागाव जिल्ह्यांच्या जिल्हा राखीव सुरक्षा पथकांच्या जवानांनी मंगळवारपासून संयुक्तपणे अबुझमाडच्या जंगलात शोधमोहिम सुरू केली. यादरम्यान नक्षलवाद्यांनी सुरक्षा पथकाच्या दिशेने गोळीबार सुरू केला. हल्ला होणार हे गृहीत धरूनच जवानही सज्ज होते. त्यांनीही जोरदार प्रत्युत्तर दिले. बराचवेळ दोन्ही बाजूंनी तुफान गोळीबार सुरू होता. चकमकीत एका वरिष्ठ कमांडरसह २७ नक्षलवादी ठार झाले. घटनास्थळी मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा आढळून आला आहे. संघर्षात एक पोलिस जवान हुतात्मा झाला आहे.

छत्तीसगड आणि महाराष्ट्राच्या गडचिरोली जंगलातील घनदाट जंगलात असलेला अबुझमाडचा विशाल आणि विस्तीर्ण परिसर गेल्या कित्येक वर्षांपासून नक्षलवाद्यांचा बालेकिल्ला राहिला आहे. अबुझमाड म्हणजे अतिशय सुरक्षित आश्रयस्थान मानले जाते. या जंगलात पाय ठेवण्याचीही हिम्मत सुरक्षा जवानांची नव्हती. पण, भाजपा सरकारने २०२६ पर्यंत भारत नक्षलमुक्त करण्याचा निश्चय केला असून गेल्या वर्षभरात नक्षल्यांविरोधात मोठ्या मोहिमा आखण्यात आल्या होत्या. ◀(वृत्तसंस्था)



जिल्हा राखीव रक्षक दलाचे जवान अबुझमाडच्या घनदाट जंगलात नक्षलवादविरोधी मोहिमेवर असताना ही चकमक उडाली. आमच्या पोलिसांनी शुरतेने नक्षलवाद्यांना प्रत्युत्तर देत त्यांचा खात्मा केला. मी या जवानांचे अभिनंदन करतो.
- **विजय शर्मा**
उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री छत्तीसगड

### मोठा शस्त्रसाठा जप्त

चकमकीनंतर घटनास्थळावर नक्षलवाद्यांचे मृतदेह आणि मोठा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे. चकमकीत काही जवान जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अबुझमाडच्या जंगलात शोधमोहीम सुरू असल्याची माहिती पोलिस अधिकाऱ्यांनी दिली आहे. ■

### या महिन्यातील दुसरा मोठा धक्का

२१ एप्रिलापासून करेगुट्टा जंगलात शोधमोहिमेला प्रारंभ केला होता. जवळपास २० दिवस पाच हजार जवानांनी वेढा दिला होता. २१ दिवस चाललेल्या मोहिमेत टॉप कमांडर हिडीमा मडावीसह ३१ नक्षलवादी ठार झाल्याची माहिती छत्तीसगड पोलिसांनी १६ मे रोजी पत्रकार परिषद घेऊन दिली. बुधवारी बसवराजू रुपात दुसरा धक्का नक्षलवादी चळवळीला बसला आहे. ■

### यावर्षी २०० नक्षलवाद्यांचा खात्मा

यावर्षी छत्तीसगडमधील विविध चकमकींमध्ये २०० नक्षलवादी ठार झाले आहेत. यापैकी एकट्या बस्तर क्षेत्रात १८३ नक्षलवाद्यांना ठार करण्यात यश आले आहे. बस्तरमधील बिजापूर, नारायणपूर, दंतेवाडा आणि कोंडागाव या जिल्ह्यांमध्ये नक्षलवादी चळवळीला मोठा हादरा बसला आहे. ■

## लष्करचा सहसंस्थापक हमजावर गोळीबार

◆ **इस्लामाबाद, २१ मे**

प्रतिबंधित दहशतवादी संघटना लष्कर-ए-तोयबाचा सहसंस्थापक आमिर हमजावर अज्ञातांनी गोळीबार केला. यात तो गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर लाहोर येथील पाकिस्तानी लष्कराच्या रुग्णालयात उपचार सुरू आहे. मंगळवारी सायंकाळच्या सुमारास हल्लेखोरांनी त्याच्या घरात प्रवेश करीत गोळीबार केल्याची माहिती समोर आली.



लष्करमधील कुख्यात दहशतवादी अबू सैफुल्लाहवर तीन दिवसांपूर्वी पाकिस्तानमध्ये काही अज्ञातांनी गोळीबार केला, यात तो जागीच ठार झाला होता. त्यानंतर मंगळवारी आमिर हमजावर त्याच्या घरात घुसून हल्ला करण्यात आला. पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी या घटनेबाबत मौन बाळगले असले तरी तेथील स्थानिक वृत्तवाहिनीच्या माहितीनुसार हमजाच्या छातीत आणि पोटावर तीन गोळ्या झाडल्या गेल्या. सुरक्षा दलाने त्याला लाहोर येथील रुग्णालयात दाखल केले. ◀(वृत्तसंस्था)

## सोनिया, राहुल गांधींनी कमावले १४२ कोटी रुपये

**नवी दिल्ली, २१ मे**

नॅशनल हेरॉल्ड प्रकरणाबाबत राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांच्या अडचणी सतत वाढत आहेत. या प्रकरणाबाबत ईडीने दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू न्यायालयात दाखल केलेल्या फिर्यादी तक्रारीवर सुनावणी झाली.

या प्रकरणातील आरोपी राहुल आणि सोनिया गांधी यांनी एकूण १४२ कोटी रुपयांचा नफा मिळवला, असे यावेळी ईडीने सांगितले. नोव्हेंबर २०२३ मध्ये ईडीने नॅशनल हेरॉल्डशी संबंधित ७५१.९ कोटी रुपयांच्या म ालमत्ता जप्त होतपर्यंत ते यातून मिळालेल्या पैशाचा आनंद घेत होते.

गांधी कुटुंबाने या पैशातून केवळ मनी लॉड्रिंग केले नाही तर ते पैसे स्वतःकडे ठेवून गुन्हे करत राहिले, असा दावा ईडीने केला आहे.दरम्यान, न्यायालयाने भाजपा नेते सुब्रमण्यम स्वामी यांची याचिका मंजूर केली. यामध्ये त्यांनी आरोपपत्राची प्रत आणि इतर कागदपत्रे मागितली होती. स्वामी यांनी तक्रार दाखल केल्यानंतर स्थानिक न्यायालयाने या प्रकरणाची दखल घेतली. यानंतर २०२१ मध्ये चौकशीला प्रारंभ केला आणि आरोपपत्र दाखल केले.

## माजी गृहराज्यमंत्री म्हेत्रे शिवसेनेच्या वाटेवर; काँग्रेसला मोठा धक्का

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २१ मे-**

काँग्रेसचे माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी शिंदे गट शिवसेनेमध्ये प्रवेश करण्याचे निश्चित केले असुन ३१ मे रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये असंख्य कार्यकर्त्याच्या उपस्थितीमध्ये पक्षप्रवेश कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे. दरम्यान तालुका कॉंग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष शंकर म्हेत्रे यांच्या हातीही धन्युष बाण येणार आहे. तालुक्यात म्हेत्रे यांच्या हाती धन्युष्यबाण आल्याने ते त्यातून कोणाचा राजकीय वेध घेणार याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.



शिवसेना पक्षामध्ये दि.३१ मे रोजी जाहीर प्रवेश कार्यक्रम होणार आहे. लोकसभा संपर्क प्रमुख महेश नाना साठे व लोकसभा महिला संपर्क प्रमुख अनिता योगेश माळगे यांच्या सम वेत माजी गृहराज्यमंत्री सिद्धराम म्हेत्रे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. भाजपचे आमदार बाबासाहेब तानवडे यांच्या निधनानंतर झालेल्या पोटनिवडणुकीत काँग्रेसने म्हेत्रे यांना उमेदवारी दिली होती. म्हेत्रे पोट निवडणुक जिंकुन आमदार झाले. त्यानंतर सलग ते २००९ पर्यंत आमदार होते. २०१४ ला पुन्हा आमदार झाले. कॉंग्रेसने सलग सात विधानसभा निवडणुकीत म्हेत्रे यांना उमेदवारी दिली. यापैकी २००९ मध्ये आमदार सिद्राम प्पा पाटील व २०१९ व २०२४ मध्ये सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडून माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यानां पराभव पत्करावा लागला . माजी गृहराज्यमंत्री सिद्धराम म्हेत्रे यांची अक्कलकोट तालुक्यात मोठा जनसंपर्क आहे . माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे राष्ट्रवादी मध्ये जाणार अशी चर्चा होती मात्र त्यांच्या पक्ष प्रदेशाबद्दलची चर्चा आता शिंदे गट बाळासाहेबांची शिवसेना या पक्षात ३१ मे रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये म्हेत्रे समर्थक असंख्य कार्यकर्त्या सह शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. सोलापुर जिल्ह्यात माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या रुपाने अनुभवी मुरब्बी जाणकार नेता मिळाल्याने जिल्हयात शिंदे गट शिवसेना वादिस मोठी मदत होणार आहे. माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे भाजपाचे सहयोगी महायुती मधील बाळासाहेबाची शिवसेना पक्षात आल्याने तालुक्यात भाजपाचा म्हेत्रे विरोध हा अजेंडा समाप्त होईल का कार्यकर्त्यानां हे रुचेल का असा प्रश्न विचारला जात आहे.

## वक्फ धर्मादाय संस्था, इस्लामचा भाग नाही

### सर्वोच्च न्यायालयात केंद्राची भूमिका | सरकारी जमिनीवर कोणाचाही अधिकार नाही

◆ **नवी दिल्ली, २१ मे**

वक्फ ही एक इस्लामिक संकल्पना आहे, परंतु ती इस्लामचा आवश्यक भाग नाही. दान हा प्रत्येक धर्माचा एक भाग आहे, त्यामुळे वक्फ ही एक धर्मनिरपेक्ष व्यवस्था असून ती केवळ धर्मदाय संस्था आहे. वक्फ बोर्डाने दावा केला असला तरी देशातील कोणत्याही भागातील सरकारी जमिनीवर सरकारशिवाय कोणीही अधिकार सांगू शकत नाही, अशी भूमिका केंद्र सरकारच्यावतीने महान्यायाभिकर्ता तुषार मेहता यांना बुधवारी सर्वोच्च न्यायालयात मांडली.

वक्फ सुधारणा कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सलग दुसऱ्या दिवशी सरन्यायाधीश भूषण गवई, न्या. ए.जी. मसीह आणि न्या. के. विनोद चंद्रन यांच्या न्यायासनासमोर सुनावणी पार पडली. ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल, अभिषेक मनु सिंघवी आणि राजीव




धवन यांनी केलेल्या युक्तिवादावर केंद्र सरकारची बाजू मांडताना महान्यायाभिकर्ता तुषार मेहता म्हणाले, दानधर्माची संकल्पना प्रत्येक धर्मात आहे. हिंदू, शीख,ख्रिश्चन धर्मातही दान देण्याची संकल्पना आहे. मुस्लिम समुदायातील बहुतांश लोकांची आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नाही, ते वक्फ करू शकत नाहीत, मग ते मुस्लिम राहणार नाहीत का? कोणत्याही धर्मात दान करणे आवश्यक नाही, त्याचप्रमाणे इस्लाममध्येही वक्फ करणे आवश्यक नाही. वक्फ बाय युजर हा काही मूलभूत अधिकार नाही. ◀(वृत्तसंस्था)

### ९६ लाख लोकांनी केल्या सूचना

या कायद्यातील दुरुस्त्यांचा उद्देश मागील अनेक दशकांपासून असलेल्या समस्यांचे निराकरण करणे आहे. हे बदल १९२३ पासूनचे प्रश्न सोडवतात. या सुधारणांमध्ये देशातील नागरिकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. ९६ लाख लोकांनी सूचना केल्या होत्या आणि संसदीय समितीच्या ३६ बैठका झाल्या, त्यामुळे व्यापक सल्लामसलत करूनच कायदा पारित करण्यात आला. त्यामुळे काही याचिकाकर्ते संपूर्ण मुस्लिम समुदायाचा भाग असू शकत नाही. तुमच्याकडे आलेल्या याचिका अशा लोकांनी दाखल केल्या आहेत ज्यांच्यावर या कायद्याचा थेट परिणाम होत नाही. ■

### सुनावणीत केंद्राने मांडलेले महत्त्वाचे मुद्दे

- एकूण तीन मुद्यांवर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली, त्यावर उत्तर दाखल करण्यात आले आणि न्यायासनाने सुनावणी केवळ याच मुद्यांपुरती मर्यादित ठेवली
- पारदर्शकता, जबाबदारी आणि प्रशासकीय सुधारणांसाठी ,हा कायदा आणण्यात आला
- हा कायदा संविधानाच्या विरोधात नाही आणि धार्मिक स्वातंत्र्य किंवा अधिकारांमध्ये हस्तक्षेप करीत नाही
- वक्फ ही एक धर्मनिरपेक्ष संपल्पना आहे परंतु, इस्लामचा अविभाज्य भाग नाही
- संसदेने मंजूर केलेला कायदा लागू करण्यापासून थांबवता येत नाही, अंतरिम आदेश देण्यापूर्वी कायद्याची घटनात्मक वैधता सर्व समावेशकपणे तपासली पाहिजे. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...

### फवारणीचा भपकारा लागल्याने महिला अत्यवस्थ; डिकसळ येथील घटना

**सोलापूर, दि. २१ मे-**

शेतात पिकावर फवारणी करताना त्या औषधांचा भपकारा लागल्याने महिला अत्यवस्थ झाली. हा प्रकार मोहोळ तालुक्यातील डिकसळ येथे बुधवारी सकाळी आठ वाजता घडला. भाग्यश्री महादेव आतकरे (वय ४०, रा. डिकसळ ता. मोहोळ) असे महिलेचे नाव आहे. बुधवारी सकाळी भाग्यश्री या त्यांच्या शेतातील पिकावर फवारणी करत होत्या. त्यावेळी त्यांना त्या औषधांचा भपकारा लागला. तसेच तोंडात औषध गेल्याने त्रास होऊ लागल्याने मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून पती महादेव याने शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### म्हेत्रे वस्तीत मेव्हण्याच्या घरावरून तोल जाऊन भावजी पडला

**सोलापूर, दि. २१ मे-**

घरावरील पत्रे काढताना तोल जाऊन पडल्याने एकजण जखमी झाला. ही घटना कुमठा नाका परिसरातील म्हेत्रे वस्ती येथे बुधवारी दुपारी २.३० वाजता घडली. यातील जखमी हा त्याच्या मेव्हण्याच्या घरावर चढून काम करताना ही घटना घडली. सुधीर प्रजापती कुमार (वय ४०, रा. मल्लिकार्जुन नगर) असे जखमीचे नाव आहे. यातील जखमी सुधीर याच्या मेव्हणा याचे घर कुमठा नाका परिसरातील म्हेत्रे वस्ती येथे आहे. सध्या पावसाळा असल्याने त्याच्या घरावरील पत्रे बदलण्याकरीता सुधीर हा बुधवारी गेला होता. दुपारी दोनच्या सुमारास काम करताना अचानक तोल गेल्याने सुधीर हा पत्र्यावरून खाली पडला. यामध्ये डोक्याला जखम झाल्याने शेजारी शेखर वाघमारे याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### जुना बोरामणी चौकात मालट्रकच्या धडकेत दुचाकीवरील एकजण जखमी

**सोलापूर, दि. २१ मे-**

घोंगडे वस्ती ते जुना विडी घरकुल असे जाताना जुना बोरामणी चौकात पाठीमागून मालट्रकची धडक बसल्याने दुचाकीवरील एकजण



जखमी झाला. हा अपघात बुधवारी दुपारी दोनच्या सुमारास घडला.शंकर हणमंतु चिकणी (वय ७०, रा. विडी घरकुल) असे जखमीचे नाव आहे. शंकर हे बुधवारी दुपारी दोनच्या सुमारास दुचाकीवरून घोंगडे वस्ती येथून जुना विडी घरकुलच्या दिशेने जात होते. दरम्यान जुना बोरामणी नाका येथे ते जात असलेल्या दुचाकीला मालट्रकची धडक बसली. यात उजव्या हाताला व छातीला मुकामार लागल्याने नंदकिशोर आडकी याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### एसटी कॉलनीत भाच्याने घरी आलेल्या मामाला केली मारहाण

**सोलापूर, दि. २१ मे-**

फोनवर झालेल्या वादानंतर विचारणा करण्यासाठी घरी आलेल्या मामाला भाच्याने मारहाण केली. हा प्रकार नवीन आरटीओ परिसरातील




एसटी कॉलनीत मंगळवारी रात्री दहाच्या सुमारास घडला.स श्रीकांत भीमाशंकर शेरीकर (वय ५२, रा. उत्तर सदर बझार) असे मारहाण झालेल्या मामाचे नाव आहे. मंगळवारी रात्री श्रीकांत याचा भाचा बबलू हे दोघे फोनवर बोलत होते. त्यावेळी त्यांच्यात वाद झाला. याबाबत विचारणा करण्यासाठी श्रीकांत हा एसटी कॉलनीतील भाचा बबलू याच्या घरी गेला. त्यावेळी बबलू याने त आमच्या घरी का आला असे म्हणत लोखंडी खुर्चीने मारहाण केल्याने हाताला जखम झाली. तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केल्याने सर्वांगास मुकामार लागल्याने रात्री १०.४५ वाजता पत्नी सिमा यांनी उपचारास दाखन केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### गाडी हळू चालव असे म्हणाल्याने तरुणाला पाच जणांकडून मारहाण

**सोलापूर, दि. २१ मे-**

दुचाकीचा धक्का लागल्यानंतर गाडी हळू चालव असे म्हणाल्याने तरुणाला चार ते पाच जणांनी बेदम मारहाण केली. ही मारहाण



इंपिरियल हॉलसमोरील रस्त्यावर मंगळवारी ८.४५ वाजता घडली. अरबाज चांद शेख (वय १८, रा. नई जिंदगी, सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. मंगळवारी रात्री अरबाज हा इंपिरियल गार्डन येथे कार्यक्रमानिमित जात होता. त्यावेळी त्याला रस्त्यावरून जाणा-या दुचाकीचा धक्का लागल्याने तो गाडी हळू चालवा असे दुचाकीस्वाराला म्हणाला, यानंतर आम्हाला सांगणारा तू कोण म्हणून अज्ञात तीन ते चार जणांनी अज्ञात वस्तुने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात सर्वांगास मुकामार लागल्याने रात्री ९.१० वाजता भाऊ महिबूब याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### मुरूम टाकण्याच्या कारणातून पोफळीत तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. २१ मे-**

राहते घरी मुरूम टाकत असताना मुरूम टाकू नको म्हणून तरुणाला माराहण करण्यात आली. ही मारहाण मोहोळ तालुक्यातील पोफळी गावात मंगळवारी सायंकाळी ५.३० वाजता घडली. अमोल नाना कांबळे (वय ३७) असे मारहाण झालेल्याचे नाव आहे. अमोल हा पोफळी गावातील त्याच्या राहत्या घरी मुरूम टाकत होता. त्यावेळी त्याला केदार घंटे व इतर एक या दोघांनी मुरूम टाकू नको असे म्हणून सळईने मारहाण केली. यात डाव्या हाताला जखम झाली तसेच उजव्या हाताला मुकामार लागल्याने मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उापचार करून तो स्वत: बुधवारी दुपारी दोनच्या सुमारास शासकीय रुग्णालयात दाखल झाला. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# शहर विकास आराखड्यास तोपर्यंत स्थगिती द्यावी

## शहरातील नागरी समस्यांसंदर्भात आ. रोहित पवार महापालिकेत

## महापालिका आयुक्तांशी केली विविध विषयावर चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मे-**

शहरातील पाणी समस्या यासह विविध प्रश्नां संदर्भात आ. रोहित पवार यांनी महापालिकेत आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्याशी चर्चा केली. विविध प्रश्न सोडविण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी.

सोलापूर महानगरपालिका सदस्य समिती गठीत होईपर्यंत शहर विकास आराखड्यास स्थगिती द्यावी, अशा सूचना केल्या. सोलापूर शहरात सात ते आठ दिवसाला विस्कळीत पाणीपुरवठा होत असल्याने तसेच दुहेरी पाईपलाईनचे काम संत गतीने होत आहे व पाईपलानंतरही शहराला दररोज पाणी मिळण्याचे शाश्वती नाही. त्यावर उपाययोजना करावी. झोपडपट्टीतील नागरिकांच्या घरांमध्ये पाणी शिरत असल्याने ड्रेनेज लाईन व नालेसफाई त्वरित करण्याबाबत सूचना केल्या.

अग्निशामक दलाकडे साधन सामुग्री अपुरी असल्याने अक्कलकोट रोड एमआयडीसी मधील आग विझवण्यास विलंब लागला. जीवितहानी झाली. भविष्यात अशा घटना होऊ नये यासाठी उपाययोजना कराव्या. सोलापुरात शहरांमध्ये



११ ते १४ मजली अपार्टमेंट होत आहेत पण त्या अनुसरून अग्निशामक दलाकडे कुठल्याही प्रकारचे साधन सामग्री उपलब्ध कराव्यात.

शहरांचा नव्याने तयार करण्यात आलेल्या शहर विकास विकास आराखड्या बाबत नागरिकांच्या तक्रारी असल्याने आराखड्यात सुधारणा करण्यात याव्या. सोलापूर महानगरपालिका सदस्य समिती गठीत होईपर्यंत शहर विकास आराखड्यास स्थगिती द्यावी. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा सुशोभीकरण व मजबुतीकरणाची कार्य आदेश मिळून सुद्धा गेली आठ महिने ठेकेदारांनी काम सुरू केले नसल्याने शिवजयंती व सहा जून रोजी होणारा शिवराज्याभिषेक सोहळा कार्यक्रम करण्याकरता अडचणी येत असल्याने शिवभक्तामध्ये नाराजी आहे. त्वरित काम करण्याबाबत ठेकेदारास आदेश होण्यास सूचना देण्यात आली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष सुधीर खरटमल, माजी महापौर ॲड. यु.एन बेरिया, नलिनी चदेले, प्रथमेश कोठे,चंद्रकांत पवार, प्रशांत बाबर, सुनिता रोटे, सरफराज शेख, प्रतिक्षा चव्हाण, जावेद शिकलकर, रेखा सपाटे, लता ढेरे, सिया मुलानी, सूर्यकांत शिरखाने, शक्ती कटकदोड, रामप्रसाद शागालोलु,सुनिता दळवी, अक्षय जाधव आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## महात्मा बसवेश्वर पुतळा सुशोभीकरणाची जबाबदारी बसव ब्रिगेडवर

### महापालिका प्रशासनाने दिले अश्वारूढ पूर्णाकृती पुतळा सांभाळण्यासाठीचे अधिकृत पत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मे-**

जगदज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या नूतनीकरण व सुशोभीकरण कामास सुरुवात झाली आहे. त्यासंदर्भात नूतनीकरण आणि सुशोभीकरण या कामाची जबाबदारी बसव ब्रिगेडवर सोपवण्यात आल्याचे अधिकृत पत्र महापालिकेच्या वतीने बसव ब्रिगेडचे अध्यक्ष अमित रोडगे यांना सुपूर्द करण्यात आले आहे.

बसवेश्वर यांच्या पूर्णाकृती पुतळा १९८५ साली श्री काशी जगद्गुरु डॉ. श्री चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते व तत्कालीन केंद्रीय मंत्री शिवराज पाटील-चाकूरकर, सुशिलकुमार शिंदे व महापौर बंडप्पा मुनाळे यांच्या उपस्थितीत झाले होते. या पुतळ्यास ४० वर्षे पूर्ण झाली होती. त्यामुळे पुतळ्याचे नूतनीकरण व परिसर सुशोभिकरण करणे अत्यावश्यक होते. त्याकरिता आमदार विजयकुमार देशमुख यांनी महापालिका नाविन्यपूर्ण उपक्रमातून ३५ लाख व शिवसेना जिल्हाप्रमुख मनीष काळजे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून ४०



लाख रुपये निधी मिळवून दिला. त्यामुळे या कामास गती मिळाली. परंतु पालिका प्रशासन व ठेकेदार यांना काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या होत्या. त्या संदर्भात महापालिकेने बसव ब्रिगेडचे अध्यक्ष अमित रोडगे यांच्याशी संपर्क साधला. त्या तांत्रिक कामासाठी रोडगे यांनी तत्परता दाखवली. या कामासाठी सक्रिय योगदान देणार असल्याचे सांगितले. त्यास लागलीच महापालिका प्रशासनाने त्यांच्यावर जबाबदारी सोपवून अधिकृत पत्र त्यांना सुपूर्द केले. या कामासाठी जिल्हा कार्याध्यक्ष बसवराज चाकाई, शहर कार्याध्यक्ष शिवराज विभुते, शहर सचिव राहुल जत्ती, सहसचिव अविनाश बिराजदार, प्रसिद्धीप्रमुख दत्ता केरे यांचे योगदान राहिले आहे.



## टेंभुर्णीमध्ये तिरंगा रॅली उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**टेंभुर्णी, दि. २१ मे-**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार माढा लोकसभा शिवसेना संपर्क प्रमुख संजय कोकाटे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय लष्कराच्या सन्मानार्थ तिरंगा रॅली टेंभुर्णीत बुधवारी काढण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून सुरू झालेली भव्य दिव्य मोटरसायकल रॅली छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ छावा चौक येथे विसर्जित करण्यात आली.

शहरातील डॉ. आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, अण्णाभाऊ साठे, छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास माजी सैनिकांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आली तिरंगा रॅलीचे ठिकठिकाणी फटाक्याची आतषबाजी करून स्वागत करण्यात आले.यात्रेमध्ये सोलापूर लोकसभा संपर्क प्रमुख महेश साठे ,परांडे मॅडम, विनोद पाटील, नितीन कापसे, तात्यासाहेब गोडगे, आनंद टोणपे, योगेश जाधव, अमोल जगदाळे, विठ्ठल मस्के, राजेंद्र ढेकणे, राजेंद्र येवले, फाईव्ह पटेल, सुधीर महाडिक, कैलास सातपुते, सतीश नेवसे, सुनील निकम, सज्जन ढवळे, गणेश ढवळे, अण्णा ढवळे, राहुल ढवळे, बेंबळेचे सरपंच विजय पवार, जीवन लांडे, सुदर्शन गायकवाड, प्रवीण मस्के, जयवंत पोळ, सुरेश लोंढे, अमोल धुमाळ, अमर शेंडे यशपाल लोंढे, डी. एस. गायकवाड, विठ्ठल गायकवाड, सचिन श्रीखंडे, प्रशांत महाडिक, दत्तात्रय कवडे, संतोष साळवे, अमर काजी आदी सहभागी होते.

## ‘सिंधू’वरून पाकिस्तानात जाळपोळ

### गृहमंत्र्याचे घर जाळले, निदर्शकांवर गोळीबार, चार ठार

**इस्लामाबाद, २१ मे**

भारताने पाकिस्तानसोबतचा सिंधू जल करार स्थगित केला असलातरी आतापर्यंत पाकिस्तानकडे जाणाऱ्या सिंधू नदीच्या पाण्याच्या प्रवाहावर कोणताही परिणाम झालेला नाही, परंतु त्यापूर्वीच तेथे अराजकतेची परिस्थिती निर्माण झाली. पाकिस्तान सरकारने सिंधू नदीचे पाणी पंजाब प्रांतात वळविण्यासाठी सहा कालवे बांधण्याचा प्रकल्प हाती घेतला.

सरकारच्या निर्णयाविरोधात सिंध प्रांतात बुधवारी आंदोलन करण्यात आले. आंदोलकांनी पाकिस्तानच्या गृहमंत्र्याचे घर





जाळले. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात चार नागरिकांचा मृत्यू झाला. पंजाबकडे पाणी वळविण्याच्या निर्णयाच्या विरोधात आंदोलकांनी मोठ्या प्रमाणात जाळपोळ केली, तसेच सिंधचे गृहमंत्री झियाउल हसन लांजर यांचे नौशहरो फिरोज जिल्ह्यातील घराला आग लावली. याशिवाय घराबाहेर उभी असलेली वाहने पेटवून दिली. यावेळी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात चार निदर्शकांचा मृत्यू झाला. सरकारकडून पंजाब केंद्रित धोरणे का राबविली जात आहे, असा प्रश्न उपस्थित करीत पाकिस्तानातील सिंध, खैबर पख्तूनख्वा आणि बलुचिस्तानमध्ये यापूर्वीच बंडखोरीच्या घटना घडल्या असताना आता पुन्हा सिंध प्रातांत अराजकची परिस्थिती निर्माण झाली. पाकिस्तान सरकारने सिंधू नदीवर सहा कालवे बांधून त्याद्वारे पाणी वळविण्याचा निर्णय घेतला. या कालव्यांद्वारे चोलिस्तानमधील सिंचन व्यवस्था मजबूत करण्याचा प्रयत्न केला जात आहे. याविरोधात सिंध प्रांतातील लोक रस्त्यावर उतरले.

### पाकिस्तान पीपल्स पार्टीचा विरोध

पाकिस्तान सरकारचे म्हणणे आहे, की सहा कालवे बांधून चोलिस्तान भागात सिंधू नदीचे पाणी वळविण्याला पाकिस्तान पीपल्स पार्टीसह, धार्मिक संघटना, कार्यकर्ते आणि वकिलांकडून तीव्र विरोध होत होता. याशिवाय सिंधमधील इतर पक्षही याच्या विरोधात आहेत. चोलिस्तान कालवा प्रणालीद्वारे चार लाख एकर जमीन सिंचनाखाली आणता येते असे पाकिस्तान सरकारचे म्हणणे आहे. याचवेळी, सिंधमधील लोकांनी सिंधूचे पाणी वळविण्यास विरोध केला. यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून आंदोलन सुरू आहे.

## संजीवनी सोशल फाउंडेशनचा वार्षिक स्नेह मेळावा उत्साहात

**सोलापूर, दि. २१ मे-**

मागील पाच वर्षापासून समाज सेवेत कार्यरत असलेले संजीवनी सोशल फाउंडेशन या संस्थेचा ५ वा स्नेह मेळावा दयानंद कॉलेज येथील महर्षी दयानंद सरस्वती ऑडिटोरियम येथे उत्साहात झाला. याप्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे प्रशासक डॉ. व्ही. पी. उबाळे, रोटरी आंतरराष्ट्रीय जिल्हा ३१३२ चे २०२६-२७ सालचे प्रांतपाल जयेशभाई पटेल तसेच दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. क्षीरसागर हे उपस्थित होते. फाउंडेशनला मागील वर्षभरात सहकार्य केल्याबद्दल भारत पवार, विठ्ठल माने, सोमेश्वर याबाजी, गिरीश सुकलेचा, अतुल चव्हाण ह्यांचा सन्मान चिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला तसेच




इयत्ता दहावी मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी ९०% हून अधिक गुण मिळवलेत असे २७ विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन कौतुक करण्यात आला. कार्यक्रमाची प्रस्ताविक फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष राकेश उदगिरी यांनी केले. मागील वर्षभरातील पार पडलेल्या उपक्रमांचे सादरीकरण राखी उदगिरी हिने केले. कार्यक्रमाचे व्यवस्थापन फाउंडेशनच्या संचालिका रंजीता उदगिरी यांनी पाहिले व सूत्रसंचलन जीवराज खोबरे व श्रेया माशाळ यांनी केले. फाउंडेशनचे सचिव सचिन गबुरे यांनी आभार मानले.

## साहेबांसाठी लाच घेणारा कंत्राटी कर्मचारी पोलीस कोठडीत

**सोलापूर, दि. २१ मे-**

आठ हजार रुपयांची लाच घेणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्याला न्यायालयाने दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याची आदेश दिले.योगीनाथ म्हेत्रे असे त्या कंत्राटी कर्मचा-याचे नाव आहे.

सोलापूर महावितरण कार्यालयात म्हेत्रे हा कंत्राटी कर्मचारी म्हणून काम करत आहे. यातील तक्रारदार हा पीएम सूर्यघर योजनेतून लोकांच्या घरावर सौरउर्जा पॅनल बसविण्याचे काम करतो. यातील तक्रारदार करत असलेल्या कामाची स्थळ पाहणी करून त्यास मंजुरी देऊन मीटर बसविण्याकरीता आरोपी कंत्राटी कर्मचारी म्हेत्रे याने तक्रारदाराकडे अतिरिक्त कार्यकारी अभियंता भारत व्हनमाने व सहाय्यक अभियंता स्वाती सलगर यांना प्रती वॅट एक हजार प्रमाणे १६ हजार दयावे लागतील असे तक्रारदाराला सांगितले.

तक्रारीच्या अनुषंगाने १६ व १९ मे रोजी पडताळणी करण्यात आली. त्यामध्ये आरोपी क्रमाक एकसाठी पाच हजार व दोनसाठी तीन हजार अशी लाचेची मागणी करून आरोपी म्हेत्रेकडे देण्यास सांगितले. याप्रकरणी लाच लुचपत विभागाने महावितरण कार्यालयात सापळा लावून लाच स्विकारताना आरोपी म्हेत्रेला रंगेहाथ पकडले. त्याच्याविरूध्द फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बुधवारी कंत्राटी कर्मचारी म्हेत्रे यास न्यायालयात हजर केले, असता न्यायालयाने दोन दिवस पोलीस कोठडी सुनावली.

## जिल्हाधिकारी कार्यालयात जागतिक पर्यटन दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.२१ मे-**

जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात जागतिक पर्यटन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा पर्यटन अधिकारी संतोषकुमार देशमुख होते.

कार्यक्रमास उपसंचालक पर्यटन संचालनालय विभागीय कार्यालय पुणेच्या शमा पवार, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी प्रीतम कुंटला, पुंडलिक गोडसे, कृषी विज्ञान केंद्राचे डॉ. लालासाहेब तांबडे, वेलनेस टुरिझम चे डॉ. व्यंकटेश मेतन, ट्रॅव्हल टुरिझमचे सोमनाथ चडचणकर, चिंचणी ग्रामीण पर्यटन चे मोहन अनपट, कृषी पर्यटनचे लहू आवताडे तसेच एकात्मिक पर्यटन विकास प्रकल्पाचे उपजीविका तज्ञ प्रवीण कुऱ्हे, विपणन तज्ञ रोहित आदमाने,कृषी पर्यटन तज्ञ रमेश



खळदकर, स्थापत्य अभियंता विनायक जवळकोटे व क्षेत्र समन्वयक राहुल डफळ यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयटीडीपी प्रकल्प व्यवस्थापक महेश कोडगिरे यांनी केले.

या कार्यक्रमात शमा पवार यांनी कृषी पर्यटन क्षेत्रातील विविध संधी, शासनाचे नवीन उपक्रम, शासकीय कर्जसहाय्यता योजना, तसेच पर्यटन केंद्र नोंदणी प्रक्रिया याविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच आई योजने अंतर्गत पर्यटन क्षेत्रात महिलांना प्राधान्य देण्यात येत असल्याचे सांगितले. तसेच संतोषकुमार देशमुख यांनी जिल्ह्यातील विविध ७५ पर्यटन स्थळाबाबत योगदान, सोलापुरातील उत्कृष्ट जीवन शैली, गट पर्यटन, धार्मिक पर्यटन तसेच जिल्ह्यात लवकरच पर्यटन समिती स्थापन होईल या बद्दलची माहिती दिली.

कार्यक्रमात विद्यमान कृषी पर्यटन केंद्र चालक, नव्याने कृषी पर्यटन केंद्र स्थापन करू इच्छिणारे शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी, महिला बचत गट, तसेच जिल्ह्यातील विविध पर्यटन क्षेत्रात स्वारस्य असलेले नागरिक असे एकूण ८७ प्रतिनिधी उपस्थित होते. कृषी पर्यटन तज्ञ रमेश खळदकर यांनी आभार मानले

## ब्रिटन, युरोपियन युनियनने रशियावर लादले निर्बंध

**कीव, २१ मे**

ब्रिटन आणि युरोपियन युनियनने रशियावर अनेक नवीन आर्थिक आणि व्यापाराशी संबंधित निर्बंध लादले. यानंतर युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी ब्रिटिनचे पंतप्रधान केयर स्टारमर यांचे आभार मानत म्हणाले की, अशा प्रकारच्या उपायांमुळे दबाव येऊन रशिया युद्धबंदी करू शकेल आणि शांतता निर्माण होईल. ब्रिटनने रशियन बँका, तेल व्यवसाय, शस्त्रास्त्र पुरवठा आणि प्रचार यंत्रणेशी संबंधित संस्थांना लक्ष्य करून १०० नवीन निर्बंध लादले आहेत. याशिवाय युरोपियन युनियननेदेखील १७ निर्बंध लादले, ज्यामध्ये रशियन लष्करी तंत्रज्ञानावर पूर्णपणे बंदी घालण्याचील घोषणा केली. झेलेन्स्की यांनी ब्रिटिश पंतप्रधानांशी फोनवर चर्चा केली आणि यावेळी त्यांनी यावर भर दिला की आता सर्व देशांनी एकत्र येऊन रशियावर दबाव आणण्याची वेळ आली आहे, विशेषतः अमेरिकेने अधिक कठोर पावले उचलावी जेणेकरून युद्ध रोखता येईल आणि कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित करता येईल. झेलेन्स्की यांनी एक्सवर लिहिले की, मी ब्रिटिश पंतप्रधानकेयर स्टारमर यांच्याशी बोललो. रशियावर शांततेसाठी दबाव आणणाऱ्या नवीन ब्रिटिश निर्बंधांबद्दल मी त्यांचे आभार मानले.

# विकसित भारताची
# अमृत स्थानके



## भारतातील १०३ पुनर्विकसित अमृत स्थानकांचे
## उद्घाटन

ज्यामध्ये समाविष्ट आहेत

## महाराष्ट्रातील १५ अमृत स्थानके




### फायदे

- रूफ प्लाझा, शॉपिंग झोन, फूड कोर्ट, किड्स प्ले एरिया इत्यादी सुविधांसह स्थानकांचा सिटी सेंटर्स म्हणून विकास.
- विरासत भी विकास भी - स्थानिक वास्तुकलेपासून प्रेरित स्टेशन इमारतींचे डिझाइन.
- स्वतंत्र प्रवेश आणि निर्गमन दरवाजे, मल्टी-लेव्हल पार्किंग, लिफ्ट, एस्केलेटर, एक्झिक्युटिव्ह लाउंज, प्रतीक्षा क्षेत्र, ट्रॅव्हेलेटर आणि दिव्यांगजन अनुकूल सुविधांची तरतूद.
- मल्टी-मॉडल कनेक्टिव्हिटीच्या एकात्मिकतेमुळे ही स्थानके या प्रदेशातील सामाजिक-आर्थिक क्रियाकलापांचे केंद्र बनतील.
- पर्यावरण पुरक ऊर्जा कार्यक्षमता आणि हरित साधनांचा उपयोग.

## पंतप्रधान
# नरेन्द्र मोदी
यांच्या शुभहस्ते
(व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे)

**गुरुवार २२ मे २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता**

### सन्माननिय उपस्थिति

**सी. पी. राधाकृष्णन**
राज्यपाल, महाराष्ट्र

**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र

**अश्विनी वैष्णव**
केंद्रीय रेल्वे, सूचना व प्रसारण आणि इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्री

**अर्जुन राम मेघवाल**
केंद्रीय विधि आणि न्याय (स्वतंत्र प्रभार) आणि संसदीय कार्य राज्यमंत्री

**मुरलीधर मोहोळ**
केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री

**श्रीमती रक्षा खडसे**
केंद्रीय युवक कल्याण व क्रीडा राज्यमंत्री

# भारतीय रेल्वे

डीडी न्यूजवर कार्यक्रम लाईव्ह पहा | www.indianrailways.gov.in | आम्हाला फॉलो करा /RailMinIndia

## अग्रलेख...

# साक्षरतेचा 'मिझो'मार्ग

साक्षरतेचा सध्या सर्वत्र बोलबाला आहे. भारतातील सर्वच राज्ये साक्षरतेबाबत फुशारक्या मारत असतात. आजवर केरळकडे सर्वांत जास्त साक्षरतेची संख्या असलेले राज्य म्हणून पाहिले जात होते. देशात या राज्याची त्यासाठी ख्यातीही होती. देशातील तुलनेने लहान असलेल्या या राज्याच्या साक्षरतेची इतर राज्यांना असूयाही वाटत होती. काही राज्ये यात बढाईखोरी करून आपले नाव पुढे रेटत होते. मात्र आता साक्षरतेबाबत कुणाचा पुढाकार हे सांगताना तुमची जीभ अडखळणार नाही. कारण भारतातील पहिले साक्षर राज्य होण्याचा मान ईशान्य भारतातील मिझोरम या राज्याला मिळाला आहे. जिथे एकही निरक्षर व्यक्ती नाही, असे मिझोरम हे भारतातील पहिले राज्य राहणार आहे. साक्षरता ही विकासाची पाऊलवाट असते. त्या पाऊलवाटेवर पाय रोवत मिझोरम राज्य पूर्णतः साक्षर झाल्याची घोषणा मंगळवारी शिक्षण मंत्रालयाने केली. या निर्णयामुळे ईशान्येकडील या छोट्याशा राज्याने केरळलाच नव्हे, तर देशातील सर्व राज्यांना पिछाडवर सोडले आहे. देशातील पहिले साक्षर राज्य होण्याचा गौरव या राज्याला कसा मिळाला, ही घोषणा झाली याचा काय अर्थ आहे, साक्षरतेमध्ये आघाडीवर असलेली इतर राज्ये कोणती, देशात प्रगतिशील म्हणून गौरविल्या जाणाऱ्या महाराष्ट्राची साक्षरतेत किती उंची आहे, हे प्रश्न उपस्थित झाले आहे. एक मात्र निश्चित की मिझोरमने १०० टक्के साक्षरता गाठून भारताच्या शैक्षणिक क्षेत्रात नवा कीर्तिमान रचला आहे. याचाच अर्थ राज्यात आता कोणतीच व्यक्ती निरक्षर राहिलेली नाही. राज्यातील १५ वर्षांच्या वरील सर्व व्यक्ती वाचणे, लिहिणे आणि गुणाकार, भागाकार करण्यास सक्षम आहेत, असा याचा अर्थ होतो. मिझोरमला हे यश नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत मिळाले आहे. केंद्र सरकारच्या या योजनेने लाखो लोकांना साक्षर बनविण्यात महत्त्वाची भूमिका निभावली आहे. साक्षरता म्हणजे शहाणपणा, साक्षरता म्हणजे बुद्धिवर्धन, साक्षरता म्हणजे प्रगतिशीलतेच्या दृष्टीने टाकलेले पाऊल, अशा कितीतरी व्याख्या केल्या जाऊ शकतात. त्या अर्थाने मिझोरमच्या जनतेने देशाच्या समृद्धीसाठी सुरू असलेल्या यज्ञात आपल्या साक्षरतेच्या समिधा अर्पित केल्या आहेत. आपल्या देशात राष्ट्रीय साक्षरता मिशनने साक्षरतेचे काही निकष ठरविले आहेत. ते निकष पूर्ण केल्यामुळेच मिझोरम ही उंची गाठू शकले आहे. या प्रयत्नांसाठी मिझोरम सरकार, तेथील प्रशासन आणि शिक्षण क्षेत्रातील लोकांनी बजावलेल्या कामगिरीला प्रणाम केला जायला हवा. या मिशननुसार एखादी व्यक्ती आपले नाव लिहू आणि वाचू शकत असेल तर त्या व्यक्तीला साक्षर समजले जाते. १५ ते ५५ वयोगटातील ७५ टक्के लोकांना २००७ पर्यंत साक्षर बनविण्यासाठी १९८८ मध्ये साक्षरता मिशनची सुरुवात झाली होती. त्याचे फायदे मिळाले सुद्धा, पण केवळ साक्षरतेत पहिला क्रमांक मिळाल्याने सर्व समस्या सुटत नाहीत. केवळ लिहिता येणे आणि वाचता येण्याने प्रगतीची उंची गाठता येत नाही. त्यासाठी अजूनही अनेक निकषांची पूर्तता करावी लागते. तरीदेखील साक्षरतेच्या निकषांमध्ये उतरलेल्या मिझोरमने मिळविलेले हे यश यत्किंचितही कमी ठरत नाही.

साक्षरतेच्या क्रमवारीत या राज्यापाठोपाठ गोवा, सिक्कीम, केरळ आणि दिल्लीचा क्रमांक लागतो. २०११ च्या जनगणनेत मिझोरमचा साक्षरता दर ९१.३३ टक्के होता व हे राज्य साक्षरतेत देशात तिसऱ्या क्रमांकावर होते. उल्हास योजनेंतर्गत २०२३ मध्ये या राज्यात सर्वत्र सर्वेक्षण करण्यात आले. त्यात ३,०२६ निरक्षरांची ओखळ पटविली गेली. त्यातील १,६९२ लोकांनी दररोज अभ्यास करून साक्षरतेच्या राज्याच्या प्रगतीत योगदान दिले. यानंतर राज्याची साक्षरता ९८.२० टक्क्यांपर्यंत वाढली. हे काम मुळीच सोपे नव्हते. सरकारने २९२ स्वयंसेवकांची एक चमू तयार केली, ज्यामध्ये विद्यार्थी, शिक्षक, तज्ज्ञ आणि समन्वयकांची नियुक्ती केली गेली. या साऱ्यांनी नेटाने निरक्षरांना साक्षर करण्याची किमया केली. महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांत साक्षरता दरात वाढ झाली आहे. २००१ मध्ये महाराष्ट्राचा साक्षरता दर ७७.२७ होता. २०११ मध्ये वाढून हा दर ८२.९१ झाला. मिझोरमच्या साक्षरता यशात सामुदायिक सहकार्य आणि मिझो संस्कृतीत अंतर्निहित तलॉम्मंगाईहना (निःस्वार्थ सेवा) या भावनेने तर स्थानिक स्वयंसेवी संस्थांनीही महत्त्वाची भूमिका बजावली आहे. दुसरीकडे, मिझोरमचे मुख्यमंत्री लालदुहोमा यांनी ही कामगिरी मागील सर्व सरकारे, शिक्षक आणि नागरिकांच्या सामूहिक प्रयत्नांचे परिणाम असल्याचे नमूद केले आहे. ही फक्त एक आकडेवारी नाही. उलट ते मिझो समाजाच्या ताकदीचे आणि प्रगतीचे प्रतीक आहे. आमचे पुढील ध्येय डिजिटल साक्षरता, आर्थिक जागरूकता आणि उद्योजकता कौशल्यांना प्रोत्साहन देणे, हे असल्याचेही त्यांनी नमूद केले. मागास मिझोरमला साक्षरतेमुळे अनेक फायदे होऊ शकतात. साक्षरतेमुळे लोकांना नवीन माहिती व कौशल्य शिकण्याची संधी मिळू शकते, ज्यामुळे त्यांचे जीवनमान सुधारेल. शिक्षित व्यक्ती अधिक कार्यक्षम व उत्पादक असतात, त्यामुळे गावांची व एकूणच प्रदेशाची आर्थिक प्रगती होणार आहे. साक्षरता वाढल्यामुळे लोकांना आरोग्याबाबत माहिती मिळेल, ज्यामुळे त्यांचे आरोग्य सुधारून आजारांचे प्रमाण कमी होईल. शिक्षणामुळे सामाजिक भेदाभेद कमी होतात व समुदायातील एकात्मता वाढीस लागते. त्या अर्थाने मिझोरममधील जातीय सद्भाव वाढीस लागणार आहे. साक्षरतेमुळे लोकांची आपली समस्या समजून घेण्याची क्षमता वाढते व ते अधिक चांगले निर्णय घेऊ शकतात. शिक्षणामुळे स्थानिक संस्कृती व परंपरा जपल्या जातात आणि नवीन ज्ञान व संस्कृतीचेही दर्शन होते. या सर्व बाबी हमखास मिझोरमच्या विकासातील मैलाचा दगड ठरतील.

पूर्वीच्या काळी निरक्षरांची मोठ्या प्रमाणात फसवणूक व्हायची. मुख्यतः सावकारांकडून या लोकांच्या निरक्षरतेचा फायदा घेऊन, त्यांच्याकडून अंगठ्यांचे ठसे घेऊन मोठ्या प्रमाणात जमिनी, आर्थिक मालमत्ता लाटल्या जात असत. ही बाब ध्यानात येताच सरकारकडून सावकारांवर बंधने टाकली गेली. त्यातून असे प्रकार बरेच कमी झाले. निरक्षरतेमुळे समाजाची वाढ खुंटते. व्यवहारी जगात प्रगतीचे अनेक मार्ग उघडे असतानाही निरक्षर समाज पारंपरिक व्यवहारांमध्येच गुंतून पडतो. त्यामुळे त्यांचे आर्थिक प्रगतीचे मार्ग खुंटतात. बालमजुरी, अल्पवयीन गुन्हेगारी, रस्त्यांवर भीक-मागणारी लहान मुले यांच्या प्रमाणात निरक्षरतेमुळे वाढ होते. देशातील अनेक समृद्ध राज्यांना मागे टाकत १०० टक्के साक्षरतेचा सोपान मिझोरमने सहजासहजी गाठलेला नाही. साक्षरतेमुळे येथील लोकांमध्ये शिक्षणाची पातळी वाढली असली तरी तो उद्देश गाठण्यासाठी त्यांना अनेक लोकोपयोगी उपक्रम राबवावे लागले. राष्ट्रीय आजीवन शिक्षण अभियान या योजनेअंतर्गत ग्रामीण भागात व मागासवर्गीय भागांमध्ये साक्षरता वाढविण्यासाठी विविध शिक्षण शिबिरे तसेच आश्रमशाळा व साक्षरता केंद्रे स्थापन करावी लागली. सरकारने विशेषतः २०१५-२०२० या कालावधीत साक्षरता वाढविण्यासाठी विशेष मोहिमा राबविल्या. या मोहिमांमध्ये घराघरापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला. प्राथमिक शिक्षणावर भर देऊन बालकांना व वयोवृद्धांना प्राथमिक शिक्षण देण्याकडे लक्ष केंद्रित केले गेले. विविध स्वयंसेवी संस्था व साक्षरता स्वयंसेवकांना प्रशिक्षण देऊन त्यांना त्यांच्या भागात साक्षरता मोहिमा राबविण्यास प्रोत्साहन दिले गेले. डिजिटल व मोबाईल मिझोरमच्या साक्षरतेमध्ये सरकारने विविध उपक्रम राबविले. मोबाईल व डिजिटल माध्यमांचा उदाहरणार्थ ई-लर्निंग आणि मोबाईल ॲप्सचा वापर करून साक्षरता वाढविण्याचे प्रयत्न अजूनही सुरू आहेत. शाळा व शिक्षण संस्थांना मदत देऊन साक्षरतेस प्रोत्साहन दिले गेले. साक्षरतेमुळे मिझोरमची होत असलेली प्रगती इतर राज्यांसाठी अनुकरणीय ठरत आहे. ईशान्येकडील राज्ये मागासलेली हे समीकरणही या राज्याने मोडकळीस आणले आहे. साक्षरतेच्या या मिझो मार्गाचे अनुकरण इतर राज्ये कशी करतात, यावर त्यांचे यशापयश ठरणार आहे.

## तंत्रवेध

डॉ. दीपक शिकारपूर

# भारताची डिजिटल भरारी

काही दिवसांपूर्वी एका जपानी पाहुण्याला पुण्यात फिरवत होतो. अनेक ठिकाणे झाल्यावर एका पेरूवाल्याकडे पेरू घ्यायला गेलो. तिथे क्यूआर कोड बघून जपानी पाहुणा थक्क झाला. जगामध्ये असे कुठेही नाही असं तो म्हणाला. अगदी विकसित अमेरिका, जपानमध्येही डिजिटल योजना तळातल्या व्यक्तीपर्यंत पोहोचलेल्या नाहीत. आपल्या देशात आज डिजिटल युग घराघरात पोहोचलेले आढळते. प्रथमतः कॉम्प्युटरमुळे आणि गेल्या पाच-दहा वर्षांमध्ये स्मार्टफोनमुळे बहुतेकांची नव्या डिजिटल सुविधांशी तोंडओळख नक्कीच झाली आहे. नेटबँकिंग, डिजिटल वॉलेट यासारख्या संकल्पनांचा वापर दैनंदिन जीवनात मोठ्या प्रमाणात दिसतो आहे. डिजिटल इंडिया ही भारत सरकारने २०१५ मध्ये सुरू केलेली एक महत्त्वाकांक्षी मोहीम आहे. या मोहिमेचे उद्दिष्ट भारताला एक डिजिटल अर्थव्यवस्था बनवणे, शासकीय सेवांचे डिजिटलीकरण करणे आणि नागरिकांना डिजिटल साक्षर बनवणे हे आहे. भारतासारखा खंडप्राय, विविधतेने नटलेला देश कधीच डिजिटल होणार नाही असे अनेकांचे मत होते. पण या मोहिमेने अफाट यश मिळवले. मोबाईल बँकिंग, डिजिटल पेमेंट, ई-कॉमर्ससारख्या सेवांचा वापर भारतात झपाट्याने वाढला आहे. सरकारी कामकाज 'नेट'वरून वेगात होऊ लागले असल्याने विविध सरकारी योजनांचा लाभ घेणेही शक्य होत आहे. सरकारी कारभाराचा 'इन-लाईन' पासून 'ऑन-लाईन' पर्यंतचा हा प्रवास बऱ्यापैकी वेगाने झाला. डिजिटल इंडिया मोहिमेमुळे भारतात स्टार्टअप्सची संख्या आणि या क्षेत्रात गुंतवणूक, रोजगारनिर्मिती वाढली आहे.

सार्वजनिक सेवांचे वितरण सुधारण्यासाठी आणि ई-गव्हर्न्मेंटच्या युगाची सुरुवात करण्यासाठी विविध राज्य सरकारे आणि केंद्रीय मंत्रालयांनी अनेक ई-गव्हर्नन्स उपक्रम हाती घेतले आहेत. भारतातील ई-गव्हर्नन्स हे सरकारी विभागांच्या संगणकीकरणापासून नागरिक केंद्रितता, सेवा अभिमुखता आणि पारदर्शकता यासारखे शासनाचे बारीकसारीक मुद्दे अंतर्भूत करणाऱ्या उपक्रमांमध्ये सातत्याने विकसित झाले आहे. नोटबंदीचा निर्णय जाहीर झाल्यानंतर अनेक 'पेमेंट ॲप्स'चे पेव फुटले आणि बऱ्याच जणांनी ती स्वतःच्या फोनमध्ये उतरवून घेऊन वापरायला सुरुवातही केली. 'भीम' हे भारत सरकारद्वारे विकसित केलेले एक मोबाईल पेमेंट ॲप आहे. या ॲपच्या माध्यमातून आपण आपल्या बँक खात्यातून पैसे त्वरित आणि सुरक्षितपणे पाठवू शकतो आणि प्राप्त करू शकतो. हे ॲप वापरण्यासाठी आपल्याला फक्त आपले बँक खाते लिंक करणे आवश्यक आहे. हे ॲप विविध भारतीय भाषांमध्ये उपलब्ध असल्यामुळे देशातील प्रत्येक नागरिकाला याचा उपयोग करणे सोपे होते. या ॲपचा वापर करण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही. देशभरातील लाखो व्यापाऱ्यांकडून ते स्वीकारले जाते. रेल्वे ही अनेकांची जीवनदायिनी आहे. आपल्याला बऱ्याचदा रेल्वेने बाहेरगावी जायचे असते. मात्र, वेळेवर तिकीट मिळत नाही. अशा स्थितीत आता रेल्वे (आयआरसीटीसी) ने नागरिकांसाठी 'रेल कनेक्ट' ॲप सादर केले आहे. सर्वाधिक वर्दळीच्या वेळी किंवा आपत्कालीन प्रसंगी तिकीट काढण्यासाठी प्रवाशांना अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते. या समस्यांवर तोडगा म्हणून आयआरसीटीसीने हे ॲप प्रवाशांना उपलब्ध करून दिले आहे. या ॲपद्वारे प्रवासी ऑनलाईन बुकिंग आणि ऑनलाईन पेमेंटसुद्धा करू शकतात. आतापर्यंत १३ कोटीहून अधिक लोकांनी हे ॲप डाऊनलोड केले असून, ४० कोटींहून अधिक तिकिटांचे बुकिंग हे ॲप वापरून झाले आहे




पासपोर्ट, रेशनकार्ड, वाहन परवाना असे आपली ओळख पटवायचे अनेक मार्ग विसाव्या शतकात होते. २००९ मध्ये आपल्या देशात आधार कार्ड हे एक नवीन ओळखपत्र सादर झाले. हे एक महत्त्वपूर्ण ओळखपत्र आहे, जे सूचित करते की तुम्ही भारतीय नागरिक आहात. आधार कार्ड हे भारतातील पहिले विश्वासपात्र ओळखपत्र आहे. आधार कार्ड मिळवण्यासाठी नागरिकांनी ओळख पडताळण्यासाठीची कागदपत्रे (उदा राहत्या पत्त्याचा पुरावा- मतदार आयडी, चालक परवाना, वीज बिल) तसेच बायोमेट्रिक तपशील (जसे बोटांचे ठसे आणि डोळ्यांचे ठसे) सादर करणे आवश्यक असते. त्यानंतर व्यक्तीला एक ओळख क्रमांक दिला जातो, जो तो भारतीय नागरिक असल्याची पुष्टी करतो आणि त्याची सर्व माहिती एका अद्वितीय भारतीय डेटाबेसमध्ये रेकॉर्ड केली जाते. प्रत्यक्ष कार्ड जवळ बाळगायचे नसल्यास 'एम आधार' ॲपचा वापर करता येतो. हे ॲप तुम्ही फोनमध्ये सहज डाऊनलोड करू शकता व याचा कुठेही वापर करणे शक्य आहे. ओळखपत्राचा पुरावा दाखवायचा असतानाही एम आधार उपयोगी येईल. परदेशी प्रवास करायचा असेल तर पासपोर्ट ही अत्यावश्यक गोष्ट ठरते. पहिल्यांदाच परदेशात जाण्याची तयारीच मुळी पासपोर्टपासून सुरू होते; पण त्याखेरीजही पासपोर्ट हा एखाद्या व्यक्तीसाठी महत्त्वपूर्ण पुरावा ठरू शकतो. एके काळी पासपोर्ट काढणे हे परदेशात जाण्याइतकेच कठीण आणि कटकटीचे काम होते; परंतु गेल्या काही वर्षांमध्ये ही प्रक्रिया अतिशय सुटसुटीत आणि जलद बनली आहे. अद्ययावत तंत्रज्ञानाचा अवलंब करत पासपोर्ट विभागाने पासपोर्ट मिळवण्याची प्रक्रिया ऑनलाईन केली आहे. याचाच पुढचा भाग म्हणून आता स्मार्टफोनवरून पासपोर्ट मिळवणे सोपे झाले आहे. भारतीय नागरिकांना जलद, सहज आणि पारदर्शकपणे पासपोर्ट मिळवता यावा, यासाठी केंद्र सरकारने टाटा कन्सल्टन्सीच्या सहकार्यातून 'पासपोर्ट सेवा' हे ॲप सुरू केले आहे.

२०२५ पर्यंत डिजिटल इंडिया मोहिमेने अनेक महत्त्वपूर्ण अंगांनी यश मिळवले आहे. पहिले म्हणजे डिजिटल पेमेंटमध्ये वाढ झाली आहे. युनिफाईड पेमेंट्स इंटरफेसद्वारे होणारे व्यवहार डिसेंबर २०२४ मध्ये २३,२४,६९९.९१ कोटींवर पोहोचले आहेत. हेच तंत्रज्ञान आता सिंगापूर, भूतान, नेपाळ, श्रीलंका, फ्रान्स आणि मॉरिशस यासारख्या ७ देशांमध्ये लाईव्ह व्यवहार सुलभ करत आहे. दुसरे म्हणजे मार्च २०२३ पर्यंत १३६.६५ कोटींहून अधिक आधार कार्ड जारी करण्यात आली आहेत. जानेवारी २०२५ मध्ये आधार फेस ऑथेंटिकेशन सुविधेने शंभर कोटींचा टप्पा ओलांडला आहे. तिसरे म्हणजे १ फेब्रुवारी २०२५ पर्यंत डिजिलॉकर वापरकर्त्यांची संख्या ४६.५२ कोटींवर पोहोचली आहे. चौथे म्हणजे जानेवारी २०२५ पर्यंत २.१४ लाख ग्रामपंचायती इंटरनेटद्वारे जोडल्या गेल्या असून ६.९२ लाख किलोमीटर लांबीची ऑप्टिकल फायबर केबल टाकण्यात आली आहे. १.०४ लाख वाय-फाय हॉटस्पॉट ग्रामपंचायतींमध्ये स्थापित करण्यात आले आहेत. या ॲपने ७.१ कोटींहून अधिक वापरकर्त्यांना ३२ राज्यांमधील २०७७ सरकारी सेवांशी जोडले असून २३ भाषांमध्ये समर्थन पुरवले आहे. हे जगातील सर्वांत मोठे शिक्षण तंत्रज्ञान प्लॅटफॉर्म ठरले आहे. 'डिजिटल इंडिया' मोहिमेने पायाभूत सुविधांच्या विकासावर, डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन देण्यावर, सरकारी सेवा ऑनलाईन उपलब्ध करण्यावर आणि नागरिकांचे डिजिटल सक्षमीकरण करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. यामुळे शहरी आणि ग्रामीण भागातील डिजिटल दरी कमी होण्यास मदत झाली असून नागरिकांच्या जीवनात सुधारणा झाली आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

नंदकिशोर काथवटे

# फुकट मिळणाऱ्या योजनांचे वास्तव

आजच्या घडीला शासनाकडून विविध प्रकारच्या मोफत (फुकट) योजनांची अंमलबजावणी केली जात आहे. गरबि, दुर्बल व वंचित घटकांना मदत करण्यासाठी अशा योजना उपयुक्त ठरतात. शिक्षण, आरोग्य, अन्नधान्य, वीज, गॅस, निवारा आदी मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी केंद्र व राज्य सरकार अनेक मोफत योजना राबवते. उदाहरणार्थ, प्रधानमंत्री अन्न योजना, उज्ज्वला गॅस योजना, मोफत आरोग्य विमा योजना, शालेय पोषण आहार योजना, मोफत वीज/पाणी आदी योजनांचा समावेश होतो. परंतु, या फुकट योजनांमुळे काही गंभीर समस्या उद्भवत आहेत. सर्वसामान्य जनतेमध्ये श्रम न करता मिळविण्याची मानसिकता वाढू लागली आहे. परिणामी, काम करण्याची प्रेरणा कमी होते आणि दीर्घकालीन सामाजिक-आर्थिक विकासावर त्याचा परिणाम होतो. याशिवाय, या योजनांतून मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार देखील होताना दिसतो. योजनेच्या लाभार्थींची यादी तयार करताना अपात्र व्यक्तींना समाविष्ट करणे, निधीचा अपव्यय करणे, स्थानिक राजकीय नेत्यांचा हस्तक्षेप हे सर्व प्रकार सर्रास घडतात. गरजूंना लाभ मिळण्याऐवजी, बड्या मंडळींना याचा फायदा होताना दिसतो. मोफत योजना अनेकदा राजकारणाचे साधन बनतात.

निवडणुकीच्या काळात मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध 'मोफत' घोषणांची बरसात केली जाते. शिक्षण, आरोग्य, वीज किंवा इंटरनेट मोफत देण्याच्या आश्वासनांचा उपयोग मतांसाठी केला जातो. यावेळी अगदी निवडणुकीच्या तोंडावर घोषित करण्यात आलेली लाडकी बहीण योजना ही त्यातीलच एक आहे. या योजनेमुळे महाराष्ट्र सरकारला प्रचंड आर्थिक ताण सहन करावा लागत आहे. अशा योजनांमुळे इतर कल्याणकारी योजनांवर खर्च झालेल्या निधीची पूर्तता करताना अडचणी येतात. लाडकी बहीण योजनेमुळे सरकारचे आर्थिक बजेट कोलमडले असून कंत्राटदारांची देयके देण्यात सरकारकडून उशीर केला जात आहे. वास्तविक गरज आणि आर्थिक शाश्वतता लक्षात न घेता योजना जाहीर केल्या जातात, ज्या पुढे अर्थव्यवस्थेवर ताण आणतात. अनेक वेळा खऱ्या गरजू व्यक्ती योजनांपासून वंचित राहतात, कारण त्यांना माहिती नसते, किंवा मध्यस्थ व स्थानिक अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचारामुळे त्यांना लाभ मिळत नाही. काहीवेळा तर ओळखीच्या लोकांना प्राधान्य दिले जाते. त्यामुळे या योजनांचा उद्देश मोडीत निघतो. या योजनांचा उद्देश गरजू लोकांपर्यंत मूलभूत सुविधा पोहोचवणे हा आहे. मोफत योजना हे एक अत्यंत महत्त्वाचे सामाजिक कल्याणकारी साधन असले तरी त्याचे अनेक सकारात्मक व नकारात्मक पैलू आहेत. फुकट मिळणाऱ्या शासकीय योजनांचे स्वरूप, फायदे, नुकसान, त्यातून उद्भवणाऱ्या समस्या, राजकारण, भ्रष्टाचार आणि त्या योजना बंद झाल्यास निर्माण होणाऱ्या समस्या याचा देखील विचार करण्याची गरज आहे.

अशा योजना गरजूंना जीवनावश्यक सुविधा मिळवून देतात. मात्र आता याच योजना भ्रष्टाचाराचे कुरण ठरत आहे. या उद्देशाने या कल्याणकारी योजना अमलात आणल्या तो उद्देश मात्र पूर्ण होताना दिसत नाही. ज्याला गरज आहे त्याला त्या योजनेचा लाभ निश्चितच मिळायला हवा. मात्र ज्याला गरज नाही असेही लोक शासनाच्या या मोफत योजनांचा लाभ घेत आहे. लाडकी बहीण ही योजना चांगली असली तरी या योजनेचे गरजू लाभार्थी कोण आहेत आणि ही योजना लाटणारे, या योजनेसाठी पात्र नसणारे शोधण्याची खरंच गरज आहे. योजना गरिबांसाठी आहे मात्र या योजनेचा लाभ खरे लाभार्थी न घेता इतर लोक लाटू लागले आहेत. योजना मोफत आहे म्हणून आयतेच सरकारकडून सर्व काही मिळत असल्याने श्रम न करण्याची वृत्ती जी समाजात बळावत चालली आहे हे देखील देशहिताच्या दृष्टीने चुकीचे आहे. या सगळ्यांना जबाबदार कोण? या सगळ्याला जबाबदार ठरतात ते प्रशासनातील भ्रष्ट कर्मचारी, राजकारणी आणि एकप्रकारे आम्ही नागरिक देखील. कारण आम्ही पारदर्शकतेची मागणी करत नाही किंवा योग्य ठिकाणी तक्रार देखील करत नाही. जर अचानक या सर्व मोफत योजना बंद झाल्या, तर अनेक गरजूंना मोठा फटका बसेल. गरीब आणि श्रमिक वर्ग संकटात सापडेल. त्यांना मूलभूत सेवा मिळणे कठीण होईल. त्यामुळे या योजना पूर्णपणे बंद करणे योग्य नाही, परंतु त्यांचे स्वरूप सुधारण्याची नक्कीच गरज आहे. फुकट योजनांचा उद्देश चांगला असला तरी, त्यांची अंमलबजावणी पारदर्शक, गरजू केंद्रित आणि आर्थिकदृष्ट्या शाश्वत असावी. भ्रष्टाचाराविरोधात कठोर कारवाई झाली पाहिजे. गरजू आणि पात्र लोकांपर्यंतच लाभ पोहोचविणे हेच खरे प्रशासनाचे यश ठरेल.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

श्यामकांत जहागीरदार

# काँग्रेसचे 'हात' दाखवून अवलक्षण

'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी झाल्यानंतर जगात पाकिस्तानचा पर्दाफाश करण्यासाठी विविध देशांत सात संसदीय प्रतिनिधी मंडळ पाठवण्याचा महत्त्वपूर्ण आणि धोरणात्मक निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने घेतला आहे. विशेष म्हणजे हे प्रतिनिधी मंडळ सर्वसमावेशक राहणार आहे, म्हणजे काँग्रेससह विविध विरोधी पक्षांच्या नेत्यांचाही त्यात समावेश करण्यात आला आहे. मोदी सरकारने विरोधी पक्षांच्या खासदारांचा फक्त या प्रतिनिधी मंडळात समावेशच केला नाही तर यातील एका प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व काँग्रेसचे शशी थरुर यांच्याकडे सोपवले आहे. विशेष म्हणजे या सातपैकी दोनच प्रतिनिधी मंडळांचे नेतृत्व भाजपा सदस्यांकडे आहे, उर्वरित पाचचे नेतृत्व भाजपेतर पक्षांच्या नेत्यांकडे सोपविण्यात आले आहे.

संयुक्त राष्ट्रात मोठ्या पदावर शशी थरुर यांनी काम केले असल्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात त्यांचे वेगळे महत्त्व आहे. इंग्रजी भाषेवर त्यांचे प्रभुत्व आहे. त्यांच्याजवळ वक्तृत्वही आहे, तसेच मुत्सद्दी म्हणून त्यांची जगात ओळख आहे. महत्त्वाचे म्हणजे जगात त्यांना मान्यताही आहे. त्यामुळे दहशतवादाने बरबटलेला पाकिस्तानचा काळा चेहरा जगात उघडा पाडण्यासाठी थरुर यांच्यासारखा दुसरा योग्य वक्ता नाही. या प्रतिनिधी मंडळात सहभागी करण्यासाठी नावे सुचवा अशी औपचारिक विनंती सरकारने काँग्रेससह अन्य पक्षांना केली होती. सरकारने काँग्रेसला चार नावे मागितली होती. मात्र काँग्रेस पक्षाने अंतर्गत राजकारण करत लायक नेत्यांची नावे वगळत 'ना'लायक नेत्यांची नावे पाठवली होती. काँग्रेसकडून अपेक्षित नावे न आल्यामुळे मोदी सरकारने आपल्या अधिकारात शशी थरुर यांच्यासह गुलाम नबी आझाद, आनंद शर्मा आणि सलमान खुर्शीद यांचा या प्रतिनिधी मंडळात समावेश केला. थरुर काँग्रेसमध्ये गांधी घराण्याचे विरोधक म्हणून ओळखले जातात. मल्लिकार्जुन खडगे यांच्याविरोधात त्यांनी काँग्रेस अध्यक्षपदाची निवडणूकही लढवली होती. यात त्यांचा पराभव झाला, ही गोष्ट वेगळी. त्यामुळे खडगे आणि गांधी घराणे या दोघांनाही थरुर यांचे नाव चालणार नव्हते. त्यामुळे थरुर यांना डावलण्यात आले. काँग्रेसला गुणांची पारख नसली तरी मोदी यांना चांगल्या आणि कर्तृत्ववान माणसांची पारख आहे. सरकार जगाच्या वेगवेगळ्या देशात सात प्रतिनिधी मंडळे पाठविणार असून त्यांचे नेतृत्व भाजपाचे रविशंकरप्रसाद आणि बैजयंत पांडा, राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुप्रिया सुळे, शिवसेना शिंदे गटाचे डॉ. श्रीकांत शिंदे, द्रमुकच्या कनिमोझी आणि जदयूचे संजयकुमार झा करणार आहेत. विशेष म्हणजे मोदी सरकारने थरुर यांचा या प्रतिनिधी मंडळात समावेश केल्यानंतर, थरुर यांचे नाव आम्ही सुचवले नव्हते, अशी प्रतिक्रिया व्यक्त करत काँग्रेसने त्यांच्या नावावर एकप्रकारे आक्षेपही घेतला होता. असे करत गांधी घराणे आणि काँग्रेस नेतृत्वाने आपले हसे करून घेतले. काँग्रेसने गौरव गोगोई, राजा बरार, डॉ. सय्यद नासीर हुसेन आणि आनंद शर्मा अशी चार नावे पाठवली होती. सरकारने यातील तीन नावे फेटाळून लावत फक्त आनंद शर्मा यांचे नाव कायम ठेवले. जगात भारताची बाजू मांडण्यासाठी असे प्रतिनिधी मंडळ पाठवण्याची ही पहिली वेळ नाही. काँग्रेस सरकारच्या काळातही याआधी एक-दोन वेळा भारताने असे प्रतिनिधी मंडळ पाठवले होते आणि त्यात विरोधी पक्षाच्या नेत्याचा समावेश केला होता. राजीव गांधी पंतप्रधान असताना १९८८ मध्ये एक प्रतिनिधी मंडळ आपल्याला अमेरिकेत पाठवायचे होते. भाजपाचे अटलबिहारी वाजपेयी यांना काही शारीरिक त्रास होता आणि त्यावर अमेरिकेत ऑपरेशन करणे आवश्यक होते. पण काही आर्थिक अडचणींमुळे ऑपरेशनसाठी अमेरिकेत जाणे वाजपेयींना शक्य होत नव्हते. त्यामुळे पंतप्रधान असलेल्या राजीव गांधींनी अटलबिहारी वाजपेयी यांचा या प्रतिनिधी मंडळात जाणीवपूर्वक समावेश केला, जेणेकरून वाजपेयी आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताची बाजू प्रभावीपणे मांडू शकतील, तसेच परत येताना आपले ऑपरेशनही करून घेऊ शकतील. राजीव गांधींची १९९१ मध्ये हत्या झाल्यानंतर अटलबिहारी वाजपेयी यांनीच ही बाब पत्रकारांना सांगितली होती.



काँग्रेसच्याच सरकारने दुसऱ्यांदाही अटलबिहारी वाजपेयी यांना भारताची बाजू मांडण्यासाठी संयुक्त राष्ट्रमध्ये पाठवले होते. २७ फेब्रुवारी १९९४ ला संयुक्त राष्ट्र मानवाधिकार आयोगाच्या बैठकीत पाकिस्तानने इस्लामिक देशांच्या संघटनेच्या माध्यमातून काश्मीरमध्ये मानवाधिकारचे उल्लंघन होत असल्याचा प्रस्ताव मांडला होता. हा प्रस्ताव यदाकदा पारित झाला असता तर जगात भारताची नाचक्की झाली असती. त्यामुळे संयुक्त राष्ट्र मानवाधिकार आयोगाच्या परिषदेत भारताची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांनी अटलबिहारी वाजपेयी यांना पाठवण्याचा निर्णय घेतला, तेव्हा वाजपेयी फक्त साधे खासदार होते. वाजपेयींच्या नेतृत्वातील प्रतिनिधी मंडळात तत्कालीन परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री सलमान खुर्शीद यांचाही समावेश होता. विशेष म्हणजे यात काही गैर आहे, असे त्यावेळी पंतप्रधान असलेल्या नरसिंहराव यांनाही वाटले नाही आणि साधे खासदार असलेल्या वाजपेयींच्या नेतृत्वात आपण कसे जायचे असा प्रश्न खुर्शीद यांनाही तेव्हा पडला नाही. वाजपेयी यांनी अतिशय प्रभावीपणे मानवाधिकार आयोगाच्या बैठकीत भारताची बाजू मांडत काश्मीरमध्ये मानवाधिकारांचे उल्लंघन होत असल्याचा पाकिस्तानचा आरोप खोडून काढला होता. त्यामुळे हा प्रस्ताव बारगळला. अटलजी विरोधी पक्षांचे नेते असले तरी जेव्हा देशाचा मुद्दा आला तेव्हा अटलजी आमचे नेते होते, असे सलमान खुर्शीद यांनी तेव्हा म्हटले होते. देशहिताच्या मुद्यावर तेव्हा असा आदर्श घालून देणाऱ्या काँग्रेसच्या नेत्यांनी आज परदेशात आपल्या देशाची बाजू मांडण्यासाठी आपल्या पक्षाच्या नेत्याच्या नावालाच पक्षांतर्गत राजकारणातून विरोध केला.

परदेशात भारताची बाजू मांडण्यासाठी पाठवण्यात येणाऱ्या प्रतिनिधी मंडळात नाव निवडण्याचा अधिकार सरकारचा असतो, विरोधी पक्षांनी सुचवलेली नावे मान्य केलीच पाहिजे, असे कोणतेही बंधन सरकारवर नसते. १९८८ आणि १९९४ ला भाजपाने अटलबिहारी वाजपेयी यांचे नाव सुचवले नव्हते, तर तेव्हाच्या काँग्रेस सरकारनेच अटलबिहारी वाजपेयी यांची निवड त्यांच्या कर्तृत्वावर केली होती. त्यामुळे या मुद्यावरून सरकारवर टीका करण्याचा कोणताही नैतिक अधिकार काँग्रेसला नाही. या मुद्यावरून काँग्रेस जेवढी आदळआपट करेल, तेवढे काँग्रेसचे नुकसान आणि बदनामी होणार आहे. त्यामुळे आता आमच्या पक्षाच्या नेत्याने परदेशात भारताची बाजू प्रभावीपणे मांडली, याचे श्रेय घेण्याचा फुकाचा प्रयत्न करत काँग्रेसने आपली झाकली मूठ सव्वा लाखाची ठेवली पाहिजे, त्यातच त्याचे हित आहे.

९८८१७१७८१७

## प्रेरक विचारपुष्प

'तरुण भारत'ने 'विचारपुष्प' या शीर्षकाखाली पुण्यपुरुषांचे संदेश देण्याचा उपक्रम सुरू केला आहे. हा उपक्रम अभिनंदनीय आहे. या थोर पुरुषांनी आपले संपूर्ण आयुष्य देशाच्या उत्थानासाठी समर्पित केले. हा देश हिंदूंचा आहे. हिंदूची परिभाषा देखील त्यांनी स्पष्ट शब्दांत जगासमोर मांडली. जे या मातृभूमीला आपले मानतात ते सर्व हिंदू अशी सरळ आणि सोपी परिभाषा त्यांनी केली. सर्व जातींचे, सर्व धर्मांचे आणि सर्व पंथांच्या नागरिकांना आपल्यात सामावून घेण्याची क्षमता हिंदू धर्मात आहे. हेच विचारधन सोबत बाळगत या पुण्यपुरुषांनी आपले जीवन देशासाठी खर्ची घातले. संसाराच्या मोहपाशापासून ते दूर राहिलेत. त्याग, तपस्या आणि बलिदानाचे ज्वलंत उदाहरण म्हणून या महानुभावांचा उल्लेख वारंवार करता येईल. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना १९२५ मध्ये झाली. संघाला येत्या २ ऑक्टोबरला १०० वर्षे पूर्ण होतील. जागतिक स्तरावर अशी एकही संघटना नाही ज्यांनी १०० वर्षे अविरत संघ शाखेच्या माध्यमातून देशसेवा करण्याचे व्रत घेतले आणि निरंतर त्याचे पालन केले. विचारपुष्प या सदराखाली ज्यांचे संदेश प्रकाशित होत आहेत ते सर्व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पाईक आहेत. त्यामुळे वंदनीय आहेत. नवीन पिढीला त्यांचे हे संदेश मार्गदर्शक ठरू शकतात, त्यांच्या आयुष्याला दिशादर्शन देणारे ठरू शकतात. याच पुण्यपुरुषांच्या मार्गदर्शनाखाली लाखो स्वयंसेवक घडलेत जे आज विविध क्षेत्रांत निष्ठेने कार्य करीत आहेत आणि भारत भूमीच्या सर्वांगीण विकासात आपले योगदान देत आहेत.

**वसंत पिंपळापुरे**/नागपूर

## वाचक पत्रे

### 'नरकातला स्वर्ग'मध्ये मूळ मुद्याला बगल

संजय राऊत यांनी 'नरकातला स्वर्ग' हे पुस्तक लिहून प्रकाशित केले आहे आणि त्यात बरेच गौप्यस्फोट(!) केल्याचा दावा केला आहे. मात्र हे पुस्तक म्हणजे मूळ मुद्याला बगल देऊन केलेले एक विषयांतरच आहे. मुख्य विषय असा आहे की, २०१९ मधील विधानसभा निवडणुकीसाठी तत्कालीन शिवसेना आणि भाजप यांची निवडणूकपूर्व युती झालेली होती. त्या निवडणुकीत काँग्रेस व राष्ट्रीवादी काँग्रेस यांच्याबद्दल तिरस्कार असलेल्या हिंदुत्वप्रेमी मतदारांनी युतीला भरभरून मतदान करून स्पष्ट बहुमत दिले होते. मात्र निवडणुकीचे निकाल जाहीर होताच उद्धव ठाकरे यांनी पलटी मारली. राऊतांनी आम्हाला सर्व पर्याय खुले आहेत असे जाहीर केले. त्या दिवसांत देवेंद्र फडणवीस यांचा फोनदेखील मातोश्रीवर घेतला जात नव्हता! प्रत्यक्षात त्या गद्दारीची सुरुवात २०१९ मधील लोकसभा निवडणुकीच्या नंतर लगेचच झाली होती. त्या निवडणुकीतील मतदानाचा विधानसभा मतदारसंघनिहाय विचार करता, युतीला २८८ पैकी जवळपास २२० मतदारसंघांत मताधिक्य मिळाले होते. त्यामुळे त्यानंतरच्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सत्तेत येण्याची सुतराम शक्यता नव्हती. तेव्हापासूनच एजंट राऊत यांना हाताशी धरून कटकारस्थान रचण्यात आले. शिवसेनेने मुख्यमंत्रिपदाच्या लालसेपायी, मतदारांनी स्पष्टपणे नाकारलेल्या काँग्रेस-राष्ट्रवादीशी अनैतिक आघाडी करून सत्ता स्थापन केली. त्यासाठी उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनी १०, जनपथ येथे जाऊन सोनिया गांधींपुढे लोटांगण घालून प्रखर हिंदुत्वाला सोडचिठ्ठी दिली आणि मराठी अस्मिता खुंटीला टांगली. पुढे योग्य वेळ पाहून एकनाथ शिंदे यांनी बाळासाहेबांच्या हिंदुत्ववादी शिवसेनेचे पुनरुज्जीवन केले आणि भाजपसोबत सरकार स्थापन केले. तेव्हा राऊतांनी आता मनगटे चावून काय उपयोग आहे?

**अविनाश वाघ**/९३२२९९६२४३

### ब्लॅकआऊट किंवा प्रकाशबंदी

युद्धकाळात शत्रूला दिसू नये म्हणून सर्व दिवे बंद करण्याचा काळ म्हणजे ब्लॅकआऊट. प्रकाशबंदी हा अगदी तंतोतंत प्रतिशब्द आहे. मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात देशातील अनेक शहरांनी ही स्थिती अनुभवली आहे. १९७१ साली युद्धपरिस्थितीत काही काळासाठी ब्लॅकआऊट झाल्याचे अनेकांना स्मरत असेलच. त्यावेळी पथदिवे बंद ठेवणे , सर्व खिडक्यांच्या काचांवर काळा कागद चिकटवणे, वाहनांच्या हेडलाईटच्या वरच्या अर्ध्या भागावर काळे स्टिकर लावणे यासारखे उपाय संपूर्ण देशात करण्यात आले. काही शहरांत संपूर्ण प्रकाशबंदी पण करण्यात आली. ब्लॅकआऊटमुळे आजकालच्या आधुनिक अत्यंत वेगवान विमानांना टार्गेट लॉक करणं शक्य होत नाही. मिसाईल आणि ड्रोन यांना नष्ट करणाऱ्या यंत्रणा अंधारात अधिक प्रभावीपणे कार्य करू शकतात याचा अनुभव आपण नुकताच घेतलेला आहे. या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी सरकारने अनेक ठिकाणी मॉक ड्रील आयोजित केल्या होत्या. ब्लॅकआऊटच्या प्रसंगी प्रत्येक नागरिकाने सरकारला आणि प्रशासनाला सहकार्य करणे गरजेचे आहे. सैन्यदलांना आणि सरकारला जबाबदार नागरिक म्हणून मदत व सहकार्य करणे हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

# भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांचे बेमुदत उपोषण; ७ दिवस झाले तरी शासनाकडून दुर्लक्षच

## शेतकऱ्यांसह इतर नागरिकांची जमिनी-जागा मोजणीची गैरसोय!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मे-**

महाराष्ट्र राज्य भूमि अभिलेख, कर्मचारी संघटना पुणे विभाग यांनी केलेल्या आवाहनानुसार सोलापूर येथील भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांनी गेल्या ७ दिवसांपासून बेमुदत उपोषण सुरु केले असून, यामुळे शासनाचा कोट्यवधीचा महसूल बुडाला असून, आता पुणे विभागाबरोबर नागपूर, अमरावती विभागाचे कर्मचारीही या संपाचे हत्यार उपसणार असल्याची माहिती भूमी अभिलेख कर्मचारी संघटना अध्यक्ष ज्ञानेश्वर पवार यांनी आज (दि. २१) दिली. दरम्यान, आंदोलनामुळे शेतकऱ्यांसह इतर नागरिकांचेही मोठे नुकसान होत आहे. तरी शासनाकडून दुर्लक्ष होत आहे.



महाराष्ट्र राज्य भूमि अभिलेख कर्मचारी संघटना, पुणे विभाग यांनी भूमि अभिलेख विभागातील कर्मचारी यांचे पदाची कार्यकर्तव्य पार पाडत असताना येणा-या अडीअडचणी बाबत दि. २५/०२/२०२५ रोजी उपसंचालक भूमि अभिलेख पुणे, प्रदेश पुणे यांना निवेदन सादर केले होते. त्यानुसार त्यांचेकडून दि. २७/०२/२०२५ रोजी कर्मचारी संघटने सोबत मिटींग आयोजित केली होती. सदर मिटींग मध्ये त्यांनी कर्मचारी संघटनेस सोमवार, दि. ०३/०३/२०२५ रोजी लेखी आश्वासन देणेचे मान्य केले होते. त्यानुसार लेखी आश्वासन मिळाले परंतु संदर्भीय लेखी आश्वासनामध्ये निवेदनातील २७ मुदयांपैकी केवळ परिपत्रकाप्रमाणे १२ मोजणी प्रकरणे वाटप करणेबात (१०० दिवसाचे लक्ष्य पूर्ततेनंतर) भाष्य करणेत आले आहे. १०० दिवसाच्या कार्यक्रमामध्ये कामाची पावती म्हणून कर्मचारी यांनी केलेल्या कामाबददल मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री यांनी भूमि अभिलेख विभागास व्दितीय क्रमांक देवून गौरव केलेला आहे. परंतु सुधारीत वेतनश्रेणी, या प्रमुख मागणीबाबत कोणतीही टिप्पणी करणेत आली नाही.भूमी अभिलेख विभागात काम करणाऱ्या भूकरमापक, परिरक्षण भूमापक, शिरस्तेदार या कर्मचाऱ्यांना तांत्रिक / सुधारीत वेतन श्रेणी लागू करावी आणि त्या प्रमाणे वेतन अदा करणेत यावे अशी सन २०१४ पासून प्रलंबित असणारी मागणी अद्यापही शासनाकडून मान्य करण्यात आलेली नाही. या करिता राज्यात अस्तित्वात असणाऱ्या सहा प्रशासकीय (कोकण/पुणे/नाशिक/ अमरावती/नागपूर/मराठवाडा) या विभागातील विविध भूमि अभिलेख संघटनां नी वेळोवेळी शासना कडे वारंवार निवेदने देऊन देखील सरकारने सदर म ागणी ची दखल आज अखेर त्यामुळे भूमि अभिलेख खात्यातील कर्मचारी हा उद्विग्न होवून शेवटचा पर्याय म्हणुन संपाचा मार्ग अवलंबत आहे. तांत्रिक कौशल्याच्या व प्रशिक्षणाच्या आधारे सदर विभागातील कर्मचारी हा काम करत असूनही, त्यांना तांत्रिक वेतनश्रेणी देण्यात आलेली नाही. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष असून, मनोबल कमी होत आहे.

शासनास वेळोवेळी सादर केलेल्या निवेदने तसेच खातेप्रमुख यांचे सोबत झालेल्या बैठका निष्फळ ठरलेने शासन कर्मचाऱ्याच्या मागण्या बाबत उदासिनतेच्या भूमिकेत असलेचे स्पष्ठ होते. त देणेत आलेल्या निवेदना मध्ये नमुद केले प्रमाणे यापूर्वीच शासनास सदरच्या संपा बाब २/३ विषयाचे गांभीर्य शासनाचे लक्ष वेधुन वेळेवेळी निदर्शनास आणून दिलेले आहे. तरी सुध्दा कोणत्याही प्रकारची दखल घेण्यास तयार नसलेने शासनास राज्यस्तरीय संघटने कडुन दिलेल्या निवेदन अन्वये एक महाचा कालावधी उलटून देखील, कर्मचारी यांच्या मागण्या शासना कडून मंजुर करणेत आल्या नाहीत. यामुळे गेल्या ७ दिवसांपासून राज्यभरात हे कर्मचारी आंदोलन करीत आहेत.

## महत्वाचे...



### महापालिकेच्या वतीने मातोश्री निलव्वाबाई धनशेट्टी यांना अभिवादन

**सोलापूर, दि. २१ मे-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने मातोश्री निलव्वाबाई धनशेट्टी यांच्या पुण्यतिथी निमित्त जोडभावी पेठ येथील निवासस्थानी त्यांच्या समाधीस कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी ओमप्रकाश वाघमारे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवकुमार धनशेट्टी, सुलक्षणा धनशेट्टी, शुभम धनशेट्टी, वसुमती धोडकुंडे, श्रीतेज धोडकुंडे आदी मान्यवर उपस्थिती होते.



### मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात माजी पंतप्रधान राजीव गांधी यांना अभिवादन

**सोलापूर, दि. २१ मे-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक संतोष बुलबुले, सुरेश कासार,निलोफर सय्यद, महेश वालावलकर, सारंग अंजीखाने, अमोल गायकवाड, ताहीर बिराजदार, सचिन जाधवर, भालचंद्र साखरे, सायली ढोले आदी उपस्थित होते.

# पंचांगकर्ते मोहन दाते यांना यंदाचा ब्राह्मण भूषण पुरस्कार

**सोलापूर, दि. २१ मे -**

''आम्ही सारे ब्राह्मण'' या संस्थेच्या वतीने देण्यात येणारा 'ब्राह्मण भूषण पुरस्कार पंचांगकर्ते मोहन दाते यांना येत्या रविवारी (२५ मे) प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे संचालक भालचंद्र कुलकर्णी, संजय ओर्पे व माधुरी कुलकर्णी यांनी आज पुणे येथे दिली.

तसेच गेल्या २२५ वर्षातील विविध क्षेत्रातील राष्ट्रकार्यासाठी समर्पित कर्तृत्ववान महाराष्ट्रीय ब्राह्मणांच्या 'ब्राह्मण रत्ने या चरित्रकोश ग्रंथाच्या नव्या आवृत्तीचे दोन खंडात प्रकाशन होणार असून वंदना धर्माधिकारी लिखित यशोगाथा-ब्राह्मण स्त्रियांच्या या पुस्तकाचे प्रकाशन देखील यावेळी करण्यात येणार आहे.

येत्या रविवारी सकाळी १०.३० वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरुड येथे होणाऱ्या या समारंभामध्ये राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते हे पुरस्कार

## 'रविवारी वितरण : 'ब्राह्मण रत्ने'' चरित्रकोश ग्रंथाचे प्रकाशनही होणार!

प्रदान केले जाणार असून परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आशिष दामले, ज्येष्ठ उद्योजक प्रमोद चौधरी, उद्योजक हृषिकेश कुलकर्णी हे प्रमुख अतिथी म्हणून तर कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर राहणार आहेत.



ब्राह्मण भूषण पुरस्कायाबरोबरच यंदाचा ''इंदुमती-वसंत करिअर भूषण'' पुरस्कार युवा उद्योजक निर्मल देशपांडे यांना, ''डॉ. रामचंद्र देखणे स्मृती कीर्तनकार'' पुरस्कार युवा कीर्तनकार पुरस्कार ह.भ.प. सौ. किरण कुलकर्णी यांना तर ब्राह्मण समाजासाठी गेली ९८ वर्षे काम करणाऱ्या श्री शुक्ल यजु:शाखीय म ाध्यंदिन महाराष्ट्रीय ब्राह्मण सभा, पुणे (याज्ञवल्क्य आश्रम) या संस्थेला ''भगवान परशुराम ब्राह्मण संस्था'' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. पुरस्काराचे यंदाचे १२ वे वर्ष असून मानपत्र, पुणेरी पगडी, रोख रक्कम आणि भेटवस्तू असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

पुरस्काराबाबतची अधिक माहिती देतांना कुलकर्णी म्हणाले की, महाराष्ट्रात दाते पंचांगाला ११० वर्षांची समृद्ध परंपरा आहे. पंचांगाचा संबंध थेट खगोलशास्त्राशी असून याचा सर्व प्रकारच्या नियोजनांमध्ये प्रभावी उपयोग केला जातो. ही परंपरा यशस्वीपणे चालवणारे मोहन दाते यांना यंदाच्या ''ब्राह्मण भूषण'' पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे. दररोज सुमारे ५० हजारांहून अधिक पोळ्यांची निर्मिती करणारा युवा उद्योजक निर्मल देशपांडे यांना इंदूमती-वसंत करिअर भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. ज्येष्ठ करिअर समुपदेशक डॉ. श्रीराम गीत यांनी त्यांच्या आई-वडिलांच्या स्मृती जपण्यासाठी हा पुरस्कार सुरु केला आहे.



## पु. अ. होळकर यांच्या जयंतीनिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापुर, दि. २१ मे-**

श्री गुरु बिरलिंगेश्वर सहकारी सोसायटी, होटगी यांच्यातर्फे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त होटगी गावातील धनगर समाजातील इयत्ता दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. पुण्यश्लोक राजम ता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उपसरपंच पंडित लांडगे, सोसायटी अध्यक्ष विठ्ठल लांडगे, कल्याणी कोकरे, तंटामुक्त अध्यक्ष मंगेश सोनकडे ग्रामपंचायत सदस्य महेश व्हटाणे, मलकरी सोनकडे, शीलवंत सोनकडे, कामणा सोनकडे, शिवप्पा लांडगे आदींच्या उपस्थितीत गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान चिन्ह, अहिल्यादेवी होळकर यांचे पुस्तक व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कल्याणी कोकरे यांनी आपल्या मनोगतातून सोसायटी मार्फत लांडगे बंधू यांनी करीत असलेल्या कार्याचे कौतुक करून विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे ज्ञान अवगत करणे हे काळाची गरज आहे असे सांगितले. विजयकुमार लांडगे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या युगात उतरावे व स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी अथक परिश्रम करून स्वतःची ओळख निर्माण करावे असे सांगितले. सौदर्या सोनकडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन लांडगे यांनी केले.


**जाहीर नोटीस**

सोलापूर येथील तमाम लोकांस विशेषतः शहर सोलापूर व मैंदर्गी येथील सर्व रहिवासीयांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** डि व सब डी सोलापूर तालुका अक्कलकोट पैकी मैंदर्गी नगर परिषद मैंदर्गी येथील संगमेश्वर गल्ली झोपडपट्टी, धनगर गल्ली बिरलिंगेश्वर मंदिर जवळ यांसी नवीन वार्ड क्रं.१, यांसी जुना वार्ड क्रं. १६ यांसी नवीन म्युन्सिपल घर नंबर १८० यांसी जुना म्युन्सिपल घर नंबर अ-२७ यांसी हद्द पूर्वपश्चिम ४० फुट दक्षिणोत्तर ३० फुट एकूण क्षेत्र १२०० चौरस फुट यापैकी पुर्वेकडील जागा यांसी हद्द पुर्वपश्चिम २० फुट दक्षिणोत्तर ३० फुट असे एकूण क्षेत्रफळ ६०० चौरस फुट इतके असून यात १०X१० मापाची पत्र्याची दोन खोल्या असून बाकीची खुली जागा आहे. सदर जागेतील दक्षिणेकडील भिंत ही सामाईक व उर्वरीत तिन्ही भिंत स्वतंत्र मालकी हक्काहसची जागा. यासी चर्तुसीमा पूर्वेस-रस्ता, पश्चिमेस सदर जागेपैकी राहिलेली जागा, दक्षिणेस गैबी पडसलगी यांची जागा, उत्तरेस-रस्ता

सदर प्रमाणे वर वर्णन केलेली झोपडी जागा ही १) शिवचलप्पा सिध्दप्पा निंगदळी व २) नागप्पा उर्फ नागेंद्र सिध्दप्पा निंगदळी यांचे कब्जेवहिवाटीची होती त्यांनी दिनांक २१/०५/२०२५ रोजी कब्जा पावती करारपत्राने तसेच संमतीपत्र व प्रतिज्ञापत्राद्वारे मे. पब्लिक नोटरी सो, यांचे समोर दिलेली आहे. त्याप्रमाणे सदरी झोपडी जागा ही आमचे अशिल **केंचप्पा माळप्पा पुजारी** यांच्या कब्जेवहिवाटीची झालेली आहे. त्याप्रमाणे आमचे अशिल हे सदर झोपडी जागा ही नगर परिषद मैंदर्गी यांचे कडे कर आकारणीला नाव लावण्यासाठी अर्ज देत आहेत.

तरी या नोटीसीद्वारे कळविण्यता येते की, सदर नवीन वार्ड क्रं. १, यांसी जुना वार्ड क्रं.१६ यांसी नवीन म्युन्सिपल घर नंबर १८० यांसी जुना म्युन्सिपल घर नंबर अ-२७ यांसी हद्द पूर्वपश्चिम ४० फुट दक्षिणोत्तर ३० फुट एकूण क्षेत्र १२०० चौरस फुट यापैकी पश्चिमेकडील जागा यांसी हद्द पुर्वपश्चिम २० फुट दक्षिणोत्तर ३० फुट असे एकूण क्षेत्रफळ ६०० या जागेवर आमच्या अशिल केंचप्पा माळप्पा पुजारी यांचे कर आकारणी दप्तरी नाव लावणेस कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसाच्या आत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी, मुदतीत कोणाचीही हरकत व तक्रार न आल्यास ही झोपडी निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांच्या नावाची नोंद मैंदर्गी नगर परिषद, मैंदर्गी येथील कर आकारणी दप्तरी करुन घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारची तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर प्रकटन दिले ता.२१/०५/२०२५.

सही/-
नाईकवाडी ए.डी. ॲडव्होकेट
१८८६/४, विणकर वसाहत मु.पो. मैंदर्गी
ता. अक्कलकोट जि. सोलापूर.
मो.नं. ९८८१५२२९०७/८४२१०९८१७७.
अशिला तर्फे ॲडव्होकेट



**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
**घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**जाहीर दर - पत्रक नोटीस**

उपरोक्त विषयास अनुसरून सोलापूर महानगरपालिका कडील जुन्या बसेस वर **फिरते शौचालय** बनविण्या कामी अंदाजपात्रकीय रक्कम ठरविणे साठी उत्पादक / अधिकृत विक्रेते यांचे कडून स्वतःच्या लेटर पॅडवर प्रती नग, दर पत्रक तांत्रिक तपशिला सह दि.२२/०५/२०२५ ते दि. २७/०५/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत घनकचरा व्यवस्थापन विभाग यांचे मुख्य कार्यालयात आणून देण्याची आहेत. अधिक माहिती करिता घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे पाहवयास मिळेल. सदर दर-पत्रक तांत्रिक तपशिला सह शक्य झाल्यास त्याच दिवशी उघडण्यात येईल. सोलापूर महानगरपालिका कोणतेही दर पत्रके स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार कसलेही कारण न देता राखून ठेवले आहेत.
**कालावधी : ४ दिवसात सादर करणे.**
**पत्ता : घनकचरा व्यवस्थापन विभाग सोलापूर महानगरपालिका सोलापूर.**

सही/-
अतिरिक्त आयुक्त - १
तथा नियंत्रण अधिकारी
सोलापूर महानगरपालिका सोलापूर



Classifieds

**पाहिजेत**
हॉस्पिटलसाठी सिस्टर, लेडी रिसेप्शनीस्ट व आया पाहिजे. सारडा हॉस्पिटल, सम्राट चौक, सोलापूर
फोन : 9503062999

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.



**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि. कि. अर्ज ५८/२०२५
नि.नं. ५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनियर डिव्हीजन साहेब यांचे कोर्टात**

**१) रमीला दिनेश उर्फ दिनेशचंद्र छेडा,** वय-७२ वर्षे, धंदा - घरकाम
रा. ३८९५/१० निरव कुंज, गुजराती शाळेच्या पाठीमागे, सोलापूर रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर.
**२) पायल हितेन शहा** वय- ४७ वर्षे, धंदा घरकाम,
रा. ३/२४ मंधना मनोरा, १८ मोगल लेन, मॅग्नेट मॉल जवळ, माहीम पश्चिम, मुंबई
**३) निरव दिनेश उर्फ दिनेशचंद्र छेडा,** वय- ४३ वर्षे, धंदा - व्यापार,
रा. ३८९५/१० निरव कुंज, गुजराती शाळेच्या पाठीमागे, सोलापूर रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
— **अर्जदार**

**विरूध्द**

**कोणी नाही** --- **सा.वाला**

तमाम जनतेस या जाहीर प्रसिध्दीकरणद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी यात मूळ पुरुष दिनेश उर्फ दिनेशचंद्र भवानजी छेडा हे असून त्यांना अर्जदार नं.१ रमीला हि पत्नी आहे. अर्जदार नं. २ पायल व अर्जदार नं ३ निरव हे यातील मयत दिनेश व अर्जदार नं. १ रमीला यांचे अनुक्रमे मुलगी व मुलगा आहेत. यातील मूळ पुरुष म्हणजेच दिनेश उर्फ दिनेशचंद्र भवानजी छेडा हे दिनांक १४/१२/२०२२ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार यांना शासकीय/निमशासकीय कार्यालयीन कामकाजाकरिता तसेच फॉर्मल recognition करिता वारसा दाखल्याची गरज आहे. त्यामळे यातील अर्जदारांनी त्यांना वारस दाखला मिळणे बद्दल हा अर्ज मे या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, सदर मयत दिनेश छेडा यांना यातील अर्जदार व्यतिरिक्त इतर कोणाचा वारसा हक्क हित संबंध असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत वकिलामार्फत अगर स्वतः मे कोर्टात नेमलेल्या तारखेसह दि. १२/०६/२०२५ रोजी अगर त्यापूर्वी हजर होऊन म्हणणे मांडावे सदर मुदतीत कोणाचीही तक्रार न आल्यास यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारसा दाखला देणेत येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण माझ्या सहीने व मे. कोर्टाचे सही शिक्यानिशी दिले ता. २१/०५/२०२५.

सही/-
क. लिपीक

कोर्टाचा शिक्का

सही/-
अधिक्षक
मा. दिवाणी न्यायालय क स्तर
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर



**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
'इंद्रभुवन' आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१.
**सार्वजनिक आरोग्य अभियंता (जलवितरण विभाग)**
smcphewtr@gmail.com

**दुसरी मुदतवाढ**

नागरी दलितेत्तर सुधार योजने अंतर्गत सन २०२५-२६ विभागीय कार्यालय क्र. ३ कडील प्रभागातील दुषित पाणी पुरवठा सुधार करणेकरीता नव्याने पाईप लाईन करणे कामाचे ई-निविदेस खालीलप्रमाणे पहिली मुदतवाढ देण्यात आली आहे.

1) Tender ID : 2025_SMC_1177128_1
2) Tender ID : 2025_SMC_1177156_1
3) Tender ID : 2025_SMC_1177173_1
4) Tender ID : 2025_SMC_1177183_1

या कामाचे टेंडर शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. २७/०५/२०२५ सकाळी १०.०० पासून पाहण्यास उपलब्ध आहेत.

सही/-
प्र. सार्वजनिक आरोग्य अभियंता
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर



**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
**जाहीर प्रसिध्दीकरण**

पावसाळ्याच्या दिवसांत वादळीवारे व पावसामुळे शहरातील जुनी आणि कुमकुवत घरे/चाळी इमारती पावसाच्या माऱ्यामुळे पडण्याची शक्यता असते. तसेच झाडे, इलेक्ट्रीकल पोल इत्यादी कोसळण्याची शक्यता असते. अशा धोक्यामुळे जिवीत व वित्तहानी संभवते. सदर बाबी टाळणेसाठी खालीलप्रमाणे खबरदारी नागरीकांनी घ्यावी. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये आपल्या इमारतीची वेळोवेळी तज्ञ इंजिनिअरकडून पाहणी करवून घेऊन इमारत अथवा इमारतीचा प्रत्येक भाग सुस्थितीत राखण्याची जबाबदारी संबंधीत घर मालकांनी/भोगवटदारांनी पाहणीनुसार आवश्यक पाडकाम स्वतः करुन घेणे अथवा दुरुस्त्या महानगरपालिकेची पुर्व परवानगी घेऊन करणे आवश्यक आहे. तसेच धोकादायक इमारती मधील रहिवाशांनी अशा इमारतीमधून स्थलांतरीत होऊन सुरक्षित ठिकाणी रहिवास करणेबाबत देखील याद्वारे आवाहन करण्यात येत आहे. यापूर्वी महानगरपालिकेकडून शहरातील ३० वर्षांपेक्षा जास्त कालावधी झालेल्या इमारतीची रचनात्मक स्थैर्य प्रमाणपत्र (Structural Stability) महानगरपालिकेकडील नोंदणीकृत रचनाकार अभियंता यांचेकडून तपासणी करुन घेऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व शासनाच्या मंजुर एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० मध्ये २.१.७ Repairs to Building तरतूद असून सदर तरतुदीप्रमाणे सोलापूर महानगरपालिकेस कळवून परवानाधारक आर्किटेक्ट/लायसन्स इंजिनिअर/स्ट्रक्चरल इंजिनिअर यांच्या देखरेखीखाली आवश्यकतेप्रमाणे धोकादायक भागाची दुरुस्ती करुन घ्यावी. नोंदणीकृत स्ट्रक्चरल इंजिनिअर/परवानाधारक इंजिनिअर यांची यादी नगर रचना कार्यालयाकडे नागरीकांकरीता उपलब्ध करण्यात आलेली आहे. एखाद्या इमारतीचा भाग अचानक कोसळल्यास झाडे, पोल, इत्यादी पडल्यास अग्निशामक दल फोन नं. २७४०३६४ व ६८, १०१. नगर अभियंता स्टोअर ०२१७-२७४०३३५. या कार्यालयांना नागरीकांनी त्वरीत कळवावे. तरी सर्व घर मालकांनी, भोगवटदारांनी व नागरीकांनी पावसाळ्यात इमारती झाडे व इलेक्ट्रीकल पोल पासून होणारा संभाव्य धोका टाळण्यास आणि जिवीत व वित्तहानी होऊ न देण्यास सोलापूर महानगरपालिकेस सहकार्य करावे.

सही/-
डॉ. सचिन ओंबासे भा.प्र.से. (आयुक्त,)
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर



**नाम परिवर्तन हेतु विज्ञापन (जीवनसाथी)**

मैं रूपाली शिवाजी वाघमोड़े आर्मी नं. 10120439 एम हवलदार (जीडी) वाघमोड़े शिवाजी नागनाथ की पत्नी हूँ, जो वर्तमान में कोय्या आदर्श, डोर नं.38-22-35 फ्लैट नं.1, 104 जंक्शन, इंडस्ट्रियल इस्टेट, पोस्ट विशाखापट्टनम, राज्य (एपी) 530007 में रहती हूँ। मैंने अपना नाम रूपाली से बदलकर रूपाली शिवाजी वाघमोड़े कर लिया है। हलफनामा नं.482 दिनांक 20/05/2025 के द्वारा नोटरी अधिकारी बार्शी, जिला सोलापुर के समक्ष।



**जाहीर नोटीस**

सोलापूर येथील तमाम लोकांस विशेषतः शहर सोलापूर व मैंदर्गी येथील सर्व रहिवासीयांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** डि व सब डी सोलापूर तालुका अक्कलकोट पैकी मैंदर्गी नगर परिषद मैंदर्गी येथील संगमेश्वर गल्ली झोपडपट्टी, धनगर गल्ली बिरलिंगेश्वर मंदिर जवळ यांसी नवीन वार्ड क्रं.१, यांसी जुना वार्ड क्रं. १६ यांसी नवीन म्युन्सिपल घर नंबर १८० यांसी जुना म्युन्सिपल घर नंबर अ-२७ यांसी हद्द पूर्वपश्चिम ४० फुट दक्षिणोत्तर ३० फुट एकूण क्षेत्र १२०० चौरस फुट यापैकी पुर्वेकडील जागा यांसी हद्द पुर्वपश्चिम २० फुट दक्षिणोत्तर ३० फुट असे एकूण क्षेत्रफळ ६०० चौरस फुट इतके असून यात १०X१० मापाची पत्र्याची दोन खोल्या असून बाकीची खुली जागा आहे. सदर जागेतील दक्षिणेकडील भिंत ही सामाईक व उर्वरीत तिन्ही भिंत स्वतंत्र मालकी हक्काहसची जागा. यासी चर्तुसीमा पूर्वेस-रस्ता, पश्चिमेस सदर जागेपैकी राहिलेली जागा, दक्षिणेस गैबी पडसलगी यांची जागा, उत्तरेस-रस्ता

सदर प्रमाणे वर वर्णन केलेली झोपडी जागा ही १) शिवचलप्पा सिध्दप्पा निंगदळी व २) नागप्पा उर्फ नागेंद्र सिध्दप्पा निंगदळी यांचे कब्जेवहिवाटीची होती त्यांनी दिनांक २१/०५/२०२५ रोजी कब्जा पावती करारपत्राने तसेच संमतीपत्र व प्रतिज्ञापत्राद्वारे मे. पब्लिक नोटरी सो, यांचे समोर दिलेली आहे. त्याप्रमाणे सदरी झोपडी जागा ही आमचे अशिल **लक्ष्मी धर्मण्णा भुपळे** यांच्या कब्जेवहिवाटीची झालेली आहे. त्याप्रमाणे आमचे अशिल हे सदर झोपडी जागा ही नगर परिषद मैंदर्गी यांचे कडे कर आकारणीला नाव लावण्यासाठी अर्ज देत आहेत.

तरी या नोटीसीद्वारे कळविण्यता येते की, सदर नवीन वार्ड क्रं.१, यांसी जुना वार्ड क्रं. १६ यांसी नवीन म्युन्सिपल घर नंबर १८० यांसी जुना म्युन्सिपल घर नंबर अ-२७ यांसी हद्द पूर्वपश्चिम ४० फुट दक्षिणोत्तर ३० फुट एकूण क्षेत्र १२०० चौरस फुट यापैकी पुर्वेकडील जागा यांसी हद्द पुर्वपश्चिम २० फुट दक्षिणोत्तर ३० फुट असे एकूण क्षेत्रफळ ६०० या जागेवर आमच्या अशिल लक्ष्मी धर्मण्णा भुपळे यांचे कर आकारणी दप्तरी नाव लावणेस कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसाच्या आत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी, मुदतीत कोणाचीही हरकत व तक्रार न आल्यास ही झोपडी निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांच्या नावाची नोंद मैंदर्गी नगर परिषद, मैंदर्गी येथील कर आकारणी दप्तरी करुन घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारची तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर प्रकटन दिले ता.२१/०५/२०२५.

सही/-
नाईकवाडी ए.डी. ॲडव्होकेट
१८८६/४, विणकर वसाहत मु.पो. मैंदर्गी
ता. अक्कलकोट जि. सोलापूर.
मो.नं. ९८८१५२२९०७/८४२१०९८१७७.
अशिला तर्फे ॲडव्होकेट



**ऑनलाईन दर मागणीपत्र नोटीस**

**विषय :-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ येथे Installation and commissioning of TOWER CLOCK at your desired site Construction of Memorial Statue. या कामासाठी खालील साहित्यासह काम करणे/पुरवठा करणे साठी सन २०२५-२६ दरपत्रकान्वये दर मागणी सुचना प्रसिध्दी करणे बाबत.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र. २, सोलापूर हे खाली नमूद केलेल्या साहित्याचे दर दोन लिफाफा पद्धतीने सिलबंद दरपत्रके मागवित आहेत. सिलबंद दरपत्रके दिनांक **२६/०५/२०२५ ते ०२/०६/२०२५** रोजी कार्यालयीन वेळेत पोहोचतील अशा रीतीने पाठवावीत. उशिरा आलेल्या दरपत्रकांचा स्विकार केला जाणार नाही. मुदतीत आलेली दरपत्रके त्याच दिवशी दि. **०२/०६/२०२५** रोजी कार्यालयीन वेळेत उपस्थित असलेल्या दरपत्रक धारकांचे समोर उघडण्यात येतील.

**Name of Work No.:- (1) Vestbule**
**(2) Pedsteal**
**(3) Deep Stambh**
**(4) Display Wall**
**(5) Acrylic texture paint**

वरील मागविण्यात आलेल्या साहित्यांची सविस्तर माहिती www.mahapwd.gov.in या वेबसाईटवर तसेच कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.२, सोलापूर, यांचे कार्यालयात दि. २६/०५/२०२५ ते ०२/०६/२०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. वरील ५ कामांचे दर हे स्वतंत्र कामनिहाय दरपत्रकान्वये सादर करावेत. साहित्यांचे दर सर्व करासहीत देणेचे असून, कामाचे / साहित्याचे पुरवठा करण्याचे काम या कार्यालयाने वेळोवेळी दिलेल्या सुचनेप्रमाणे करावयाचे आहे. दरपत्रकात नमूद केलेले दर हे दरपत्रक उघडल्यापासून ७५ दिवस विधीग्राहय धरणेत येतील. कोणत्याही एक अगर सर्व दरपत्रके मंजूर अगर नामंजूर करण्याचा हक्क या कार्यालयाने राखून ठेवलेला आहे.

**नियम व अटी**

१ पुरवठादाराने दरपत्रकासोबत आयकर रिटर्न प्रमाणपत्र, जी. एस. टी. प्रमाणपत्र, संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.
२ पुरवठादाराकडे साहित्यांचा साठा मुबलक प्रमाणात असावा.
३ साहित्य उच्च दर्जाचे व नामांकित कंपनीचे असावे.
४ पुरवठादाराने सदर साहित्याचा पुरवठा संबंधीत कामाच्या ठिकाणी करण्याचा आहे. साहित्यांचे वाहतुकीसाठी वेगळा आकार देण्यात येणार नाही.
५ देयकातून शासन निर्णयाप्रमाणे आयकर व जी.एस.टी. कपात करण्यात येईल.
६ दरपत्रकात नमुद केलेले सर्व कामाचे/साहित्य पुरवठा करणाऱ्या पुरवठदारचे दर सादर करावे.

जा.क्र./पुअहोसोवि/भांडार /१६११/२०२५
कार्यकारी अभियंता, यांचे कार्यालय
सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.२, सोलापूर
दिनांक ०९/०५/२०२५

सही/-
(अ. बा. भोसले)
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रं. २, सोलापूर

(विमाका/पुणे/जाहि./३४/२०२५-२६)

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### कनकने दिले भारताला पहिले सुवर्णपदक

**सुहल** : येथे सुरु असलेल्या आयएसएसएफ कनिष्ठ गट विश्वचषक २०२५ नेमबाजी स्पर्धेत भारताच्या १७ वर्षीय कनकने दोन वेळा ऑलिम्पिकपटू व युरोपियन विजेती मोल्दोव्हाच्या



अण्णा डल्सेवर १.७ गुणांनी मात करून भारताला पहिले सुवर्णपदक जिंकून दिले. गत वर्षी लिमा येथे झालेल्या कनिष्ठ जागतिक स्पर्धेत कनकने रौप्यपदक मिळविले होते, मात्र यंदा तिने आपल्या कामगिरीत सुधारणा करत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. आठ-महिलांच्या २४-शॉटच्या अंतिम फेरीत २३९.० गुण मिळवत कनकने सुवर्ण जिंकले. चीन तैपेईच्या चेन येन-चिंगने कांस्यपदक जिंकले. यापूर्वी, दोन भारतीय नेमबाजांनी अंतिम फेरीसाठी पात्रता मिळवली, प्राचीने कनकच्या मागे पाचवे स्थान मिळवले व त्यांनी अनुक्रमे ५७१ आणि ५७२ गुण मिळवले. त्यानंतर कनकने या पातळीवर तिचा अनुभव दाखवला आणि अंतिम फेरीच्या शेवटच्या टप्प्यात सर्वात महत्त्वाचे असलेले मोठे १० गुण सहज जिंकले. ■

### फ्रेंच ओपन पात्रता फेरीतून सुमित नागल बाहेर

**पॅरिस** : भारताचा अव्वल एकेरी टेनिसपटू सुमित नागल बुधवारी पॅरिसमध्ये दुसऱ्या फेरीत तळाच्या क्रमांकाच्या जुरिज रोडिओनोव्हकडून २-६, ४-६ असा पराभव पत्करून फ्रेंच ओपन एकेरी पात्रता फेरीतून बाहेर झाला. १७० व्या क्रमांकावर असलेल्या नागलला रोलँड गॅरोसमध्ये २२५ व्या क्रमांकाच्या ऑस्ट्रियन खेळाडूकडून एक तास २९ मिनिटांत पराभव पत्करावा लागला. त्याने पहिल्या फेरीत अमेरिकन मिशेल क्रुगरला हरवले होते. २०२४ मध्ये चारही फेरीत खेळल्यानंतर नागल ग्रॅण्ड स्लॅमच्या एकेरी मुख्य ड्रॉला मुकेल. ■

# गुजरातचे अव्वल दोन क्रमांकात राहण्याचे लक्ष्य

◆ **अहमदाबाद, २१ मे**

इंडियन प्रीमियर लीग हंगामात गुरुवारी नरेंद्र मोदी स्टेडियमवर माजी विजेता गुजरात टायटन्स आणि संघर्षरत लखनौ सुपर जायण्ट्स यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. या सामन्यात गुजरात संघ लखनौविरुद्ध आपली विजयी आघाडी वाढवण्यासाठी व गुणातलिकेत अव्वल दोन क्रमाकांत स्थान मिळवण्यसाठी प्रयत्नशील असेल.




१२ सामन्यांमधून १८ गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानावर असलेल्या गुजरात टायटन्सने प्ले-ऑफमध्ये आधीच आपले स्थान निश्चित केले आहे. तथापि, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्ज १७ गुणांसह पिछाडीवर असल्यामुळे अव्वल दोन क्रमांकांमध्ये स्थान मिळवण्यासाठी चुरस अजूनही कायम आहे.

गुजरात संघ विजयाचा प्रबळ दावेदार दिसत आहे. ऑरेंज कॅप धारक बी. साई सुदर्शन (६१७ धावा), कर्णधार शुभमन गिल (६०१) आणि जोस बटलर (५००) ही त्यांचे अव्वल फळीतील त्रिकूट उत्तम फॉर्ममध्ये आहे. त्यांनीच संघाच्या बहुतेक विजयांचा पाया रचला आहे. त्यांनी एकत्रितपणे १६ अर्धशतके व एक शतक ठोकले आहे. स्पर्धेतील फलंदाजीत त्यांनी निर्विवादपणे सातत्य राखले आहे. अव्वल फळीच्या वर्चस्वामुळे मधल्या फळीवर फारसा ताण बसला नाही.

गुजरातची गोलंदाजीही तितकीच जबरदस्त राहिली आहे. त्यांच्या भारतीय वेगवान गोलंदाजांनी आघाडी घेतली आहे. प्रसिध कृष्णा या हंगामात २१ बळी घेत सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज आहे. मोहम्मद सिराज व डावखुरा डावखुरा फिरकी गोलंदाज आर. साई किशोरने प्रत्येकी १५ बळी घेतले आहेत. दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज कॅगिसो रबाडा परतल्यामुळे त्याच्या आक्रमणात आणखी भर पडली आहे. रबाडा हा प्रतिबंधित औषधांच्या वापरामुळे निलंबित झाल्यामुळे हंगामातील बहुतेक वेळ खेळू शकला नव्हता.

> **आजचा सामना**
>
> **गुजरात टायटन्स वि. लखनौ सुपर जायण्ट्स**
>
> **स्थळ** : नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद
>
> **वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
>
> **थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

दुसरीकडे, लखनौ सुपर जायण्ट्सच्या सोमवारी सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या पराभवानंतर प्लेऑफमध्ये पोहोचण्याच्या आशा धुळीस मिळाल्या. ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील संघ सध्या चार सामन्यांच्या पराभवाच्या मालिकेत आहे. त्याला विसंगती व दुखापतींनी भरलेली मोहीम सहन करावी लागली आहे.



लखनौचा सुपर संघ धावांसाठी आपल्या परदेशी खेळाडूंवर- मिशेल मार्श, एडन मार्कराम व निकोलस पूरन यांच्यावर खूप अवलंबून आहे. पंतकडून उल्लेखनीय योगदान न मिळाल्यामुळे व मधल्या फळीतील खेळाडूंनी आपल्या समस्या वाढवल्या आहेत. प्रमुख गोलंदाजांना झालेल्या दुखापतींमुळे त्यांची मोहीम आणखी बिकट झाली.

डावखुरा वेगवान गोलंदाज मोहसीन खान संपूर्ण हंगामात खेळू शकला नाही, तर वेगवान गोलंदाज मयंक यादवला मोठ्या आशेने संघात ठेवण्यात आले होते, परंतु त्याने बहुतेक वेळ वाया घालवला. आवेश खान व आकाश दीपला तंदुरुस्तीसाठी सामना करावा लागला, त्यामुळे लखनौच्या गोलंदाजीची तीव्रता कमी झाली.

लखनौची परिस्थिती आणखी बिकट झाली आहे, कारण त्यांना या हंगामात त्यांचा सर्वात यशस्वी गोलंदाज- फिरकी गोलंदाज दिग्वेश राठी याच्याशिवाय खेळावे लागणार आहे. दिग्वेशने ८.१८ च्या इकॉनॉमी रेटने १४ बळी घेतले आहेत.

गत सामन्यात अभिषेक शर्मासोबत मैदानावर झालेल्या वादामुळे त्याला एका सामन्याची बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे त्यांच्या डळमळीत मोहिमेला आणखी धक्का बसला आहे. ◀(*वृत्तसंस्था*)

# सिमरनजीत कौर वळली व्यावसायिक मुष्टियुद्धाकडे

◆ **नवी दिल्ली, २१ मे**

माजी विश्व कांस्यपदक विजेती सिमरनजीत कौर आता व्यावसायिक मुष्टियुद्धाकडे वळली असून ती व्यावसायिक मुष्टियोद्धा होणारी नवीनतम भारतीय खेळाडू ठरली आहे.



टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणारी २९ वर्षीय दोन वेळा आशियाई पदक विजेती सिमरनजीतने माजी अमेरिकन व्यावसायिक मुष्टियोद्धा रॉय जोन्स ज्युनियर व भारतीय व्यावसायिक मुष्टियोद्धा मनदीप जांगरा यांच्याशी करार करून व्यावसाक मुष्टियुद्धात उडी घेण्याचा निर्णय घेतला.

मार्चमध्ये ६५ किलो वजनी गटात राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत दुसरे स्थान पटकावणारी सिमरनजीत या वर्षी जागतिक अजिंक्यपद पदक विजेता निशांत देव आणि अमित पांघळ यांच्यानंतर व्यावसायिक होणारी तिसरी भारतीय मुष्टियोद्धा आहे. माझी कारकीर्द अशा प्रमोटरपासून सुरू होत आहे, याचा मला खूप आनंद वाटत आहे. या प्रमोटरने जगाला अनेक स्टार बॉक्सर दिले आहेत. मनदीप जांगरा आधीच व्यावसायिक रिंगमध्ये देशासाठी अभिमानास्पद कामगिरी करत आहे आणि मी देशासाठी ओळख मिळवण्याचा प्रयत्न करेन. रॉय जोन्स ज्युनियर हा सर्वोत्तम प्रमोटर आहे आणि मी त्याच्यासोबत माझे करिअर नक्कीच पुढे नेईन, असे सिमरनजीत म्हणाली.

या पाऊलासह सिमरनजीत २००८ च्या ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या विजेंदर सिंग, विकास कृष्णन्, सरिता देवी व नीरज गोयत यांच्या पावलावर पाऊल ठेवते. हे सर्व खेळाडू हौशी सर्किटमध्ये चांगली कामगिरी केल्यानंतर व्यावसायिक मुष्टियुद्धाकडे वळले. ◀(*वृत्तसंस्था*)

# जबरा लेडीज गोल्फमध्ये दीक्षाकडे भारताचे नेतृत्व

**एव्हियन-लेस-बेन्स** : फॉर्ममध्ये असलेली भारतीय गोल्फपटू दीक्षा डागर गुरुवारपासून फ्रान्समध्ये सुरू होणाऱ्या लेडीज युरोपियन टूरच्या जबरा ओपन गोल्फ स्पर्धेत अव्वल १० मध्ये स्थान मिळवण्याचा आणि जेतेपदाचे लक्ष्य ठेवण्याचा प्रयत्न करणार आहे. दीक्षा शिवाय भारतीय संघात त्वेसा मलिक, अवनी प्रशांत व हिताशी बक्षीचा समावेश आहे. डच लेडीज ओपन दरम्यान मनगटाला दुखापत झाल्यामुळे माघार घ्यावी लागलेली प्रणवी उर्स या व पुढच्या आठवड्यात विश्रांती घेणार आहे. डच लेडीज ओपनमध्ये संयुक्त नववे स्थान मिळवून दीक्षा ऑर्डर ऑफ मेरिटच्या अव्वल पाचमध्ये पोहोचली आहे, तर त्याच स्पर्धेत तिने संयुक्त १९वे स्थान मिळवल्यानंतर अवनी त्या यादीत ३९ व्या स्थानावर आहे. हिताशीने गत आठवड्यातही प्रभावित केले. तिने या हंगामात आपल्या पहिल्या एलईटी (लेडीज युरोपियन टूर) स्पर्धेत संयुक्त १२ वे स्थान मिळवले. डच लेडीज ओपनमध्ये स्थान मिळवण्यात अपयशी ठरल्यानंतर त्वेसा तिची लय शोधण्यास उत्सुक असेल. ■



# प्रणॉय, करुणाकरन् विजयी; सिंधू बाहेर

**मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन**

◆ **क्वालालम्पूर, २१ मे**

बुधवारी येथे मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत एच. एस. प्रणॉय व सतीश करुणाकरन्ने पुरुष एकेरीच्या दुसऱ्या फेरीत आश्चर्यकारक विजय नोंदवले, परंतु दुहेरी ऑलिम्पिक पदक विजेती पी.व्ही. सिंधूचे पहिल्याच फेरीत आव्हान संपुष्टात आले.

प्रणॉयने पाचव्या मानांकित जपानच्या केंटा निशिमोटोला एक तास २२ मिनिटे चाललेल्या पहिल्या फेरीच्या सामन्यात १९-२१, २१-१७, २१-१६ असे पराभूत केले.

करुणाकरन्ने तिसऱ्या मानांकित चीन तैपेईच्या चाऊ टिएन चेनला केवळ ३९ मिनिटांत २१-१३, २१-१४ असे पराभूत करून धक्का दिला. भारतीय पुरुष बॅडमिंटनपटूंसाठी हा एक चांगला दिवस होता. आयुष शेट्टीनेही कॅनडाच्या ब्रायन यांगला २०-२२, २१-१०, २१-८ असे पराभूत करून पुढील फेरीत प्रवेश केला.



एच. एस. प्रणॉय

पण सिंधूचा वाईट फॉर्म कायम राहिला. तिला सुपर ५०० स्पर्धेतील सुरुवातीचा अडथळा पार करता आला नाही व तिला व्हिएतनामच्या गुयेन थुई लिन्हविरुद्ध ११-२१, २१-१४, १५-२१ असा पराभव पत्करावा लागला. ◀(*वृत्तसंस्था*)

# बांगलादेशविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी पाकिस्तान संघ जाहीर

**इस्लामाबाद** : पाकिस्तान क्रिकेट मंडळाने या महिन्यात होणाऱ्या बांगलादेशविरुद्धच्या टी-२० घरच्या सामन्यांसाठी वेगवान गोलंदाज हसन अलीला परत बोलावले आहे, परंतु सलग तिसऱ्या मालिकेसाठी वरिष्ठ फलंदाज मोहम्मद रिझवान व बाबर आझमकडे दुर्लक्षित केले आहे.

हसनने जवळजवळ तीन वर्षांत केवळ एक टी-२० आंतरराष्ट्रीय सामना खेळला, जेव्हा त्याने २०२४ मध्ये डब्लिनमध्ये आयर्लण्डविरुद्ध तीन षटकांत ०-४२ अशी महागडी गोलंदाजी केली. तथापि, उजव्या हाताच्या वेगवान गोलंदाजाने कराची किंग्जचे प्रतिनिधित्व करताना पाकिस्तान सुपर लीगमध्ये १५ बळी घेत संघात पुनरागमन केले आहे. पुढील वर्षी होणाऱ्या टी-२० विश्वचषकापूर्वी पाकिस्तानने आपल्या अव्वल फळीला पुन्हा आकार देत आहे. झिम्बाब्वे आणि न्यूझीलंडमधील शेवटच्या दोन मालिकांसाठी रिझवान व बाबरला वगळण्यात आले. पाकिस्तान टी-२० संघ : सलमान अली आगा (कर्णधार), शादाब खान, अबरार अहमद, फहीम अश्रफ, फखर जमान, हारिस रौफ, हसन अली, हसन नवाज, हुसैन तलत, खुशदिल शाह, मोहम्मद हरिस, मोहम्मद वसीम, इरफान खान, नसीम शाह, साहिबजादा फरहान आणि सैम अयुब. ■

# राजस्थानची विजयाने सुखद सांगता

**नवी दिल्ली, २१ मे-**

राजस्थान रॉयल्सचा कर्णधार संजू सॅमसनने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि हा निर्णय योग्य असल्याचे त्याचा सलामीचा वेगवान गोलंदाज युद्धवीर सिंग चरकने त्याच्या पहिल्याच षटकात दोन बळी घेत सिद्ध केले. प्रथम त्याने चेन्नई सुपर किंग्जचा सलामीवीर डेवन कॉनवेला मिड-ऑफवर रियान परागने झेलबाद केले आणि दोन चेंडूंनंतर उर्विल पटेल मिड-ऑनवर त्याचा बळी ठरला.



नवी दिल्ली येथील अरुण जेटली स्टेडिमवर चेन्नई सुपर किंग्ज आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना चेन्नईने २० षटकांत ८ बाद १८७ धावा केल्या. प्रत्युत्तरात राजस्थानने १७ चेंडू आणि ६ गडी राखून १८८ धावा काढत सामना जिंकला.सामनावीराचा पुरस्कार आकाश मधवाल ठरला. त्याने २९ धावांत ३ गडी बाद केले. प्रथम फलंदाजी करताना चेन्नईचा तरुण सलामीवीर आयुष म्हात्रेने चांगली फलंदाजी सुरू ठेवली आणि २० चेंडूंत आठ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ४३ धावा केल्या. तुषार देशपांडेच्या चेंडूवर लाँग ऑनवर क्वेना म्फाकाने त्याला झेलबाद केले. पुढच्या दोन षटकांत चेन्नईने आणखी दोन गडी गमावले. त्यांचे ५ फलंदाजी ७८ धावांत बाद झाले होते. तथापि, यानंतर डेवाल ब्रेव्हिस आणि शिवम दुबे यांच्यात अर्धशतकी भागीदारी झाली आणि त्यांनी एकत्रितपणे चेन्नईचा डाव एका सन्मानजनक धावसंख्येपर्यंत पोहोचवला. राजस्थान रॉयल्सकडून युद्धवीर आणि आकाश मधवाल यांनी प्रत्येकी तीन गडी बाद केले. तुषार देशपांडे आणि वानिंदु हसरंगा यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला. धावांचा पाठलाग करताना राजस्थानने जलद आणि आक्रमक सुरुवात केली. यशस्वी जयस्वालने १९ चेंडूत पाच चौकार आणि दोन षटकारांसह ३६ धावा केल्या. तो ३७ धावांवर बाद झाला तेव्हा त्याचा सलामीचा जोडीदार वैभव सूर्यवंशीची धावसंख्या तीन चेंडूत एक धाव होती. पण यानंतर, सूर्यवंशीने कर्णधार सॅमसनसह राजस्थानच्या डावाची जबाबदारी घेतली आणि संघाला विजयाकडे नेले. दोघांनी ५९ चेंडूत ९८ धावांची भागीदारी केली. त्यामध्ये सॅमसनने ३१ चेंडूत ४१ धावा केल्या. सूर्यवंशीने ३३ चेंडूत चार चौकार आणि चार षटकारांसह ५७ धावांची धमाकेदार खेळी केली. हे दोन्ही फलंदाज एकाच षटकात आर. अश्विनचे बळी ठरले. अशा स्थितीत सामना रोमांचक होईल अशी स्थिती होती. पण ध्रुव जुरेलने १२ चेंडूत नाबाद ३१ धावा केल्या आणि आपल्या संघाला विजय मिळवून दिला. शिमरॉन हेटमायर १२ धावांवर नाबाद होता. चेन्नईकडून अंशुल कंबोज, नूर अहमदने प्रत्येकी एक आणि रवि अश्विनने २ गडी बाद केले. (वृत्तसंस्था)

# महाराष्ट्राच्या दीक्षा यादवला सुवर्णपदक

**सागरी जलतरणात १ सुवर्णासह २ कांस्य**

**सिलट प्रकारातील दुहेरीत सुवर्णपदक**

**पदकतालिकेत महाराष्ट्र तिसऱ्या स्थानावर**

◆ **दीव, २१ मे**

भल्या पहाटे रंगलेल्या पहिल्या खेलो इंडिया बीच स्पर्धेतील सागरी जलतरणात दीक्षा यादवच्या कामगिरीच्या नेत्रदीपक कामगिरीच्या बळावर महाराष्ट्राने स्पर्धेतील सुवर्ण सकाळ अनुभवली. १० मीटर स्विमथॉन प्रकारात महाराष्ट्राने दीक्षाच्या सुवर्णपदकासह २ कांस्यपदकांची कमाई केली. बीच पेंचक सिलटमध्ये देखील महाराष्ट्राने स्पर्धेतील पहिले सुवर्णयश संपादन केले. २ सुवर्णांसह ९ पदकांची लयलूट करीत महाराष्ट्र पदकतालिकेत तिसऱ्या स्थानावर आहे.

दीवच्या अरबी समुद्रात पहाटे ६ वाजता १० मीटर स्विमथॉनचा थरार रंगला. महिलांच्या गटात सुरूवातीपासून महाराष्ट्राच्या १९ वर्षीय दीक्षा यादवे मुसंडी मारली होती. २ मिनिटे १८.०९ सेकंद वेळेत शर्यतीचा पल्ला पार करीत दीक्षाने सुवर्णपदक पटकावले. रौप्य व कांस्य पदकांसाठी अनुक्रमे महाराष्ट्राच्या पूर्वा गावडे व तामिळनाडूच्या एम. आरना यांच्यात शर्यत रंगली. दोघींनीही एकाच वेळी अंतिम रेष पार केली. अवघ्या १४ दशांश सेकंदाने पूर्वाला रूपेरी यशाने हुलकावणी दिली. २.१८.३८ वेळ देत आरनाने रौप्य, तर २.१८.५२ वेळ नोंदवून पूर्वाने कांस्यपदक जिंकले.



चैतन्य शिंदे, दीक्षा यादव व पूर्वा गावडे

साताऱ्यातील दीक्षा व सिंधूदुर्गच्या पूर्वा या दोन्ही खेळाडू पुण्यातील शासनाच्या क्रीडा प्रबोधिनीत सराव करतात. ५० मीटर फ्रीस्टाईल खेलो इंडिया विद्यीपीठ स्पर्धेतही दीक्षाने पदक जिंकले आहे. मुलांच्या स्विमथॉन प्रकारातही महाराष्ट्राचे जलतरणपटू चमकले. चैतन्य शिंदेने २.१३.१४ वेळ देत कांस्यपदकाचे यश संपादन केले. कर्नाटकच्या रेणुकाचार्या होदमानीने सुवर्ण, तर पश्चिम बंगालच्या पृथ्वी भट्टाचार्याने रौप्यपदक कमवले. महाराष्ट संघाचे पथक प्रमुख नवनाथ फडतरे, क्रीडा अधिकारी अरुण पाटील यांनी अभिनंदन केले आहे.घोघला समुद्र किनाऱ्यावर सुरू असलेल्या पारंपारिक पेंचक सिलट प्रकारात महाराष्ट्राच्या रिया चव्हाण व प्राजक्ता जाधव या जोडीने सुवर्णपदकाला गवसणी घातली, या पदकाने महाराष्ट्राचे सुवर्णपदकाचे खाते उघडले. ५५५ गुणांची कमाई करीत रिया-प्रातक्ता जोडीने गंडा प्रकारात सर्वोत्तम कामगिरीचे प्रदर्शन घडवले. मणिपूरने ५५२ गुणांसह रौप्य, तर कर्नाटकने ५४२ गुणांसह कांस्यपदकांवर नाव कोरले. एकेरीत महाराष्ट्राच्या किर्णाक्षी येवलेने कांस्यपदकाची कमाई केली आहे.

बीच सेपक टकरा स्पर्धेतील दुसऱ्या लढतीत महाराष्ट्राला विजय गवसला. महाराष्ट्राने राज्यस्थानला २-० असे सरळ सेटमध्ये पराभूत करून स्पर्धेतील आपले आव्हान कायम राखले. कबड्डी मैदानातही महाराष्ट्राचा जयजयकार घुमला. महाराष्ट्राच्या दोन्ही संघांनी यजमान दीम दमणला पराभूत केले. महिला संघाने दीव संघाचा ८०-११ गुणांनी धुव्वा उडविला, तर पुरूष संघाने दीव संघावर ७३-३६ गुणांनी दणदणीत विजय संपादन केला. ◀(*वृत्तसंस्था*)

# पुण्यात ४ जूनपासून रंगणार एमपीएल व डब्ल्यूएमपीएल क्रिकेट स्पर्धेचा थरार

## सोलापूरला विभागीय क्रिकेट अकादमी : आमदार रोहित पवार

**सोलापूर, दि. २१ मे -**

येत्या ४ जूनपासून पुण्यातील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या गहुंजे आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर महाराष्ट्र प्रीमियर लीग व वुमेन्स महाराष्ट्र प्रीमियर लीग या स्पर्धांचा थरार रंगणार असल्याची माहिती महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष आमदार रोहित पवार यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.




सोलापूर : सोलापूर स्मॅशर्स या महिला संघाच्या टी-शर्ट चे अनावरण करताना आमदार रोहित पवार.

महाराष्ट्र प्रीमियर लीगमुळे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील सर्वसामान्य कुटुंबातील अनेक नवोदित खेळाडूंना योग्य वेळी संधी मिळत आहे. या स्पर्धेमुळे त्यांच्यासाठी भविष्यातील अनेक दरवाजे उघडले आहेत. महाराष्ट्र क्रिकेट संघटनेतर्फे (एमसीए) राज्यातील प्रत्येक जिल्ह्याला क्रिकेटच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी प्रत्येकी ७५ लाख रुपयांचे अनुदान दिले जाणार आहेत. सोलापूर जिल्ह्यात पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी, अनेक नवीन प्रतिभान खेळाडू निर्माण करण्यासाठी एमसीए सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे. महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यात क्रिकेट सुविधांचा विकास करून महाराष्ट्र क्रिकेटला एका वेगळ्या उंचीवर नेण्यासाठी एमसीए सदैव कटिबद्ध असल्याचे संघटनेचे अध्यक्ष आमदार रोहित पवार यांनी सांगितले.

''महाराष्ट्र प्रीमियर लीग या स्पर्धेमुळे राज्याच्या कानाकोपऱ्यात असलेल्या गुणवान क्रिकेटपटूंना राष्ट्रीय स्तरावर येण्यासाठी संधी मिळणार असून या स्पर्धेमुळे भविष्यात भारतालाही गुणवान क्रिकेटपटू मिळणार आहेत. सलग तिसऱ्या वर्षी खेळविल्या जाणाऱ्या या स्पर्धेच्या यशात सर्व संघांच्या मालकांचा मोलाचा वाटा आहे. एमपीएल व डब्ल्यूएमपीएल हे केवळ स्पर्धात्मक मंच नसून, एक परिवार आहे. सर्व संघमालक, खेळाडू, पदाधिकारी, टेक्निकल टीम आणि सपोर्ट स्टाफ यांचे परिश्रम या यशामागे आहेत. येत्या काळात एमपीएल व डब्ल्यूएमपीएलच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्यातील अधिकाधिक खेळाडू महाराष्ट्राकडून व पुढे जाऊन देशासाठी खेळतील,असेही आमदार पवार म्हणाले.

या पत्रकार परिषदेला महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे सचिव अॅड. कमलेश पिसाळ, अपेक्स कौन्सिल सदस्य सुनील मुथा, विनायक द्रविड, सुशील शेवाळे, मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य जोशी, सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष दिलीप माने, व्हाईस चेअरमन श्रीकांत मोरे,सचिव चंद्रकांत रेम्बरसू, मुकुंद जाधव, प्रकाश भुतडा, माजी अध्यक्ष दत्ता सुरवसे,दिलीप बचुवार,सोलापूर स्मॅशर संघाचे प्रतिनिधी शुभम बागुल,कर्णधार तेजल हसबनीस, आयकॉन खेळाडू ईश्वरी अवसारे, सुनील मालप, के. टी. पवार, उदय डोके, रोहित जाधव उपस्थित होते.



### इंदिरा गांधी स्टेडियम व सोलापूर विद्यापीठाचे प्रस्ताव

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनला मैदानाची गरज आहे. त्यामुळे तीस वर्षाच्या करारावर महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन मैदान घेऊन ते उच्च दर्जाचे करून त्या माध्यमातून क्रिकेटचा प्रचार आणि प्रसार करणार असल्याचेही आमदार पवार यांनी सांगितले. सोलापुरातील इंदिरा गांधी स्टेडियम आणि अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांनी प्रस्ताव दिले आहेत. त्यांच्याशी शक्य तितक्या लवकर करार करून अकादमी सुरू करण्याचा मानस असल्याचेही आमदार पवार यावेळी बोलताना म्हणाले.

### सोलापूर स्मॅशर्सचा महिला संघ

सोलापूरचा स्मॅशर्स महिला संघ यात सहभागी होणार असून मनीष फ्लोवर मिलने हे संघास पुरस्कृत केले आहे. या संघाकडून भारतीय संघातील महिला खेळाडू तेजल हसबनीस ही सहभागी होणार आहे. सहभागी संघ : एमपीएल : पुणेरी बाप्पा, कोल्हापूर ट्स्कर्स ,रत्नागिरी जेट्स, ईगल नाशिक टायटन्स, सातारा वॉरियर्स, रायगड रॉयल्स. डब्ल्यू एमपीएल : पुणे वॉरियर्स, रत्नागिरी जेट्स, सोलापूर स्मॅशर्स आणि रायगड रॉयल्स.

### अजय शिर्के नावाने पुण्यात राज्याची क्रिकेट अकादमी

महाराष्ट्र क्रिकेट संघटना आगामी हंगामात राष्ट्रीय क्रिकेट अकादमीच्या धर्तीवर एमसीएची अकादमी सुरु करणार असून ही अकादमी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे तत्कालीन अध्यक्ष अजय शिर्के यांच्या नावाने पुण्यात राज्याची अकादमी सुरु करण्यात येईल. त्यानंतर महाराष्ट्रात पश्चिम महाराष्ट्रातील सोलापुरात, कोकण विभागासाठी दापोली, मराठवाड्यासाठी छत्रपती संभाजीनगर आणि खानदेशसाठी जळगाव अशा चार ठिकाणी विभागीय क्रिकेट अकादमी सुरु करण्यात येणार आहे. एक सप्टेंबरला पहिली अकादमी सुरू करणार असल्याचेही अध्यक्ष रोहित पवार यांनी सांगितले. राज्याच्या अकादमी साठी स्पेशल प्रशिक्षक तर विभागीय अकादमीसाठी तज्ञ प्रशिक्षक यासह परीक्षा दिलेला पंच, गुणलेखक, व्यवस्थापक प्रशिक्षक असणार आहेत.

### लिलावासाठी ६५८ पुरुष व महिला खेळाडूंचा सहभाग

या वर्षीच्या महाराष्ट्र प्रीमियर लीग व वुमन्स महाराष्ट्र प्रीमियर लीग लिलावासाठी ४०९ पुरुष खेळाडू आणि २४९ महिला खेळाडू नोंदणीकृत होते. ज्यामधून संघमालकांनी आपापल्या संघाचा बॅलन्स व गरजांनुसार संघासाठी खेळाडूंची निवड केली. या हंगामात एमपीएलमध्ये ४ संघ आणि डब्लूएमपीएल मध्ये ४ संघ सहभागी झाले असून, ही स्पर्धा येत्या ४ जूनपासून एमसीए गहुंजे इंटरनॅशनल स्टेडियम, पुणे येथे खेळविण्यात येणार आहे. या स्पर्धेच्या सामन्यांचे थेट प्रक्षेपण जिओ हॉटस्टार व स्टार स्पोर्ट्स २ या वाहिन्यांवर करण्यात येणार आहे, ज्यामुळे ही स्पर्धा राज्यासह संपूर्ण देशभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
https://epaper.dainiktarunbharat.com/



# मंगळवेढ्यात कंत्राटी लाईनमनचा शॉक लागून मृत्यू

## नातेवाईकांनी प्रेत ठेवले वीज वितरण कार्यालयाच्या दारात

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.२१ मे**

मंगळवेढा शहरातील दामाजी कारखाना चौकातील मायाक्का मंदिराजवळ कंत्राटी लाईनमन (जनमित्र) अतिश जयराम लांडे (वय २८) हा रविवार दि.१८ मे रोजी विद्युत खांबावर काम करत असताना शॉक लागून वरुन खाली पडल्याने तो गंभीर जखमी झाला होता. दरम्यान तो उपचार सुरु असताना बुधवार दि.२१ मे रोजी सकाळी मयत झाला. तद्नंतर त्या कंत्राटी लाईनमनचे प्रेत नातेवाईकांनी मंगळवेढा येथील वीज वितरण कार्यालयाच्या उंबऱ्या जवळ तब्बल तीन तास ठेवून या घटनेचा संताप व्यक्त केला.



रविवार दि.१८ मे रोजी २ वाजता नागणेवाडी येथील मायाक्का मंदिर येथील विद्युत खांबावर कामानिमित्त मयत अतिश लांडे हे चढले असता त्यांना विजेचा झटका लागून ते खाली पडले होते. सोलापूरातील एका खाजगी दवाखान्यात उपचार सुरु असताना ते मयत झाले. काम करत असताना अचानक विजेचा शॉक कसा काय बसला? हा एक या घटनेवरुन संशोधनाचा विषय बनला आहे. एका तरुण अविवाहित मुलाचा अंत झाल्याने सर्वत्र मोठ्या प्रमाणात हळहळ व्यक्त होत आहे. यात जे दोषी असतील त्याच्यावर कारवाई होणे ही तितकेच महत्वाचे आहे. लांडे यांच्या नातेवाईकांनी सोलापूरहून थेट मृतदेह वीज वितरण कार्यालयाच्या उंबऱ्यात दुपारी १.३० वाजता आणून ठेवला. यावेळी कार्यालयात एकही जबाबदार अधिकारी उपस्थित नसल्याने नातेवाईकांनी आक्रोश केला. ही घटना वाऱ्यासारखी संपूर्ण जिल्हाभर पसरताच अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले व ते अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. वीज वितरण कार्यालयात जवळपास एक हजार लोकांचा जनसमुदाय पाहून अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस यंत्राणाही घटनास्थळी दाखल झाली होती. वीज वितरणचे जबाबदार अधिकारी मंगळवेढ्यात निवासी राहत नसल्यामुळे यावेळी उपस्थितांनी आक्रोश केला. यापुर्वीही मनसेचे जिल्हा समन्वयक नारायण गोवे यांनी वीज वितरणला कुलूप लावण्याचा इशारा दिला असता अधिकाऱ्यांनी आम्ही येथे राहणार म्हणून लेखी दिले होते. मात्र याचे अद्यापही पालन झाले नसल्याचे दिसून येत आहे. बुधवारी दिवसभर वीज न जाता सुरळीत सेवा मिळाली. इतरवेळी मात्र दिवसभर अधून मधून वीज सेवा खंडीत होण्याचा प्रकार घडत असतो. दरम्यान आजचा प्रचंड जनसमुदाय पाहता वीजे बाबत काळजी घेण्यात आल्याची चर्चा होत होती. उपस्थित राजकीय लोकांनी वीज वितरणच्या अधिकाऱ्यावर दबाव टाकल्याने सुतासारखे सरळ होवून त्यांनी तात्काळ शासकीय व इतर योजनेतून आर्थिक मदत मयताच्या कुटूंबियांना करण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतर कुटूंबियांनी मयत अंत्यविधीसाठी घराकडे घेवून गेले. दरम्यान वीजेचे काम करत असताना निष्काळजीपणे आत्तापर्यंत तिघा लाईनमनला आपला जीव गमवावा लागला. तर अन्य दोघे या घटनेत गंभीर जखमी झाल्याचे घडले आहे. एवढे घडूनही वीज वितरणच्या अधिकाऱ्यांना जाग येत नसल्याने नागरिकामधून संताप व्यक्त होत आहे.

# पिलीवच्या आरोग्यकेंद्राला डीएचओ डॉ. नवले यांची भेट

## धोकादायक इमारतीची केली पाहणी; दवाखाना अन्यत्र हलवला

**तभा वृतसेवा**
**पिलीव दि २१ मे -**

माळशिरस तालुक्यातील 'पिलीव प्राथमिक आरोग्य केंद्राचेच आरोग्य धोक्यात' या मथळ्याखाली दि. १६ मे रोजी दै. 'तरुण भारत'ने धोकादायक इमारतीविषयी आवाज उठविला होता. याची दखल घेत जिल्हा वैदयकीय अधिकारी डॉ. संतोष नवले यांनी आज २१ मे रोजी पिलीव येथे येवुन प्रत्यक्षात पिलीव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या धोकादायक इमारतीची पाहणी केली. ही धोकादायक इमारत ताबडतोब रिकामी करुन पर्यायी व्यवस्था म्हणुन पिलीव येथील विश्रामगृहाशेजारी असणाऱ्या सांस्कृतिक भवन याठिकाणी इमारतीचे काम पुर्ण होईपर्यंत पर्यायी व्यवस्था करावी असे आदेश दिले. या सदरच्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मुख्य इमारतीसाठी व स्टाफ क्वार्टरच्या नवीन बांधकामासाठी साडेबारा कोटी रुपये निधीची आवश्यकता आहे. तशी मागणी आपण प्रशासनाकडे केली

तरुण भारत IMPACT


पिलीव प्राथमिक आरोग्य केंद्राचेच आरोग्य धोक्यात
जीव मुठीत धरुन द्यावी लागते सेवा

आहे पण अद्यापही त्याची मंजुरी नाही. तर सदरचे संपूर्ण काम होण्यासाठी जवळपास तीन ते चार वर्षाचा मोठा कालावधी लागणार आहे. तोपर्यंत सदरचा दवाखाना ग्रामपंचायत मालकीच्या सांस्कृतिक भवन याठिकाणी सुरू ठेवण्यात येणार आहे. यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाने सहकार्य करावे याठिकाणी आवश्यक असणारे पार्टीशन, शौचालय व इतर व्यवस्था ग्रामपंचायतीने उपलब्ध करुन द्याव्यात अशी सुचना त्यांनी ग्रामविकास अधिकारी बाबर यांच्याकडे केली. सदरच्या धोकादायक इमारत व पर्यायी व्यवस्था पाहणी करते वेळी माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशदादा पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ. विलास जाधव, तंटामुक्तीचे माजी अध्यक्ष महादेव जरग, पत्रकार अतुल नष्टे, प्रा. संजय पाटील, उदय कदम, पिलीवचे ग्रामविकास अधिकारी बाबर, पिलीव प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचारी तसेच सेवक यावेळी उपस्थित होते.




यावेळी पिलीव गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशदादा पाटील यांनी या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीसाठी तसेच स्टाफक्वार्टर साठी सोलापूर जिल्हयाचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे निधीची मागणी केली असुन त्यांनी यासाठी निधी उपलब्ध करून देणयाचे आश्वासन दिल्याचे यावेळी सांगीतले. तसेच आपण यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# बार्शीत नाभिक संघटनेतर्फे गुणवंतांचा सन्मान

## राजश्री गवळी बार्शी महिला तालुकाध्यक्षपदी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२१ मे-**

महाराष्ट्र नाभिक महामंडळ मुंबई संचलित बार्शी नाभिक दुकानदार संघटना बार्शी शहर व तालुका व वीर जीवा शिवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने शिवरत्न वीर शिवा काशीद तसेच हुतात्मा लालासाहेब वाघमारे यांच्या जयंतीनिमित्त समाजातील एस.एस.सी. व एच.एस.सी. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.



या कार्यक्रमास बार्शीचे माजी आमदार राजेंद्र राऊत, विजय राऊत, विलास रेणके, संतोष बारंगुळे, उमेश काळे, वृषाली लहारे, केदार महाराज शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या दरम्यान विशेष सत्कारांचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. यावेळी सत्कारमूर्ती प्रकाश मदने, इंजिनियर आप्पासाहेब लोखंडे, पैलवान प्रवीण घाडगे, भगवंत केसरी, श्रावणी प्रकाश पवार आदींचा विशेष सन्मान करण्यात आला. याप्रसंगी महाराष्ट्र नाभिक महामंडळ, सोलापुर शाखा, महिला बार्शी तालुकाध्यक्षपदी नाभिक समाज संघटना राजश्री गवळी यांची निवड करण्यात आली. तसेच यावेळी महाराष्ट्र नाभिक महामंडळ, मुंबईचे प्रदेश कार्याध्यक्ष सिद्राम रुद्रार, डॉ. माधुरीताई पारपल्लीवार प्रदेश महिलाध्यक्षा, ॲड. पवनकुमार शिंदे कायदेविषषक सल्लागार, बाबासाहेब लोखंडे, डॉ. सुहास जगदाळे, डॉ. गणेश वाघमारे, डॉ. सुहास राऊत, सुभाष काशीद, जीवन मोरे, चंद्रकांत दळवी, संजय पोपळे, किरण भांगे, मोहन जमदाडे, प्रकाश जोगापेठकर, राजू जंपाल, गितेंद्र बेनाळकर, रणदिवे, परशुराम श्रीमंगले, शहाजी पवार, राजेभाऊ दळवी, गणेश मोरे, संतोष दिघे, राजेभाऊ शिंदे, मोहन चौधरी, शरद घाडगे, अजय राऊत, मनीषाताई पोफळे, संगीतताई मेनकुदळे, अर्चनाताई दळवी, अर्चना हिंगे, उर्मिला जोगिपेठकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# नवोदितांसाठी मराठा मंदिरतर्फे साहित्य पुरस्कार

## 30 जूनपुर्वी साहित्य पाठविण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २१ मे-**

मराठा मंदिर संस्थेच्या साहित्य शाखेतर्फे नवोदित साहित्यिकांच्या पहिल्या प्रकाशनाला पुरस्कार देण्यात येणार आहे. त्यासाठी नवोदित साहित्यिकांना आपल्या पहिल्या प्रकाशनच्या दोन प्रति पाठवण्याचे आवाहन मराठा मंदिर साहित्य शाखेतर्फे करण्यात आले आहे.

पुरस्काराचे हे ८ वे वर्ष आहे. मराठा मंदिराच्या साहित्य शाखेचे पुरस्कार सुप्रसिद्ध साहित्यकार डॉ. सदानंद मोरे, कुमार केतकर, डॉ. नरेंद्र जाधव, डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते गुणवंत लेखकांना प्राप्त झाले आहेत. नवोदित लेखक कवीना या पुरस्कारासाठी पुस्तके पाठविण्याच्या काही अटी पुढील प्रमाणे. साहित्यिकांचे पहिले प्रकाशन दिनांक १ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत प्रकाशित झालेले असावे. कादंबरी, कथासंग्रह, काव्यसंग्रह, समीक्षणात्मक ग्रंथ, बालवाङ्मय, संशोधनात्मक ग्रंथ, चरित्र, आत्मचरित्र, प्रवास वर्णन, ललित साहित्य यापैकी कोणत्याही साहित्य प्रकारातील पहिले प्रकाशन पुरस्कारासाठी संस्थेकडे पाठवता येईल. अनुवादित अथवा आधारित पुस्तके स्पर्धेसाठी पाठवली जाऊ नयेत. प्रथितयश साहित्यिकांच्या परीक्षक मंडळाकडून या पुस्तकांचे परीक्षण केले जाते. यासाठी साहित्यिकांनी संस्थेकडे कोणताही पत्रव्यवहार करू नये. परीक्षकांचा निकाल अंतिम राहील, याची नवोदित साहित्यिकांनी नोंद घ्यावी. नवोदित साहित्यिकांनी पहिल्या प्रकाशनाच्या दोन प्रती ३० जून २०२५ पूर्वी डॉ. नितीन श्रीकृष्ण विचारे, अध्यक्ष, मराठा मंदिर साहित्य शाखा, तिसरा मजला मराठा मंदिर इमारत, बाबासाहेब गावडे चौक, मुंबई सेंट्रल-०८ या पत्त्यावर पाठवाव्यात. त्याबरोबर संस्थेने विहित केलेल्या अर्जामध्ये माहिती भरुन पाठवावी. अर्ज कार्यालयात उपलब्ध आहे. पुरस्कार वितरणाची तारीख संबंधित साहित्यिकांना नंतर कळविली जाईल. तरी नवोदित साहित्यिकानी आपल्या प्रकाशनाच्या दोन प्रती पाठवून मराठा मंदिराच्या प्रतिष्ठा प्राप्त साहित्य पुरस्कारासाठी सहभाग नोंदवावा, असे आवाहन साहित्य शाखेचे अध्यक्ष डॉ. नितीन विचारे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्र. ०२२-६६०४४१५० यावर संपर्क करावा असे आवाहन मराठा मंदिर साहित्य शाखेतर्फे करण्यात आले आहे.

## महत्वाचे...

### दारु व्यावसायिकाकडून एकास बेदम मारहाण; दोघांविरुध्द गुन्हा

**मंगळवेढा दि.२१ मे**

अकोले येथे गावात दारु विक्री न करणेबाबत ग्रामपंचायत मध्ये ठराव मंजूर झाला असताना तुम्ही दारू विक्री का करता? असे दारु विक्रेत्यास विचारल्याच्या कारणावरुन मुजोर दारु विक्रेत्याने गाव तुझ्या बापाचा आहे काय? असे म्हणत एकास लाकडी काठीने बेदम मारहाण केल्याची घटना घडली असून या प्रकरणी अनिल मारुती रणदिवे,मारुती गोपाळ रणदिवे या दोघा विरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील फिर्यादी सुनिल प्रल्हाद सरवदे (रा. अकोले) हे व फिर्यादीचा चुलत भाऊ धनंजय मुरलीधर सरवदे असे दोघे दि.२० रोजी सायंकाळी ७ वाजता गावातील सार्वजनिक वाचनालयाजवळ गेलो होते. तेथे गावातील आरोपी अनिल मारुती रणदिवे व मारुती गोपाळ रणदिवे आदी उभे होते. यावेळी फिर्यादीने गावात दारु विक्री न करणेबाबत ग्राम पंचायतीमध्ये ठराव मंजूर झाला असून तुम्ही दारु विक्री का करता? असे विचारले असता आरोपीने चिडून जावून गाव तुझे बापाचे आहे का? असे म्हणत शिवीगाळी दमदाटी केली. तसेच फिर्यादी हे आरोपींना समजावून सांगत असताना आरोपीनी हातातील लाकडी काठीने फिर्यादीस डाव्या हाताच्या पोटरीवर व पाठीत मारुन जखमी केले. यावेळी फिर्यादीचा चुलत भाऊ भांडणे सोडविण्यास स्वत: आले असता त्यालाही काठीने मारुन जखमी केले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान यातील फिर्यादीचा गावातील एक नातेवाईक दारुने मयत झाला होता. अंत्यविधी सुरु असताना त्याने संपूर्ण गावाला आक्रोश करीत माझा भाऊ दारुने मेला असून गावातील सर्व दारुधंदे बंद करुन इतरांचे जीव वाचवा असा व्हिडीओ करुन तो व्हायरल केल्याने हा व्हिडीओ राज्याच्या कानाकोपऱ्यात गेल्याने हजारो लोकांनी यास लाईक केले होते.





### पावसामुळे बागायतदार शेतकरी चिंताग्रस्त

**पंढरपूर, दि.२१ मे -**


पंढरपूर शहरात बुधवारी दुपारपासून मुसळधार पावसाला सुरुवात झाली. विजांच्या कडकडाटासह पंढरपूर शहरात तीन ते चार तास पावसाची कमी, अधिक प्रमाणात जोरदार बॅटिंग सुरू होती. मान्सूनपूर्व कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे एकिकडे बागायतदार शेतकरी चिंताग्रस्त झाले तर दुसरीकडे उकाड्याने हैराण झालेल्या पंढरपुरातील नागरिकांना दिलासा मिळाला.

# मंगळवेढ्यात गळफासाची मालिका संपेना

## बठाण येथे २३ वर्षीय तरुणीची तर बोराळेत १९ वर्षीय तरुणाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.२० मे-**

गेली तीन दिवस मंगळवेढयात तरूणांची गळफास घेण्याची मालिका सुरु असून आत्तापर्यंत तीन दिवसात तीघांनी गळफास घेतला आहे. सोमवार दि.१९ मे रोजी मंगळवेढा शहरात एका ४५ वर्षीय तरुणाने आत्महत्या केली. दि.२० रोजी बोराळे येथे १९ वर्षीय तर बठाण येथे २३ वर्षीय तरुणीने आत्महत्या केली. या सलग दोन युवक व एका तरुणीने आत्महत्या केल्यामुळे पालक वर्गातून चिंता व्यक्त होत आहे.



बठाण येथे एका २३ वर्षीय तरुणीने अज्ञात कारणावरुन राहते घरात लोखंडी पाईपला दोरीच्या सहाय्याने गळफास घेवून आत्महत्या केली असून वैशाली बापू कोडगर असे आत्महत्या करणाऱ्या त्या तरुणीचे नाव आहे. पोलीस सुत्रांच्या माहितीनुसार दि.२० रोजी दुपारी १.२० च्या पुर्वी खबर देणारा दिपक कोडगर यांचा चुलत भाऊ बापू कोडगर यांची पत्नी वैशाली बापू कोडगर (वय २३) हिने राहते घरात लोखंडी पाईपला अज्ञात कारणावरुन दोरीच्या सहाय्याने गळफास घेवून आत्महत्या केली असल्याचे दिलेल्या खबर मध्ये म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस हवालदार खंडागळे हे करीत आहेत.

बोराळे येथे एका १९ वर्षीय मुलाने अज्ञात कारणावरुन शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली असून उमेश राजेंद्र वाघमारे असे त्या युवकाचे नाव आहे. दरम्यान या घटनेची मंगळवेढा पोलीसात नोंद झाली आहे. पोलीस सुत्राकडून मिळालेली माहिती अशी,यातील खबर देणारे राजेंद्र मच्छिंद्र वाघमारे (रा.बोराळे) हे दि.२० रोजी मोहोळ येथे नातेवाईकाचे लग्न असल्याने गेले होते. सायंकाळी ४ वाजता लग्नामध्ये खबर देणाऱ्याचा भाऊ संजय मच्छिंद्र वाघमारे यांनी फोन करुन सांगितले की, तुझा मुलगा उमेश राजेंद्र वाघमारे याने शेतातील लिंबाच्या झाडाला दोरीने गळफास घेतला आहे. मुलाच्या वडिलाने सायंकाळी ५ वाजता येवून पाहिले असता मयत हा झाडाला लटकलेला दिसला. त्यानंतर मयतास खाली उतरवून उपचारासाठी मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयात नेल्यानंतर तेथील डॉक्टरांनी उपचारापुर्वीच मयत झाला असल्याचे दिलेल्या खबर मध्ये म्हटले आहे. याचा अधिक तपास बोराळे बीटचे पोलीस करीत आहेत.

# पंढरपूर सिंहगड कॉलेजमध्ये फेअरवेल कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २१ मे -**

एसकेएन सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर येथील इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभाग व इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग स्टुडंट असोसिएशन (एएड) यांच्या संयुक्त विद्यमाने अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी FREWELL-2K25 या निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के.जे. करांडे यांनी दिली. हा कार्यक्रम २१ मे २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता इलेक्ट्रिकल सेमिनार हॉलमध्ये पार पडला. कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना त्यांच्या चार वर्षांच्या महाविद्यालयीन प्रवासासाठी शुभेच्छा देणे व त्यांच्या आठवणींना उजाळा देणे हे होते. कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. पी.बी. व्यवहारे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. जे. करांडे, उपप्राचार्य डॉ. एस.जी. कुलकर्णी व विद्युत विभागाचे विभागप्रमुख डॉ. के. शिवशंकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमात अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या आठवणींना उजाळा देत मनोगत व्यक्त केले. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, गीत-संगीत आणि मैत्रीच्या गप्पांनी संपूर्ण वातावरण आनंददायी झाले होते. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या मनामध्ये कायमस्वरूपी ठसा उमटवणारा ठरला. तसेच हया कार्यक्रमाच्या अनुषंगाने विद्युत विभागातील अंतिम वर्षातील उत्कृष्ट विद्यार्थी म्हणून तेजस कुलकर्णी यास गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन आणि व्यवस्थापनाबद्दल उपस्थित मान्यवरांनी आयोजकांचे कौतुक केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्युत विभागातील सर्व शिक्षक व शिक्षिकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.




# ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर भारतीय सैन्याच्या समर्थनार्थ माढ्यात तिरंगा रॅली

## शिवसेना शिंदे गटाच्यावतीने आयोजन; नागरिकांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २१ मे-**

येथील शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा संपर्कप्रमुख प्रा.शिवाजीराव सावंत यांच्या नेतृत्वाखाली ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर भारतीय सैन्याच्या समर्थनार्थ तिरंगा रॅली काढण्यात आली. शिवसेनेच्या संपर्क कार्यालयापासून रॅलीला सकाळी ९ वाजता सुरुवात झाली. शहरातील प्रमुख मार्गावरुन ही रॅली झाली.




हाती तिरंगा ध्वंज घेऊन नागरीक रॅलीत सहभागी झाले होते. रॅलीत शिवसेनेचे संपर्कप्रमुख प्रा.शिवाजीराव सावंत, वाकावचे सरपंच ऋतुराज सावंत, शिवसेनेचे संपर्क प्रमुख मुन्ना साठे, नगरसेवक अरविंद खरात आदीसह शिवसेनेचे पदाधिकारी रॅलीत सहभागी झाले होते. तिरंगा रॅलीत भारत माता की जय.. सुन ले बेटा पाकिस्तान.. बाप है तेरा हिंदुस्तान... पाकिस्तान मुर्दाबाद... च्या घोषणाबाजी यावेळी करण्यात आली. तसेच पाकिस्तानच्या निषेधाचे फलक देखील रॅली दरम्यान झळकवण्यात आले. सिमेवर अहोरात्र तैनात राहुन भारत मातेचे संरक्षण करणार्या सैन्याच्या शौर्याला सलाम करण्यासाठी तिरंगा रॅली काढली असल्याचे प्रा.शिवाजीराव सावंत यांनी सांगितले.

# अक्कलकोटमध्ये संततधार पाऊस

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि . २१ मे**

अक्कलकोट मध्ये मंगळवारी दुपारी २ दरम्यान अवकाळी पावसाने झोडपले. बुधवारीही सायंकाळी ५ पासुन रात्रभर भिज पावसाने अक्कलकोट शहर परिसरात हजेरी लावली. मे महिन्यामध्येच अक्कलकोटवासीयाना पावसाळ्याचा अनुभव आला. आंबा फळ बाग शेतकऱ्यास अवकाळी पावसाने मोठा फटका बसला आहे. पावसामुळे कवडीमोल दरात आंबा फळाची विक्री होत आहे. यामुळे आंबा फळ बाग शेतकऱ्यास मोठे नुकसान सोसावे लागत आहे. खवय्यांनी रोजच केवळ आंबा फळवरच सकाळचा नाष्ठा व रोजची भुकही भागवत आहेत.



गेली तीन दिवस तापमानात मोठी घट झाली आहे. रोज विजेचा पंखा लाऊन विश्रांती घेणारे नागरिक मंगळवारी व बुधवारी रात्री विजेचा पंखा न लावता विश्रांती घेतल्याचे काही नागरिकांनी सांगितले. सलग तीन दिवस वारा पावसाने हजेरी लावल्याने आंबा फळ बाग शेतकरी व फळ विक्रेते मोठे हवालदिल झाले आहेत. पाऊसाचे पाणी पडताच आंबा फळास मोठा फटका बसतो यामुळे बाजारात हापूस केशर सह गावरान अंब्याची मोठी आवक वाढल्याने अंब्याच्या दरात मोठी घट झाली आहे.

## महत्वाचे...






## ट्रकखाली येऊन महिला जागीच ठार; बोरामणी नाका येथील घटना

**सोलापूर, दि. २१ मे-**

शहरात जड वाहतुकीचा प्रश्न अजूनही गंभीर आहे याजवळ वाहतुकीमुळे अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. दरम्यान बुधवारी बोरामणी नाका येथे एका ट्रकच्या खाली येऊन महिलेचा जागीच मृत्यू झाला. ही घटना दुपारच्या सुमारास घडली. या अपघातात सदर महिलेचा जागीच मृत्यू झाला असून ट्रकच्या खाली आल्याने सदर महिला ही चेंदामेंदा झाली होती. अंबुबाई शंकर बिचल (वय ५३, रा. घोंगडे वस्ती, भवानी पेठ सोलापूर) असे अपघातात मयत झालेल्या महिलेचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार सदर महिला ही आपल्या सासऱ्यासोबत दुचाकी टीव्हीएस एमएच १३ डीडी ६५२८ गाडीवरून राहते घर घोंगडी वस्ती येथून नवीन घरकुल येथे जात होती. बोरामणी नाका पेट्रोल पंपा समोर येताच ट्रक क्रमांक एमएच १३ एएक्स ३५६८ या गाडीने धडक दिल्याने गाडीवरील महिला ही ट्रकच्या खाली आली आणि तिचा जागीच मृत्यू गेला.

## आतिश सिरसट यांना महागौरव राज्य पुरस्कार

**सोलापूर, दि. २१ मे-**



डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेच्या महाराष्ट्र महागौरव २०२५ राज्यस्तरीय पुरस्कार सोलापूरातील मनोरुग्णांसाठी कार्य करणारे संभव फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष आतिश सिरसट यांना जाहीर करण्यात आला आहे. येत्या २५ मे रोजी पुण्यात या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन होणार असून मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते व ग्राम विकास आणि पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे व आयुष्यमान भारत महाराष्ट्र समिती अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार सोहळा पार पडणार आहे. आतिश सिरसट यांनी संभव फाऊंडेशनच्या माध्यमातून बेवारस मनोरुग्णांच्या जीवनात परिवर्तन घडवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

## मार्कंडेय रुग्णालयात डॉ. श्रीनिवास गज्जम, डॉ. सुदीप संभारम रुजू

**सोलापूर, दि. २१ मे-**

श्री मार्कंडेय रुग्णालयात डॉ. श्रीनिवास अंबाजी गज्जम एम. सी.एच. युरोलॉजीस्ट स्पेशॉलिस्ट तज्ञ म्हणून रुजू झाले. त्यांनी एम.





बी. बी. एस. डॉ. व्ही. एम. जीएमसी येथून केलेले आहे. एम. एस. जनरल सर्जरी एम. जी. एम. मेडिकल कॉलेज, औरंगाबाद येथून केले आहे व एम. सीएच. (युरोलॉजी) Chengalpattu मेडिकल कॉलेज Chengalpattu येथून विशेष प्रशिक्षण घेतले आहे. रुग्णालयात सोम वार ते शनिवार दररोज सकाळी १० ते १२ व सांयकाळी ५ते ७ या वेळेत उपलब्ध असतील. तसेच डॉ. सुदीप नागनाथ संभारम- डी. एन.बी. गायन्याकोलॉजीस्ट तज्ञ म्हणून रुजू त्यांनी एम. बी. बी. एस. डॉ. व्ही. एम. जीएमसी, सोलापूर येथून केलेले आहे. डी. एन. बी. - बी. एम. एच. म्हैसूर येथून केले. त्यांनी FRM² (Fellowship in Reproductive Medicine) Nadkarni Institute, Killa Pardi, Gujrat येथून प्रशिक्षण घेतले आहे. रुग्णालयात सोमवार ते शनिवार दररोज सांयकाळी ४:३० ते ६:३० या वेळेत उपलब्ध असतील. तरी गरजू रुग्णांनी त्यांच्या सेवेचा लाभ घ्यावा.



## सोलापूर शहर युवक काँग्रेसकडून ५१ जणांनी केले रक्तदान

**सोलापूर, दि. २१ मे-**

खा.प्रणिती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त व पहलगाम हल्यातील शाहिदांच्या सन्मानार्थ सोलापूर शहर युवक काँग्रेसच्या वतीने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराचे उद्घाटन काँग्रेस कमिटी अध्यक्ष चेतन नरोटे यांच्या हस्ते करण्यात आले. सदरच्या शिबिरात ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी आयोजक गणेश डोंगरे म्हणाले स्व. राजीव गांधी व पहलगाम हल्ल्यातील शहीदांच्या स्मरणार्थ या रक्तदान आयोजन केले होते. राजीवजी गांधी यांनी या देशासाठी बलिदान दिले होते. रक्तदानमुळे सुद्धा संकटात असलेल्या रुग्णाचे जीव वाचणार आहे. यामुळे रक्तदान शिबीर आयोजन केले आहे. माजी महापौर आरिफ शेख, माजी नगरसेवक विनोद भोसले, वरिष्ठ उपाध्यक्ष सुनिल रसाळे, माजी नगरसेविका फिरदौस पटेल, महिला अध्यक्ष प्रमिला तुपलवंडे, प्रा. नरसिंह आसादे, शकील मौलवी, भीमाशंकर टेकाळे, बाबुराव म्हेत्रे, नागनाथ कदम, सिद्धाराम चाकोते,अक्षय दिल्लीवले, ज्योतीराम पाटील, अजित सिरसट आदींसह पदाधिकारी कार्यकर्ते व उपस्थित होते.

# राष्ट्रधर्म हाच प्रत्येकाचा सर्वश्रेष्ठ धर्म





### निरूपणकार विवेक घळसासी यांचे प्रतिपादन

### माणसाने देव होण्यासाठी जगावे; भागवतकथा ज्ञानयज्ञ पुष्प तिसरे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मे-**

आपल्या मिळालेला मनुष्यदेह केवळ खाण्यापिण्यासाठी नसून त्याद्वारे चांगल्या वागण्यातून देवत्व मिळवणे गरजेचे आहे. देव होण्यासाठी प्रथमतः आपण स्वतःला समजून घेणे गरजेचे आहे. आत्मरूपातून परमात्म प्राप्तासाठी प्रत्येकाने धर्मशास्त्राच्या चाकोरीतून जाणे आवश्यक आहे. धर्माचे पालन करताना प्रत्येकाने वैयक्तिकपेक्षा राष्ट्रधधर्म सर्वश्रेष्ठ मानणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन निरूपणकार विवेक घळसासी यांनी आज केले.

जुळे सोलापूरच्या द्वारकाधिश मंदिरात जवळगेकर परिवाराच्या वतीने श्रीमद भागवत खथा ज्ञान यज्ञाचे आयोजन केले आहे. त्यातील तृतीय पुष्प गंफताना श्री. घळसासी बोलत होते. आजच्या कथेची सुरूवात सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने व श्री. घळसासी यांच्या हस्ते दिपप्रज्वनाने झाली. यावेळी न्यायाधिश सोनाली जवळगेकर, दिलीप जवळगेकर, दिपाली जवळगेकर, संदिप जवळगेकर, केतकी जवळगेकर, कपिल जवळगेकर, किर्ती कुलकर्णी, द्वारकाधिश मंदिराचे व्यवस्थापक दत्तात्रय पाठक आदिसह भाविक मोठ्या संख्येन उपस्थित होते. कथेच्या सुरवातीला स्थानिक कलाकरांनी भजन सादर केले. त्यानंतर श्री. घळसासी यांनी भागवतकथेला सुरूवात केली. ते म्हणाले, देवाची भक्ती करताना मैत्री अन प्रेम भावना समर्पित करण्याची गरज आहे. आपल्या श्वासानुसार नामस्मरणही होणे गरजेचे आहे. भागवतामध्ये विविध राजांची वर्णने आहेत. त्यातील राजा पृथु हा पृथ्वीचा प्रशासक कसा असावा याचे मूर्तीमंत उदाहरण आहे. माणूस म्हणून जन्माला यावे अन इश्वर बनून देह सोडावा असे वर्तन अनेक राजांनी केल्याचे भागवताच्या कथांतून दिसून येते. त्यामुळे भारतीय परंपरेत चार वेद, सहा शास्त्र, ब्रह्मसूत्र, उपनिषदे, पुराण यांना महत्व आहे. १७ पुराणांची रचना करूनही महर्षी व्यासांना अजून काही तरी राहिल्याचे जाणवत होते त्यामुळे त्यांनी १८ वे महापुराण लिहिले ते म्हणजेच भागवत होय. भागवत कथा हे प्रेम शास्त्र आहे. श्री. घळसासी यांनी भागवतातील अनेक कथा, त्यातील विविध वंशात जन्मलेले महापुरूष, विविध शास्त्रांचा अभ्यास असलेले व त्यामध्ये पारंगत स्त्री-पुरूषांचा उल्लेख सांगताना विविध कथांचा आधार घेतला. माणसाला ज्या वेळी बेचैन व्हायला होते त्यावेळी भगवंतावरील प्रेम वाढवावे. भगवंताला आपला सखा मानून त्याला मन अर्पण करणे गरजेचे आहे. माणसात भेद न करता आपण स्वतःला बदलण्याची गरज आहे. श्री.नृसिंह भगवंताच्या आवताराचे महात्म्य श्री. घळसासी यांनी सांगितले. कथेची सांगता भागवताच्या आरतीने व प्रसाद वाटपाने झाली. धो धो पडणाऱ्या पावसातही श्रोत्यांनी मोठी गर्दी केली होती.

## शिवसेना उबाठा पक्षाच्या जिल्हा कार्यालयाचा आज शुभारंभ

### ✔ अंबादास दानवे यांची प्रमुख उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मे-**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख संतोष पाटील यांनी नव्याने उभारलेल्या शिवसेना जिल्हा मध्यवर्ती कार्यालयाचा शुभारंभ गुरुवार दि. २२ मे रोजी सकाळी १०:३० वाजता विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या उपस्थितीत होणार असल्याची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.



विजापूर रोडवरील सैफुल चौकात शिवालय शिवसेना जिल्हा व युवा सेना मध्यवर्ती कार्यालय साकारण्यात आले आहे. या उद्घाटन सोहळ्यास विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, खा. ओमराजे निंबाळकर, आ. दिलीप सोपल, कैलास पाटील प्रवीण स्वामी, सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकीळ, माजी आ. शिवशरण पाटील, उपनेते शरद कोळी, उपनेत्या अस्मिता गायकवाड, लोकसभा क्षेत्र प्रमुख पुरुषोत्तम बरडे, जिल्हाप्रमुख गणेश वानकर, अजय दासरी, धनंजय ढिकोळे, संभाजी शिंदे, सिद्धाराम शीलवंत, लक्ष्मण जाधव, भीमाशंकर म्हेत्रे, प्रिया बसवंती, राजू बिराजदार, सिद्धाराम होनमोरे आणि पूजा खंदारे या प्रमुख मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अंबादास दानवे शिवसैनिकाला मार्गदर्शन यावेळी करणार आहेत. सोलापूर शहर - जिल्ह्यातील शिवसैनिकांना हक्काचे कार्यालय असावे अशी अनेक दिवसांपासूनची मागणी होती. परगावहून येणाऱ्या शिवसैनिकांना पक्षाशी आणि जिल्हाप्रमुखांशी समन्वय साधण्यासाठी या कार्यालयाचा उपयोग होणार आहे. या पत्रकार परिषदेस शिवसेना उपनेत्या अस्मिता गायकवाड, खंडू सलगर, कृष्णा सुरवसे, संतोष घोडके आदी उपस्थित होते.



## शहराचा पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न

### सार्वजनिक आरोग्य अभियंता तपन डंके यांनी घेतला पदभार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मे-**

स्थानिक असल्याने येथील विविध समस्यांची मला माहिती आहे. पाणीपुरवठा विभागाचा अनुभव आहे. प्राप्त परिस्थितीत उपलब्ध यंत्रणेच्या आधारावर सोलापूर शहराचा पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न राहणार आहे, असा मानस सार्वजनिक आरोग्य अभियंता तपन डंके यांनी व्यक्त केला.

तपन डंके यांनी आज म हापालिकेत प्रभारी सार्वजनिक आरोग्य अभियंता पदाचा पदभार घेतला. सोलापूर महापालिकेतील विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि महापालिका पत्रकार संघ तसेच इतर क्षेत्रातील मान्यवरांनी अभियंता तपन डंके यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, महापालिकेतील सार्वजनिक आरोग्य अभियंता पदाची महत्त्वाची जबाबदारी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सोपवली आहे. मोठी संधी दिली आहे. ही जबाबदारी चांगल्या पद्धतीने पार पाडणार आहे. स्थानिक रहिवासी असल्याने येथील विविध सम स्यांची माहिती आहे. वर्षभरापासून पाणीपुरवठा विभागातील काम काजाचा अनुभव आहे. प्राप्त परिस्थिती आणि उपलब्ध यंत्रणेच्या आधारावर सोलापूर शहरातील पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न राहणार आहे. विविध विविध सुधारणा करण्याबरोबरच शहराला नियोजनपूर्वक नियमि तपणे पाणीपुरवठा करण्याचा मानसही यावेळी तपन डंके यांनी व्यक्त केला.

## मनिषा मानेच्या जामीन अर्जावर २७ मे ला सुनावणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मे-**

प्रसिध्द मेंदूविकारतज्ञ डॉ.शिरिष वळसंगकर आत्महत्या प्रकरणात संशयित आरोपी महिलेच्या जामीन अर्जावर सरकारी पक्षातर्फे म्हणणे सादर करण्यासाठी बुधवारी (दि २१) तारीख नेमली होती. मात्र, सरकारी पक्षाकडून म्हणणे सादर करण्यासाठी मुदत वाढवून मिळावी, यासाठी कोर्टात अर्ज दाखल केला, तो मंजूर झाला. आता सरकारी पक्ष २७ मेला आपले म्हणणे सादर करेल.

यापूर्वी सरकारी पक्षाकडून म्हणणे सादर करण्यासाठी दोनवेळा मुदत वाढ घेतली आहे. आता तिसऱ्यांदा मुदत वाढ मिळाली आहे. सरकारी पक्षाकडून म्हणणे सादर केल्यानंतर जामीन अर्जावर सुनावणी होईल.



डॉ. वळसंगकर आत्महत्या प्रकरण

डॉ. वळसंगकर यांनी १८ एप्रिल रोजी डोक्यात बंदुकीद्वारे गोळी झाडून आत्महत्या केली.ही आत्महत्या डॉक्टरांनी हॉस्पिटलम धील प्रशासकीय अधिकारी मनिषा माने-मुसळे (वय ४५)यांनी केलेल्या खोटारडे व घाणेरडे आरोपांमुळे केली आहे, तशी फिर्याद डॉक्टरांचे चिरंजीव डॉ. अश्विन यांनी सदर बझार पोलिसांत दिली होती. त्यावरून संशयित महिला आरोपीस पोलिसांनी कोर्टाची विशेष परवानगी (दि.२० एप्रिल) रात्रीतच अटक केले.

न्यायालयात हजर केले असतो, त्यांना सात दिवसाची पोलिस कोठडी मिळाली. संशयित आरोपीच्या अर्जावर बुधवारी दुपारी सरकारी पक्ष म्हणणे सादर करण्याची तारीख होती. मात्र सरकारी पक्षाने म्हणणे सादर करण्यासाठी मुदत वाढवून मिळावी यासाठी कोर्टात अर्ज दाखल केला. कोर्टाने मुदत वाढ दिली आहे. दि. २७ मे ला सरकारी पक्ष म्हणणे सादर करण्याची शक्यता आहे. सध्या संशयित आरोपी महिलेस २७ मे पर्यंत न्यायालयीन कोठडी आहे. दरम्यान कोर्टाने डॉ. सोनाली वळसंगकर, डॉ. अश्विन व हॉस्पिटल कर्मचारी यांचे जबाब नोंदवून घेतले आहेत. संशयित आरोपीतर्फे ॲड. प्रशांत नवगिरे हे काम पाहत आहेत.

## बार्शीत दुसऱ्या दिवशी अवकाळीचा तडाखा

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २१ मे-**

बार्शी शहर व तालुक्यात गेल्या चार दिवसांपासून सातत्याने मान्सूनपूर्व अवकाळी पाऊस पडत आहे. यामुळे उन्हाळा तर गायब झालाच मात्र उन्हाळ्यातच पुष्य नक्षत्रासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. याचा आंबा, आणि नुकतीच छाटणी झालेल्या द्राक्षबागांना मोठा फटका बसला आहे. मात्र दुसरीकडे उसाला मात्र फायदा झाला आहे.



बार्शी तालुक्याची मे म हिन्याची पावसाची सरासरी ही २१ मिमी एवढी आहे. मात्र यंदा मे महिन्यातील २१ दिवसांपैकी पाच दिवसांत मोठा पाऊस तालुक्यात पडला आहे. एकूण बुधवारचा पाऊस वगळता तालुक्यात ३७ किलोमीटर एवढा पाऊस पडला आहे. मंगळवारी आणि दुसऱ्या दिवशी (बुधवारी) दुपारी देखील चार नंतर तालुक्यात सर्वदूर ढगांच्या गडगडाटासह आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस पडला. रात्री उशिरापर्यंतही हा पाऊस सुरुच होता नव्हे तर पुष्य नक्षत्रासारखी पावसाची रिपरिप सुरुच होती. एकूण- ३६.८ एवढा पाऊस मे महिन्यातील चार दिवसांत पडला आहे. हा पाऊस मान्सूनपूर्वचा होता असे वाटत नव्हते. पावसामुळे शेतातील मशागतीच्या कामांना खीळ बसली आहे. जिकडे तिकडे शेतात पाणी साचले असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत आहे.

**मंडळ वाईज पडलेला पाऊस**

बार्शी- १३.८, आगळगाव- २४.७, वैराग- ६८.४, उपळे दुमाला- २१.१, गौडगाव- ५२, पांगरी - ५६.९, पानगाव- २०.६, नारी- २०.१, सुरडी - ५२.२, खांडवी - ३५.७

## जिल्ह्यात २ टप्प्यात १ लाख ६ हजार ९०० घरकुले मंजूर

- ✔ योग्य लाभार्थ्यांनाच या योजनेतून घरकुले मिळणार
- ✔ प्रकल्प संचालक डॉ. सुधीर ठोंबरे यांची माहिती




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मे-**

जिल्ह्यातील घरकुलाचा एकही लाभार्थी जागे अभावी घरकुलाच्या लाभापासून वंचित राहणार नाही. असा इशारा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी डिपीसी मध्ये देताच प्रशासकीय यंत्रणाही गतीने काम करीत असल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यात २ टप्प्यात पीएम आवास योजनेतून मंजूर झालेल्या १ लाख ६ हजार ९०४ घरांपैकी अर्ध्याच्यावर काम पूर्ण झाले असून, उर्वरित आवास योजनेतील घरकुलाचे काम चालू असल्याची माहिती जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. सुधीर ठोंबरे यांनी दिली.

राज्य शासनाने एकाच वर्षात ३० लाख घरकुले लाभार्थ्यांना मंजूर केलेली असून, सोलापूर जिल्ह्यातील लाभार्थ्यांनाही दुप्पट घरकुले मंजूर करण्यात आलेली असून, सर्व पात्र लाभार्थ्यांना शंभर टक्के घरकुले उपलब्ध करून देण्यात येतील, अशी ग्वाही पालकमंत्री गोरे यांनी नुकतीच डिपीसीच्या बैठकीत दिली होती. या आवास योजनेतून टप्पा क्र. १ मध्ये ४३ हजार ९७२ इतकी घरकुले मंजूर झाली होती. त्यापैकी ४० हजार २११ घरकुले (९१ टक्कें) पूर्ण झाली आहेत. तर टप्पा क्रमांक २ ची ६२ हजार ९३२ घरे मंजूर असून, त्यापैकी ४९ हजार ४४८ इतक्या घरांचे बांधकाम सुरू आहे. जिल्हा प्रशासनाकडून १३४ घरकुल लाभार्थ्यांना जागाही उपलब्ध करून दिलेली आहे तर उर्वरित दोन हजार लाभार्थ्यांना पुढील दीड महिन्यात जागा उपलब्ध केली जाणार आहे. ग्रामीण भागातील गावठाण आणि गायरानाची जागा जसजशी उपलब्ध होईल, तसतसी लाभार्थ्यांना ही जागा देण्यात येणार असल्याचेही डॉ. ठोंबरे यांनी सांगितले.

**योग्य लाभार्थ्यांनाच वाळू अन् घरकुलाचा होणार लाभ**

आवास योजनेसाठी एक ॲप तयार केला असून, लाभार्थ्यांना स्वत:ही यावर घरकुलाची मागणी, जागेची मागणी करता येते. तर या घरकुलाच्या बांधणीसाठी २ लाख १० हजाराचे अनुदान आहे. तसेच यासाठी शासन स्तरावरून ५ ब्रास वाळूही मोफत दिली जाणार आहे. यासाठी संबंधित यंत्रणेकडून घरकुल लाभार्थ्यांना हक पास दिला जाईल आणि तो ऑनलाईनने दिलेला पास वाळू घाटावर जावून महसूल कर्मचाऱ्यांना द्यायचा आणि त्या ठिकाणाहून वाळू घेवून घरी यायचे. यासाठी केवळ वाहन भाडेच लोकांना भरावे लागणार आहे.

**-डॉ. सुधीर ठोंबरे,** प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सोलापूर

## लोकमंगल समृद्ध गाव अभियानात १०४ लाभार्थ्यांची नेत्र तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मे-**

धर्मवीर छत्रपती संभाजी राजे यांच्या जयंतीचे औचित्य साधून लोकमंगल समृद्ध गाव अभियान अंतर्गत सावळेश्वर ग्रामपंचायत येथील हनुमान मंदिर येथे ग्राम स्थांसाठी नेत्र तपासणी शिबिराचा १०४ लाभार्थ्यांनी लाभ घेतला.

लोकमंगल समूहाचे अध्यक्ष आ. सुभाष देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील लोकांचे आरोग्य दृष्ट्या कल्याणकारी योजना राबविण्याचे सुचविले होते. या अनुषंगाने लोकमंगल डेव्हलपमेंट फाउंडेशनचे अध्यक्षा अलका देवडकर व सचिव सचिन परम शेट्टी यांनी कल्याणकारी योजना कार्यक्रम घेण्यास सांगितले. यावर लोकमंगल डेव्हलपमेंट फौंडेशनचे समन्वयक श्यामकुमार भंडारे यांनी नेत्र तपासणी कार्यक्रमाचे आयोजन केले. आदित्य आय केअर सेंटरचे डॉ. किरण कीर्तने, आश्लेषा गायकवाड तसेच लायन्स क्लबचे जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर



कलकेरी, सुरज जाधव, सिंधू सुरवसे यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम संपन्न झाला.

सदर कार्यक्रमास सावळेश्वर ग्रामपंचायतचे सरपंच सखाराम साठे, माजी सरपंच कालीधर गावडे, धनाजी गावडे, दादा लांडगे, लक्ष्मण वाघमोडे, प्रदीप आमले, कुमार अंबुरे, साताप्पा कुंभार, ग्रामसेवक पंडित बारवे, निलेश गुंड, गणपत पवार, उद्धव ढमढेरे, महादेव मसलकर, बबन मिसाळ, अंकुश साबळे, श्रीकांत टेकाळे, ओम हांडे व समस्त गावकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे समन्वयक श्यामकुमार भंडारी यांनी कार्यक्रमाचे प्रस्तावना व सूत्रसंचालन केले. यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शनिवारी शिवस्मारक सभागृहात राज्यस्तरीय मराठा वधू-वर परिचय मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मे-**

भारतीय मराठा महासंघ, सकल मराठा वधुवर संस्था पुणे व शिवश्री प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने मराठा वधुवर पालक परिचय मेळावा शनिवारी २४ मे रोजी शिवस्मारक हॉल येथे होत आहे. या मेळाव्याचे उद्घाटन वधू-वरच करणार आहेत.



जन्म कुंडलीपेक्षा आरोग्य संपन्नतेला प्राधान्य देवून पालकांनी आपला नाव वधू-वरांची लग्ने जमवावीत. या प्रचारासाठी शिवश्री प्रतिष्ठान सामाजिक कार्य म्हणून पालकांना मार्गदर्शन marathajodidar.com हे संकेतस्थळ सुरु केले आहे. संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रातील तसेच मराठवाड्यातील मराठा समाजातील राजपत्रीत अधिकारी, डॉक्टर, इंजिनीअर, कॉम्प्युटर इंजिनीअर, व्यापारी व राजकारणातील १० हजार वधू-वरांची माहिती सदरील कार्यक्रमात पालकांना व वधू-वरांना दाखविली जाणार आहे. आत्तापर्यंत जगभरातून या वेबसाईटवर १२ हजार वधू-वरांनी आपली नावे नोंदवलेली आहेत. अधिक माहितीसाठी जिल्हा भारतीय मराठा महासंघाच्या (९८९०१६९८३०) या मोबाईलवर संपर्क साधावा.



### महत्वाचे...

### क्षत्रिय समाजातील युवकांचा रविवारी मेळावा

**सोलापूर, दि. २१ मे-**

सोमवंशीय सहस्रार्जुन क्षत्रिय समाज विठ्ठल मंदिर ट्रस्ट, सोलापूर च्या वतीने रविवार दि. २५ मे रोजी सकाळी १० ते सायं. ५ वाजेपर्यंत श्री वीरतपस्वी सांस्कृतिक भवन, भवानी पेठ येथे क्षत्रिय समाजातील इयत्ता दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी युवक मेळावा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती अध्यक्ष संजीव बिद्री यांनी पत्रकार परिषदेत दिली. विद्यार्थ्यांनी मेळाव्यात सहभागी होण्यासाठी http://tinyurl.com/SSKYuvak Melava या Google link द्वारे नांवनोंदणी करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी अध्यक्ष संजीव बिद्री (९९२२०६८१७८) अथवा जयकुमार कोल्हापूरे (९४२२४६०४६४) यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन अध्यक्ष संजीव बिद्री यांनी केले. या पत्रकार परिषदेत जयकुमार कोल्हापूरे, भरतकुमार शालगर, राजू भूमकर, श्रीराम पवार, सुरेश बिद्री, मोरेश्वर काटवे, गणेश दामजी, शिरीष कोल्हापुरे, संजीव रंगरेज आदी उपस्थित होते.



### सोलापुरात आज गुंतवणूक विषयी मार्गदर्शन शिबीर

**सोलापूर, दि. २२ मे-**

शेअर बाजार व म्युच्युअल फंडामध्ये गुंतवणूक करण्याबाबत गुरुवार २२ मे रोजी मार्गदर्शन शिबीर संध्याकाळी ५ वाजता वरुण फायनान्शिअल सर्विसेस व म्युच्युअल बेनिफिट फंडस् यांच्या संयुक्त उद्यमाने श्रीभोज हॉटेल, क्रोमा शोरूमच्यावर, बस स्टॅन्ड जवळ होणार आहे. या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे अवाहन सर्टिफाइड विजयकुमार अंकम यांनी केले.

# सन्मानाने वागणूक द्याल तर महाविकास आघाडी; अन्यथा स्वबळाचा नारा : आ. रोहित पवार

**● आगामी महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मांडली भूमिका**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मे**

सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाला येत्या चार महिन्यांमध्ये महापालिका जिल्हा परिषद व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार दिवाळी हंगामात महापालिका निवडणुका होतील, अशी शक्यता वर्तवली जात आहे. त्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार पक्ष निवडणुकांच्या अनुषंगाने सज्ज आहे.

आगामी महापालिका निवडणुकीसाठी स्थानिक पातळीवर व तसेच राज्य पातळीवर महाविकास आघाडी करून लढायचे की स्वबळावर लढायचे याबाबत स्पष्ट भूमिका मांडताना रोहित पवार म्हणाले, महाविकास आघाडीचे काँग्रेस हा मोठा भाऊ आहे. मोठ्या भावाने लहान भावाला जर सन्मानाने वागणूक दिली. तर महाविकास आघाडी होऊ शकते. मात्र मोठ्या भावाने मानसन्मान न देता, कुरघोडी केली तर आम्ही देखील कुरघोडी करण्यास सज्ज आहोत. आता बऱ्याच कालावधीनंतर रोहित पवार कोण आहेत हे माहीत झाले असेल, सर्वसामान्य कार्यकर्त्यांसाठी झटणारा कार्यकर्ता म्हणून रोहित पवार सर्वांना परिचित आहेत. त्यामुळे आगामी निवडणुकीमध्ये हे सर्वांना दाखवून देऊ. असा टोला नाव न घेता आमदार रोहित पवार यांनी महाविकास आघाडी अंतर्गत नेते मंडळींना लगावला आहे.

दरम्यान, रोहित पवार हे सोलापूर दौऱ्यावर आले होते. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन मार्फत संपूर्ण राज्यभरामध्ये चालवल्या जाणाऱ्या सामन्यांबाबत माहिती देण्यासाठी ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. सर्वप्रथम त्यांनी क्रिकेट संदर्भातील माहिती माध्यमांना दिली. क्रिकेटनंतर त्यांनी राजकीय पिचवर त्यांनी तुफान फटकेबाजी केली. महाविकास आघाडी, स्वपक्षीय तसेच विरोधकांना देखील खरे खोटे सुनावले. महापालिका डोळ्यासमोर ठेवून आमचा पक्ष व पक्षातील वरिष्ठ आणि नवीन कार्यकर्ते कार्यरत आहे. एकमेकांवर कुरघोडी न करता, महाविकास आघाडी मधील काँग्रेस आणि शिवसेना यांनी देखील सहकार्याची भावना ठेवून महापालिकेवर आपली सत्ता येण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे. यापूर्वी सोलापूर महापालिकेवर काँग्रेसची सत्ता होती. त्यामुळे काँग्रेस हा मोठ्या भावाच्या भूमिकेत आहे. काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी देखील इतर पक्षांना मानसन्मानाने वागणूक द्यावी. जागा वाटपात कोणताही खोडा घालू नये, ३० ते ४६ जागा या मित्र पक्षांना द्याव्यात. जेणेकरून आमच्या पक्षांमधील कार्यकर्त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न राहील. त्यामुळे काँग्रेसने सहकार्याची भावना ठेवून महाविकास आघाडी अंतर्गत सदरची निवडणूक लढवावी, असा सूचक इशारा आमदार पवार यांनी दिला.

यावेळी युवक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत बाबर, कार्याध्यक्ष सरफराज शेख, महिला अध्यक्षा सुनीता रोटे, युवती अध्यक्षा प्रतीक्षा चव्हाण लता ढेरे उपस्थित होते.



### सोलापूरच्या क्रिकेट वैभवासाठी राजकीय नेत्यांनी एकत्रित यावे

शहराच्या क्रीडाविश्वात वैभवाची भर पडणार आहे त्यासाठी राजकीय नेत्यांनी राजकारण बाजूला ठेवून सोलापूरच्या क्रीडा विश्वाच्या वैभव साठी एकत्र यावे. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आणि सोलापूर डिस्ट्रिक्ट असोसिएशन यांच्या वतीने सोलापुरात राज्य पातळीवरील सामने खेळवले गेले आहेत आणि यापुढे देखील खेळवले जाणार आहेत. यासाठी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन सोलापूरमध्ये गुंतवणूक करणार आहे. क्रिकेट मैदानासाठी २५ एकर जागेची आवश्यकता आहे. सरकारी किंवा खासगी मालकीची जागा असल्यास एमसीए आणि संबंधित जागामालक यांच्या सोबत तीस वर्षांचा करार करून सोलापूरसाठी आणि सोलापूर मधील क्रिकेटपटूंसाठी कौशल्य आधारित प्रशिक्षण केंद्र उभारणार असल्याने त्याला सहाय्यक ठरेल. त्यामुळे विविध राजकीय नेत्यांनी राजकीय पार्श्वभूमी बाजूला ठेवू नये सोलापूरच्या क्रिकेट वैभवसाठी सर्वांनी एकत्र यावे असे आवाहन देखील आमदार पवार यांनी केले.

### नाराजीचा प्रभाव टाळण्यासाठी छगन भुजबळ मंत्रिमंडळात

छगन भुजबळ यांच्या मंत्रिमंडळ प्रवेशाविषयी बोलताना ते म्हणाले की, शिवसेना एकनाथ शिंदे पक्षात चलबिचल करण्यासाठी तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भुजबळ यांच्या नाराजीचा प्रभाव पडू नये या उद्देशाने भाजपने भुजबळ यांना मंत्रिमंडळात घेतले असावे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील ओबीसीचे आरक्षण भाजपमुळे गेले असा आरोप यापूर्वी करणारे भुजबळ आता शांत का आहेत, असा सवाल देखील आ. रोहित पवारांनी केला.

### शेतकऱ्यांच्या सेवेसाठी

## कृषी विभागाने तयार केले ३ क्युआर कोड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मे-**

शेतकरी बांधवांची अनेक व्यावसायिकांकडून पावलोपावली फसगत होत असून, ही फसगत टाळण्यासाठी सोलापूर जिल्हा कृषी विभागाच्या वतीने ३ क्युआर कोड तयार करण्यात आले आहेत. हे क्यु आर कोड वॉटस्ॲवर घेवून स्कॅन केल्यास शेतकऱ्यांना विविध योजनांची व इतर काही माहिती घरबसल्या मिळणार आहे. यामुळे शेतकरी बांधवांची भविष्यात फसगत होणार नाही, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी दिली. या क्युआर कोडचे अनावरण पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते केले आहे.

या क्यु आर कोडमुळे शासनाकडून शेतकरी बांधवांसाठी येणाऱ्या महत्वाच्या योजना कळणार आहेत, इतकेच नाहीतर विविध हंगामात घ्यावयाच्या प्रमुख पिकांची इत्थंभूत माहितीही मिळणार आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे खते, बियाणे, किटकनाशके खरेदी करताना कोणती करावीत, बियाणांच्या विविध जाती, विविध प्रकारच्या खतांचे होणारे फायदे, कोणत्या पिकांवर कोणती किटकनाशके फवारावीत, या किटकनाशकातून विषबाधा झाल्यास काय करावे, अशी विविध प्रकारची माहिती, सल्ले या ३ क्युआरकोडद्वारे मिळणार आहेत. कृषी विभागाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती देण्यात आलेली असून या क्यूआर कोड च्या माध्यमातून जी आवश्यक योजना आहे त्या योजनेचा कोड स्कॅन केल्यानंतर त्या योजनेविषयी सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. या क्यूआर कोडचा शेतकऱ्यांना जास्तीत जास्त फायदा होणार आहे.

# बळीराजाची बि-बियाणे खतांची जुळवाजुळव सुरू

- यंदा खरिपाची पेरणी 'मृग' नक्षत्रावरच होणार
- १०० मिलीमीटर ओल गेल्यावरच तिफण उचला
- जिल्हा कृषी विभागाचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मे-**

सोलापूर शहर आणि जिल्ह्यात गेल्या आठवड्यापासून सरीवर सरी बरसत आहेत. सोमवारी आणि मंगळवारी तर सर्वदूर संततधार असल्याने शेतकरी बांधव खरिपाच्या पेरणीसाठी गडबड करण्याची शक्यता आहे. यामुळे शेतकरी बांधवांनी १०० मिलीमीटर खोल ओल गेल्याशिवाय तिफणीवर हात ठेवू नये, असे आवाहन सोलापूर कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

सध्या बळीराजाची खते-बियाणांची जुळवाजुळव सुरू असल्याचे दिसून येत आहे.



दरम्यान, हवामान विभागाकडून राज्यात २१ ते २४ पर्यंत मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. गेल्या आठवड्यापासूनच पावसाने सुरूवात केल्याने तापमानातही कमालीची घट आली असून, मे महिन्याच्या पंधरवड्यापासूनच यंदा पावसाळा सुरू झाला असल्याने जाणकार नागरिकांतून आश्चर्य व्यक्त होत आहे. ज्या भागात खते, बियाणांचा तुटवडा जाणवतो तेथील शेतकऱ्यांनी कृषी विभागाने निर्माण केलेल्या क्युआर कोडवर तक्रारी नोंदवाव्यात असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे. गेल्या आठवड्यापासूनच सोलापूरसह महाराष्ट्रात अवकाळी पाऊस होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली होती. त्यानुसार पश्चिम महाराष्ट्र, मराठवाड्यात अवकाळी पावसाचा धिंगाणा सुरू झाला आहे. अनेक ठिकाणी विजा पडून मानवासह जनावरेही मृत्युमुखी पडण्याच्या घटना घडत आहेत. दरवर्षी रोहिण्या नक्षत्रापासून सुरू होणारा पाऊस १० ते १५ दिवस अगोदरच सुरू झाला आहे.

जून ते सप्टेंबर या कालावधीत मान्सूनचा पाऊस सरासरीच्या १०५ टक्के होईल, असा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. यामुळे शेतकरी बांधवांतून समाधानाचे वातावरण पसरले आहे. सध्या जिल्ह्यातील शेतकरी बांधव पेरणीपूर्व मशागती पूर्ण करून बि-बियाणे, खतांची जुळवाजुळव करीत आहेत. तर जूनपर्यंत ही सर्व कामे झाल्यानंतर पाऊस पडताच जून ८ पासून जिल्ह्यातील शेतकरी पेरणी चालू करतो. सध्या वातावरणातील होत असलेल्या बदलामुळे तापमानातही चढउतार दिसून येत आहे. दिवसभर आभाळी वातावरण निर्माण झाल्याने हवेत गारवाच होता. रोजच मेघगर्जना आणि पावसाची रिपरिप सुरू आहे.

# सोलापूर शहर-जिल्ह्यात मान्सुनपूर्व मुसळधार

- वाहनधारकांसह चाकरमान्यांचे हाल
- घोंगडे वस्ती भागात घरात घुसले पाणी
- यंदा रोहिणी की मृगात पेरायचे?
- शेतकरी बांधवांची द्विधावस्था

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मे-**

सोलापूर शहर आणि जिल्ह्याच्या बहुतांश भागात बुधवारी मान्सुनपूर्व पावसाने अक्षरश: झोडपून काढले असून, सोलापूर शहरातील गटारी, रस्त्यांना ओढ्याचे स्वरूप आल्याचे दिसून येत होते. सायंकाळी ५ च्या सुमारास सुरू झालेला पाऊस रात्री उशिरापर्यंत रमला आणि यामुळे शहरातील वाहनधारकांची आणि चाकरमान्यांचे बेहाल झाले. सध्या या निब्बर पडलेल्या पावसामुळे रोहिण्यात पेरायचे की मृग नक्षत्रात या द्विधावस्थेत शेतकरी आहेत.

सोलापूर शहरात पडलेल्या तफानी पावसामध्ये सोलापूर शहर हद्दवाढ, बसस्थानक परिसर, आसरा परिसर, नवीपेठ, मधला मारूती, कौतम चौक, दाजी पेठ, सातरस्ता, गांधीनगर आदी भागातून नदी-नाल्याप्रमाणे जोरात पाणी वाहत होते. सखल भागात असलेल्या अनेक घरातही आज पाणी साचल्याचे दिसून आले. यामुळे अनेक नागरिकांसह महिला भगिनींचे हाल झाले. भवानी पेठ, घोंगडे वस्ती भागातील काही घरात पाणी शिरल्याचे दिसून आले. दरम्यान, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूरसह इतरही काही तालुक्यात पावसाने जोरदार बॅटिंग केल्याचे आमच्या वार्ताहरांनी कळविले.

आज सोलापूर जिल्ह्यातच नाहीतर दक्षिण कोकण, दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा-विदर्भातील काही भागात या पावसाने धुमाकूळ घातला. तर येत्या २४ तासात मान्सून मुंबईसह महाराष्ट्राच्या आणखी काही भागात जाण्यासाठी हवामान अनुकूल असल्याचं हवामान विभागाने म्हंटलं आहे. या काळात कोकण-गोव्यात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आलाय. तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाजही व्यक्त केला आहे. त्यामुळे उद्यापर्यंत मान्सून महाराष्ट्राचा जवळपास अर्ध्यापेक्षा जास्त भाग व्यापेल, अशी आशाही हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

महाराष्ट्रातील बहुतांश भागाला मान्सूनपूर्व पावसाने अक्षरक्ष: झोडपून काढले आहे. तर काल, मंगळवारी संध्याकाळपासून मुंबई, पुण्यासह राज्यातील अनेक ठिकाणी विजांच्या गडगडाटासह पाऊस झाला. तर पुण्यातील काही रस्त्यांना अगदी नदीचं स्वरुप आल्याचं दिसून आलं. अचानक आलेल्या आणि सोलापुरातही काही वेळातच या मुसळधार पावसानं सर्वत्र एकच दाणादाण उडवून दिली. काही भागात या पावसाने शेतकऱ्यांचे नुकसानही केलं आहे.



### येत्या चार दिवसात मुसळधार पावसाची शक्यता

अरबी समुद्रात कमी दाबाचं क्षेत्र निर्माण होत असल्यानं त्याचा प्रभाव मुंबईसह महाराष्ट्रात दक्षिण कोकण आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रावर दिसणार आहे. त्यामुळं येत्या २२ मे ते २४ मे या कालावधीत अनेक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्याकडून वर्तविण्यात आली आहे.

### आजतागायत जिल्ह्यात सरासरी ८४.० मिलीमीटर पाऊस

उत्तर सोलापूर ९९.३, मिलिमीटर, दक्षिण सोलापूर ८९.८, बार्शी ५२.०, अक्कलकोट ८३.९, मोहोळ ७८.०, माढा ८६.०, करमाळा ८३.३, पंढरपूर ५६.५, सांगोला ११६.७, माळशिरस ८६.० तर मंगळवेढा १११.४ तर एकूण जिल्ह्यात सरासरी पाऊस ८४.० मिलीमीटर इतका नोंदला गेला आहे तर पुणे विभागात ८२.० मिलीमीटर इतक्या पावसाची नोंद झाली आहे.



## ज्ञानामृत आनंदलहरी ११२३

**तंव कृष्ण म्हणती साचचि । बोलत आहासि तें तैसेंचि ।**
**यया मनाचा कीर चपळचि । स्वभावो गा ।।**

श्रीकृष्णाने अर्जुनाला आतापर्यन्त योगाभ्यासाचा मार्ग सांगीतला आहे या मार्गावरुन चालण्यासाठी मनोनिग्रह अत्यंत महत्वाचा असल्याचे सांगितले. त्यावर अर्जुन म्हणाला, देवा, आपण अत्यंत सुंदर असा मार्ग सांगत आहात.पण त्या मार्गावरुन चालण्यासाठी मनाला ताब्यात घेणे आवश्यक आहे असे आपले म्हणणे आहे. या मनाच्या लांबी, रुंदी, उंची, खोलीचा अंदाजच येत नाही. तेव्हा या मनावर नियंत्रण आणाचये कसे? हे केव्हा कोठे, कसे धावेल, याची अनिश्चिती असते. वादळीवारा थांबवणे सोपे आहे, पण या धावणाऱ्या मनाला थोपवणे अवघड आहे.



सारासार विचार शक्तीला भुरळ घालणारे, निश्चयाला ढासळून टाकणारे, सात्विक धैर्याला चकविणारे हे मन नियंत्रित करायचे कसे ? याला आवरु म्हटले तर हे जास्त उसळते. संयम करण्याचा प्रत्यन याचा आवेश वाढविण्यास सहाय्यक ठरतो. म्हणून आमचे मन नियंत्रीत होईल असे मला वाटत नाही. असा स्पष्ट खुलासा अर्जुनाने श्रीकृष्णाकडे केला आहे. अर्जुनाने मनाच्या चंचलतेबद्यल आपला अनुभव कथन केल्यानंतर श्रीकृष्ण म्हणाले,

**तंव कृष्ण म्हणती साचचि । बोलत आहासि तें तैसेंचि ।**
**यया मनाचा कीर चपळची । स्वभावो गा ।।**

अर्थात अर्जुना, तु म्हणत आहेस ते खरे आहे. खरोखर या मनाचा चंचलता हा स्वभाव आहे. परंतु वैराग्याच्या साहाय्याने या मनाला योगाभ्यासाच्या मार्गाकडे वळवले तर कांही काळानंतर ते स्थिर होऊ शकेल. या मनाचा एक गुण असा आहे की, याने जर एखादया विषयाची गोडी चाखली तर ते त्या विषयाच्या ठिकाणी घुटमळते. म्हणुन याला आत्मसुखाची गोडी लावावी. जे वैराग्याची, योगाभ्यासाची भावनाच आपल्या मनात जागविणार नाहीत, त्यांचे मन नियंत्रीत होण्याचा प्रश्नच येत नाही. म्हणून अर्जुना, तू योगाभ्यासाच्या वाटेने जाण्याचा प्रथम निश्चय कर. त्यानंतर वैराग्याची कास धर. मग प्रयत्नाने हळू-हळू मन त्या वाटेवर येऊ लागेल. हे तुझ्या ध्यानात येऊ लागेल. त्या वाटेवर पाऊल टाकण्याच्या आगोदरच जर मन माझे ऐकत नाही म्हणून तु हरुन बसलास तर मनाला तुझी ही हार आवडणारच आहे यात शंका नाही. मनाला पुर्णत: संयमित करणे जर अशक्यच असते तर, आजपर्यन्त अनेक योगी निर्माण झालेच नसते. याचाच अर्थ असा आहे की, जर माणसाने ठरवले तर त्याचे मन तो संयमित करु शकतो.. अंगात योगसामर्थ्य आले तर, या मनाचा चंचलपणा टिकण्याचे कारणच नाही. म्हणून अर्जुना तु योगसामर्थ्य, आत्मविश्वास, दृढनिश्चय प्रथम वाढव आणि या मनाचा निग्रह करण्याचा सतत प्रयत्न कर. अभ्यासाने व पुन्हा पुन्हा प्रयत्न केल्याने मन आपोआप स्थिर होऊ लागेल. प्रयत्नाअंती तुला तुझे मन स्थिर होत असल्याची प्रचिती येईल. श्रीकृष्णाच्या कृपेने व मार्गदर्शनाने आणि अर्जुनाच्या प्रयासाने त्याचे मन स्थिर होईल. यात शंका वाटत नाही. कारण तो एवढया भयंकर युध्दप्रसंगी युध्दभुमीवर एकचित्त होऊन श्रीकृष्णांचे मार्गदर्शन ऐकण्यात यशस्वी झाला आहे. म्हणजेच त्याचे मन त्याच्या ताब्यात आहेच. पण आपल्या चंचल मनाचे काय ? आपणाला कुरुक्षेत्रावर जाऊन अर्जुना प्रमाणे युध्द करायचे नसले तरी या संसारभूमीत आपले आपल्याशी अनेकवेळा युध्द होत असते. या युध्दात चिंता, मोह, दु:ख, स्वार्थ या सर्व शत्रुवर विजय मिळविण्यासाठी आपणालाही मनावर नियंत्रण करण्याची गरज आहे, हे विसरता कामा नये.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. २२ मे २०२५ | संत मुक्ताबाई पुण्यतिथी, |
| विक्रम संवत् २०८१ | भारतीय ज्येष्ठ मासारंभ |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसू | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - वैशाख | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. दशमी (२५.१२) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - पू.भाद्रपदा (१७.४६) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - विष्कंभ (२१.४८) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - वणिज (१४.२१) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : लांब रहात असलेल्या नातेवाईकांकडून फायदा मिळेल. मन उत्साही राहिल्याने आजचा दिवस चांगला जाईल. व्यापार चांगला चालेल.

**वृषभ** : राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. कार्यक्षेत्रात प्रगती होईल. आपल्याला नवीन संधी मिळतील. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका.

**मिथुन** : कौटुंबिक वातावरण सहकार्याचे राहील. आर्थिक फायदा झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. खाण्या पिण्याकडे लक्ष द्या.

**कर्क** : घाई गडबडीने कोणतेही काम करू नका.मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील.

**सिंह** : सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल. कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल.

**कन्या** : व्यापारात नवीन योजनाचा शुभारंभ होईल. मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांचे प्रेम मिळेल. आपल्या व्यसनांना चालना देऊ नका.

**तुळ** : चांगल्या लोकांच्या गाठी होतील ते आपले हिंतचिंतक असतील. प्रवास सावधानीने करावा. योजना कार्यान्वयीत होतील. एखादे अवघड काम झाल्याने आनंदी रहाल.

**वृश्चिक** : आपल्या कामाचे समाजात प्रशंसा होईल. सकारात्मक विचार कराल. व्यापारिक कामे यशस्वी होतील. जोखमीचे काम करण्यापासून सावधान रहा.

**धनु** : स्वत:च्या विचाराने कामे केले तर फायदेशीर रहाल. शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:पश्चिम आनंदी बातमी कळेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. आर्थिक योजना वेळेत पूर्ण होतील.

**मकर** : खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. नवीन कामाशी संबंध येण्याचा योग आहे. कोणत्याही कामात स्पर्धक म्हणून राहण्यातच आपला फायदा आहे.

**कुंभ** : प्रवासाचा योग आहे. व्यापार व्यवस्याय भरभराटीवर. सुख समृध्दीत वाढ होईल. अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर. निष्कारण वाद विवाद टाळा.

**मीन** : कामाची गती अशीच राहू द्या. व्यापारा निमित्ताने केलेला प्रवास सफल होईल. आपले स्वप्न पूरे होतील.

# सोलापूर बसस्थानकातील ९ सीसीटीव्ही कॅमेरे बंदच

## एसटी स्टँड परिसराची सुरक्षा रामभरोसे

### गुन्हेगारीचे प्रमाण वाढण्याची शक्यता





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मे-**

पुण्यातील स्वारगेट येथील दुर्दैवी घटनेनंतर राज्यातील इतर बस स्थानकातील सुरक्षा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्याचाच एक भाग म्हणून सोलापूर बस स्थानक परिसरात पाहणी केली असता, येथे देखील सुरक्षेचा प्रश्न रामभरोसे राहिलेला दिसत आहे. सोलापूर बसस्थानकावर पोलिस वगळता सुरक्षा रक्षक दिसून येत नाही. एसटी महामंडळ तेथील सुरक्षेची जबाबदारी झटकत असल्याची स्थिती आहे. तेथे असलेल्या २१ पैकी ९ सीसीटीव्ही कॅमेरा एप्रिल महिन्यापासून बंद आहेत. बाहेर पडणाऱ्या गेट व मालवाहतूक गोदाम परिसरातील चारपैकी १ कॅमेरा बंद आहे. त्यामुळे परिसरातील गुन्हेगार व संशयितांच्या हालचाली टिपल्या जात नाहीत. मराठवाड्याकडे जाणाऱ्या स्थानकावरील सीसीटीव्ही बंद असून, ते पोलिसांनी सांगूनही एसटी महामंडळ लक्ष देत नाही. स्थानकात दुचाकी वाहने फलाटावरच लावण्यात येतात. बसऐवजी चारचाकी पार्क केल्याचे दिसून आले. मागील आठवड्यात एका बालकास महिलेने पळवले. ते शोधण्यासाठी सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचा निर्णय झाला असता, ते बंद असल्याचे समोर आले. सध्या उन्हाळ्याचा हंगाम सुरू आहे. त्यामुळे परगावी जाण्यासाठी प्रवाशांची स्टॅन्ड परिसरात गर्दी वाढत आहे. त्या गर्दीचा गैरफायदा घेऊन भुरट्या चोरांचे प्रमाण वाढत आहे. बसस्थानकावर सोन्याची चैन व मंगळसूत्र बॅग, मोबाईल पळवणे, पैसे चोरी करण्याचे प्रकार सर्रासपणे घडत आहेत. एसटी महामंडळाचे अधिकारी सुरक्षेविषयी गंभीर नसल्याचे दिसून आले. तसेच प्रवाशांसाठी नागरी सुविधा नाही. स्वच्छतागृहांत पाणी नाही. परिसरात घाण साचलेली आहे. फलाटावर एसटी एवजी कार पार्किंग केल्या जातात. एसटी थांबल्यावर प्रवाशांना सहज एसटी बसमध्ये चढता येत नाही. कारण फलाटावर दुचाकी पार्क केलेल्या असतात. एसटी बसच्या समोर आणून मोटारसायकल लावतात. प्रवेश केल्यानंतर डाव्या बाजूस सुमारे २५ पेक्षा जास्त मोटारसायकल स्थानकात होते. मालवाहतूक विभाग, मुंबईकडे जाणाऱ्या प्लॅटफर्मसमोर मोटारसायकल लावलेले असतात. स्थानकात वाहने येऊ नये म्हणून एसटी विभागाचे अधिकारी प्रयत्न करत नाहीत. अशा एक ना अनेक समस्या डोके वर काढत असताना एसटी प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.

### वायर तुटल्याने कॅमेरा बंद

सीसीटिव्हीचे वायर तुटल्याने सीसीटीव्ही कॅमेरे बंद आहेत. ते सुरू करण्यास सांगितले आहे. खासगी वाहने आत येतात. पण सांगूनही दुचाकीस्वार ऐकत नाहीत. स्वच्छता करण्यात येत आहे.

**- अमोल गोंजारी,**
**एसटी विभाग नियंत्रक,**

# एमपीएससी गट-ब पूर्व परीक्षेत २०४ उमेदवार उत्तीर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मे-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षेत सोलापुरातील २०४ उमेदवार उत्तीर्ण झाले आहेत. एकूण १६२३ जणांनी ही परीक्षा दिली होती. सोमवारी १९ मे रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर निकाल प्रसिद्ध करण्यात आला आहे. यंदाच्या निकालामध्ये जनरल कॅटेगरीच्या मुलांचा कट ऑफ ६२.५० असा आहे. जो आतापर्यंतचा सर्वात उच्च कट ऑफ ठरला आहे. तर जनरल कॅटेगरीच्या मुलींचा कट ऑफ ५९.२५ आहे.

आयोगामार्फत एकूण ४७९ पदांसाठी ही परीक्षा २ फेब्रुवारीला घेण्यात आली होती. तीन महिने होत आले तरी महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षेचा निकाल रखडल्याने विद्यार्थी नाराज होते. अखेर या निकालाची प्रतीक्षा संपली आहे. या परीक्षेद्वारे सहायक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षक आणि पोलिस उपनिरीक्षक पदांसाठी भरती होणार आहे. यांचा समावेश आहे. या भरतीसाठी जाहिरात ऑक्टोबर २०२४ मध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती. परीक्षा आधी ५ जानेवारी २०२५ ला होणार होती. पण, ती पुढे ढकलून २ फेब्रुवारीला घेण्यात आलेली. ऑक्टोबरपासून उमेदवारांनी अभ्यास सुरू केला मात्र परीक्षा फेब्रुवारीत झाली. आत्ता मुख्य परिक्षा येत्या जून महिन्यात होणार आहे.

ऑक्टोबर २०२४ मध्ये भरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध झाली होती. यात गट बच्या संयुक्त पूर्व परीक्षेतून सहायक कक्ष अधिकारी (५४) पदे, राज्य कर निरीक्षक (२०९) पदे पोलिस उपनिरीक्षक (२१६) अशी एकूण -४७९ पदे आहेत.

### २९ जूनला मुख्य परीक्षा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त मुख्य परीक्षा २९ जून रोजी घेण्यात येणार आहे. राज्यभरातील प्रमुख ६ जिल्ह्यांमधील केंद्रावर या परीक्षेसाठी नियोजन करण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी उमेदवारांना २० मे ते ३ जून पर्यंत ऑनलाईन अर्ज भरता येईल. ५ जून पर्यंत चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरता येईल.

### भावी अधिकाऱ्यांना न्याय द्या

एमपीएससी संयुक्त परीक्षेची निकालाची बघितला तर सोलापूर जिल्ह्यातून जवळपास २०० पेक्षा जास्त उमेदवार यावेळी उत्तीर्ण आहेत. गेल्या दोन वर्षापासून ही परीक्षा रखडत होती. आत्ता मात्र उर्वरित सर्व प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून भावी अधिकाऱ्यांना न्याय द्यावे.

**- कबीर जमादार, कार्याध्यक्ष,**
**स्पर्धा परीक्षा विद्यार्थी असोसिएशन, सोलापूर**

# मंगळवेढ्यात पूर्ववैमनस्यातून दोघांवर कुऱ्हाडीने हल्ला

**सोलापूर, दि. २१ मे-**

पूर्वी झालेल्या भांडणचा राग मनात धरून दोघांवर कु-हाडीने हल्ला करण्यात आला. ही मारहाण मंगळवेढा येथे मंगळवारी रात्री अकराच्या सुमारास झाली. यात हल्ल्यात भैरवनाथ तुकाराम शेगर (वय ५०) व राहुल भैरवनाथ शेगर (वय २५, दोघे रा. मंगळवेढा) हे जखमी झाले आहेत. शंकर किसन शिंदे व शिवराम शिंदे यांच्याबरोबर भैरवनाथ यांची यापूर्वी तक्रार झाली होती. तेव्हापासून शिंदे हे भेरवनाथ व त्याच्या मुलावर चिडून होते. दरम्यान मंगळवारी रात्री अकराच्या सुमारास भैरवनाथ हे त्यांच्या घरी असताना शंकर शिंदे, शिवराम शिंदे हे त्यांच्या साथीदारासह तेथे आले. त्यांनी पूर्वीच्या भांडणाच्या रागातून कु-हाडीने व लोखंडी रॉडने मारहाण केली. यात भैरवनाथ यांच्या उजव्या डोळ्याजवळ तर राहुलच्या डोक्याला जखम झाली. तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केल्याने दोघांना मुकामार लागल्याने मंगळवेढा येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून बुधवारी दुपारी १२.१५ वाजता ते उपचाराकरीता शासकीय रुग्णालयात दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# सावळेश्वरात वृध्दाने प्राशन केले फवारणीचे औषध

**सोलापूर, दि. २१ मे-**

अज्ञात कारणातून मोहोळ तालुक्यातील सावळेश्वर गावात तानाजी भिमराव उराडे (वय ६०) यांनी पिकावर फवारणीचे औषध प्राशन केले. हा प्रकार बुधवारी रात्री १.३० वाजता उघडकीस आला. तानाजी हे मंगळवारी रात्री सावळेश्वर येथील त्यांच्या राहत्या घरी होते. दरम्यान बुधवारी रात्री १.३० वाजता त्यांनी पिकावर फवारणी करण्यासाठी आणलेले घरातील औषध प्राशन केले. यानंतर त्यांना उलट्यांचा त्रास होऊ लागल्याने सकाळी ६.३० वाजता जावई शिवाजी काकडे यांनी शासकीय रुग्णालयत दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# चायनीजचा धंदा करायचा असेल तर तीन हजार रुपये द्यावे लागतील

## अवंती नगरातील खंडणीखोर दादाची रवानगी जेलमध्ये



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मे-**

चायनीजचा धंदा करायचा असेल तर महिन्याला तीन हजार रुपये द्यावे लागतील असे म्हणून उत्तर प्रदेशातील तरूणास मारहाण करून खाद्यपदार्थाच्या गाड्याचे ४० हजारांचे नुकसान करणाऱ्या दादाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दादाला फौजदार चावडी पोलिसांनी तात्काळ अटक केली असून न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली असून त्याची रवानगी जेलमध्ये करण्यात आली आहे.

याबाबत योगेंद्रसिंह शिताराम यादव (वय २५, रा. चुर्खी रोड, बंधीरा बाईपास, इरई, जालीन, उत्तर प्रदेश) याने दिलेल्या फिर्यादीवरुन भिम उर्फ आकाश गुरव (रा. अभिमानश्री नगर, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भिम गुरव हा पोलिसांच्या रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून न्यायालयाने त्यास जेलमध्ये ठेवण्याचा आदेश दिला आहे. योगेंद्रसिंग यादव व त्याचा भाऊ विशाल हे दोघे १८ मे रोजी सायंकाळी चारच्या सुमारास अवंती नगर येथे पाणीपुरी व चायनिज खाद्यपदार्थ विक्री करीत होते. त्यावेळी सायंकाळी यादव याच्या भेळ गाड्याजवळ भिम गुरव हा आला व त्याने यादव यास तुला इथे धंदा करायचे असेल तर महिन्याला मला तीन हजार रुपये द्यावे लागतील नाही तर तुम्हांला इथे धंदा करू देणार नाही. त्यावेळी यादव याने पैसे देण्यास नकार दिल्यानंतर भिम गुरव याने मैं इधर का दादा हूं, तुमको इधर धंदा करणा है, तो पैसा देणा ही होगा, असे म्हणून यादव यांना थोबाडीत मारून त्याच्या भेळ गाडीचे व भाऊ विशाल याच्या चायनीजच्या गाड्या ढकलून दिले. याबाबत यादव याने फौजदार चावडी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल करून गुन्हा दाखल केला. पोलिसांनी लागलीच हालचाली करून भिम गुरव यास अटक केली. गुरवला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यास न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यामुळे गुरव याची रवानगी जेलमध्ये करण्यात आली आहे. सहायक पोलिस निरीक्षक पाटील पुढील तपास कीरत आहेत.




# भारतरत्न स्व. राजीव गांधी यांना काँग्रेस पक्षाच्या वतीने अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मे-**

सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने जरा याद करो कुर्बानी 'जय हिंद' या संकल्पनेतून ऑपरेशन सिंदुरमध्ये भारतीय जवानांनी केलेल्या शौर्याला सलाम करण्यासाठी कार्यक्रम आयोजित केला होता. तसेच माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी वीर जवानांना सलाम करण्यासाठी घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी युद्धात मृत्युमुखी पडलेल्या शहिदांना मानवंदना देण्यासाठी जरा याद करो कुर्बानी हा कार्यक्रम काँग्रेस भवन सोलापूर येथे आयोजित आहे. तसेच भारतरत्न स्व. राजीवजी गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांनाही अभिवादन केल्याचे सांगितले. यावेळी अध्यक्ष चेतन नरोटे, माजी महापौर आरिफ शेख, माजी नगरसेवक विनोद भोसले, महिला अध्यक्ष प्रमिला तुपलवंडे, युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, प्रा. नरसिंह आसादे, शकील मौलवी, भीमाशंकर टेकाळे, बाबुराव म्हेत्रे, नागनाथ कदम, सिद्धाराम चाकोते, हारून शेख, अंबादास गुत्तीकोंडा, बसवराज म्हेत्रे, रामसिंग आंबेवाले, अनिल मस्के, करीमुनिसा बागवान, शोभा बोबे, ज्योती गायकवाड, तिरुपती परकीपंडला उपस्थित होते.

# मोटार वाहन निरीक्षकांच्या बदल्या

## जिल्ह्यातून ९ अधिकारी गेले तर ८ अधिकारी आले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मे-**

राज्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयात कार्यरत असलेल्या मोटार वाहन निरीक्षकांच्या प्रशासकीय कारणास्तव बदल्या करण्यात आलेल्या आहेत. राज्यातील १५९ जणांच्या बदल्या करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये सोलापूर प्रादेशिक परिवहन कार्यालयातील ९ जणांच्या प्रशासकीय कारणास्तव बदल्या करण्यात आलेल्या आहेत. आठजण बाहेरच्या जिल्ह्यातून सोलापूर प्रादेशिक कार्यालयात दाखल होणार आहेत. महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाकडून २१ मे रोजी ऑनलाईन संगणकीय प्रणालीद्वारे मोटार वाहन निरीक्षकांचा बदल्याचा आदेश काढण्यात आला आहे.

राज्यातील परिवहन विभागाच्या प्रादेशिक व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील मोटार वाहन निरीक्षकांच्या ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे १९ मे रोजी बदल्या करण्यात आल्या. या आदेशानुसार सोलापूर प्रादेशिक परिवहन कार्यालयातून इतर ठिकाणी बदलून गेलेले मोटार वाहन निरीक्षकांची नावे पुढीलप्रमाणे (कंसात कोठे गेले ते) : मोटार वाहन निरीक्षक शिरिष पवार (सोलापूर ते सातारा), सचिंद्रकुमार राठोड (सोलापूर ते लातूर), किरण गोंधळे (सोलापूर ते लातूर), शिवाजी सोनटक्के (सोलापूर ते लातूर), संदिप शिंदे (सोलापूर ते धाराशिव), प्रदीप बनसोडे (सोलापूर ते हिंगोली), पल्लवी पांडव (सोलापूर ते परभणी), अविनाश आंभोरे (सोलापूर ते गडचिरोली), शीतलकुमार कुंभार (सोलापूर ते बुलढाणा). तर सोलापूर प्रादेशिक परिवहन कार्यालयात बदलून आलेले अधिकारी पुढीलप्रमाणे (कंसात कोठून आले ते) : नीलेश देशमुख (नागपूर ग्रामीण ते सोलापूर), गणेश तपकिरे (नांदेड ते सोलापूर), राजन सरदेसाई (अमरावती ते सोलापूर), साधना कवळे (वर्धा ते सोलापूर), विशाल यादव (लातूर ते सोलापूर), संतोष झगडे (पुणे ते सोलापूर), धनंजय थोरे (लातूर ते सोलापूर), मयुर भोसेकर (पिंपरी चिंचवड ते अकलूज). बदली झालेल्या अधिकाऱ्यांनी नवीन पदाचा पदभार त्वरीत स्विकारावा. संबंधित नियंत्रक आधिकाऱ्यांनी बदली करण्यात आलेल्या अधिकाऱ्यास त्याच्या सध्याच्या पदभारातून तात्काळ कार्य मुक्त करून, त्यांना बदलीच्या ठिकाणी तातडीने रुजू होण्यास सांगितले आहे.

### आरटीओ अधिकाऱ्यांची केली होती तक्रार

जिल्हा नियोजनाच्या बैठकीत लोकप्रतिनिधींनी प्रादेशिक परिवहन विभाग शेतकऱ्यांचा वाहनांना आडवून दंड आकारण्यात येत आहे, अनावश्यक वसुली केली जात आहे, त्याचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी लोकप्रतिनिधींनी पालकमंत्री गोरे यांच्याकडे केली होती. या तक्रारींच्या अनुषंगाने बदल्यांचे आदेश निघाल्यानंतर चर्चा करण्यात येत आहे.

### प्रशासकीय कारणास्तव बदल्या

सोलापूरसह राज्यातील मोटार वाहतुक निरीक्षकांच्या बदल्या या प्रशासकीय कारणास्तव केल्या आहेत. त्यामध्ये शहरातील ९ जणांच्या बदल्या झालेल्या आहेत, मात्र बाहेरून ७ जण दाखल झालेले आहेत.

**- विजय पाटील,**
**उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्वाचे...

### सिध्दराम म्हेत्रे यांच्या शिवसेना प्रवेशामुळे पक्षाची ताकद वाढणार : रवीना राठोड

**अक्कलकोट, दि.२१ मे-**

माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे कॉंग्रेस पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला आहे. माजी गृह राज्य मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांचे अक्कलकोट तालुक्याच्या विकासासाठी मोठं योगदान आहे . अक्कलकोट तालुक्यात सात वेळा विधानसभा निवडणुकीचा मोठा अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. त्यांच्या राजकीय अनुभवाचा व दांडगा जनसंपर्काचा मोठा फायदा नक्कीच शिवसेना वाढीसाठी होईल. शिवसेना शिंदे गटात माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे असंख्य कार्यकर्त्यासह प्रवेश करणार आहेत . शिवसेना महिला आघाडी जिल्हाप्रमुख रवीना राठोड यांनी सिद्धाराम म्हैत्रे यांच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. शिवसेना शिंदे गटात प्रवेश केल्याने आमच्या पक्षाची ताकद वाढणार आहे. शिवसेना पदाधिकाऱ्यांना बळ मिळेल व आमच्या पक्षाला स्वतंत्र निर्णय घेण्याची क्षमता वाढेल जुन्या शिवसैनिकांना न्याय मिळेल. युती धर्माचे पालन होईल कार्यकर्त्यावरील अन्याय थांबेल. आम्ही आमच्या पक्षात सिद्धाराम म्हैत्रे यांचे भव्य स्वागत करू. अक्कलकोट तालुक्याच्या विकासासाठी सिद्धाराम म्हैत्रे यांची शिवसेना पक्षाला गरज आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व संपर्क प्रमुख शिवाजी सावंत यांच्या नेतृत्वाखाली ते अक्कलकोटचा विकास करतील. जुन्या शिवसैनीकाना ते बळ देतील. सर्व शिवसैनिकाना साथ घेऊन काम करतील 'असे शिवसेना महिला आघाडी जिल्हा प्रमुख रवीना राठोड यांनी सांगितले.





### सांगोला महाविद्यालयात दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस साजरा

**सांगोला, दि.२१ मे-**

सांगोला येथील सांगोला महाविद्यालयात बुधवारी दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवसाची शपथ घेण्यात आली. भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुण्यतीथी निमित्त दि.२१ मे हा दिवस दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस म्हणून साजरा केला जातो. हा दिवस पाळण्यामागचा उददेश जनतेला दहशतवाद व हिंचासारापासून दूर ठेवणे हा आहे. विद्यार्थ्यांनी दहशतवाद व हिंचासारापासून दूर रहावे असे मत मराठी विभागप्रमुख डॉ.बबन गायकवाड यांनी यावेळी व्यक्त केले. दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवसाची शपथ डॉ.एम.डी. वेदपाठक यांनी वाचन केले. कार्यक्रमाचे नियोजन डॉ.अमोल पवार, प्रदिप आसबे यांनी केले. यावेळी प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### बार्शी पोलीस स्टेशन येथील बेवारस वाहनाचा आज जाहीर लिलाव

**बार्शी, दि.२१ मे-**

बार्शी शहर व तालुक्यातील नागरिकांना कळविण्यात येते की, बार्शी शहर पोलीस ठाणे आवारात अनेक वर्षापासुन बेवारस वाहन जमा करण्यात आले आहे. त्याबाबत सदर वाहनाची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. बार्शी शहर पोलीस ठाणे येथील बेवारस मोटासायकल, टोरिक्षा, बारचाकी वाहने यांचा जाहीर लिलाव आज दि.२२ मे रोजी सकाळी १० वा. करण्याचे ठरवले आहे. सदरचा लिलाव करुन आलेली रक्कम ही शासनास जमा करण्यात येणार आहे. तरी इच्छुक व्यवसायिकांनी सकाळी ८ वा बार्शी शहर पोलीस ठाणे येथे हजर रहावे. जाहीर लिलावाकरीता इच्छुक व्यावसायिक यांना खालीलप्रमाणे अटी असून सदर व्यक्तीकडे व्यवसायाचा परवाना व जीएसटी नंबर असणे आवश्यक आहे. सदर व्यक्तींची नोंदणी बार्शी शहर पोलीस ठाणे येथे आज रोजी सकाळी ८ ते ९.३० वा. करण्यात येणार आहे. त्यानंतर आलेल्या व्यक्तींना लिलावामध्ये सहभाग घेता येणार नाही. सदर व्यक्तींवर कुठल्याही प्रकाराचा गुन्हा दाखल नसला पाहिजे. गुन्हा दाखल असल्यास निकालाची प्रत सोबत आणावी. लिलावामध्ये सहभाग घेण्यासाठी अनामत रक्कम ५ लाख. एवढी ठेवलेली आहे. अनामत रक्कमेचा डीडी पोलीस निरीक्षक बार्शी शहर पोलीस ठाणे या नावाने घेवुन यावा बेवारस मुददेमालामधील वाहने हे रस्त्यावर वापरता येणार नाहीत. ते सर्व कटींग करुनच पोलीस स्टेशन येथुन घेवुन जावे लागतील, अशी माहिती माध्यमाकडे बार्शी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी दिली.

### गोरक्ष लोखंडे यांचा शुक्रवारी सोलापूर जिल्हा दौरा

**सोलापूर दि.२१ मे-**

राज्याचे अनुसुचित जाती जमाती आयोगाचे सदस्य (सचिव दर्जा) गोरक्ष लोखंडे हे शुक्रवार, दि.२३ मे २०२५ रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून, त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे. पुणे येथून मोटारीने सकाळी ०९.०० वा.सोलापूर शासकीय विश्राम गृह येथे आगमन. सकाळी १०.०० वा. शासकीय विश्रामगृह येथे पोलीस अधिक्षक सोलापूर यांचे सोबत जिल्ह्यातील अॅट्रोसिटी प्रकरणात घडलेल्या गुन्ह्याबाबत आढावा. सकाळी ११.०० वा. मुख्याधिकारी पंढरपूर नगरपरिषद, लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार नोकरी बाबत कर्मचारी यांचे निवेदने व त्यावरील कार्यवाहीबाबत आढावा बैठक. दुपारी १२.०० वा. मुख्याधिकारी सांगोला नगरपरिषद येथील लाडपागे समितीच्या शिफारशी नुसार नोकरीबाबत कर्मचारी यांचे निवेदने व त्यावरील कार्यवाहीबाबत आढावा बैठक. दुपारी ०१.०० वा. मुख्याधिकारी अनगर नगरपरिषद, लाडपागे समितीच्या शिफारशी नुसार नोकरीबाबत कर्मचारी यांचे निवेदने व त्यावरील कार्यवाहीबाबत आढावा बैठक. दुपारी ०२.०० वा. मुख्याधिकारी श्रीपूर नगर परिषद, लाडपागे समितीच्या शिफारशी नुसार, नोकरीबाबत कर्मचारी यांचे निवेदने व त्यावरील कार्यवाहीबाबत आढावा बैठक. दुपारी ०२.०० ते ०२.३० वाजेपर्यंत राखीव. दुपारी ३.०० वा. मुख्याधिकारी वैराग नगरपरिषद, लाडपागे समितीच्या शिफारशी नुसार, नोकरीबाबत कर्मचारी यांचे निवेदने व त्यावरील कार्यवाहीबाबत आढावा बैठक. सायं. ०५.०० वा. मुख्याधिकारी कुर्डुवाडी नगर परिषद, लाड पागे समितीच्या शिफारशी नुसार नोकरीबाबत कर्मचाऱ्यांचे प्राप्त निवेदने व त्यावरील कार्यवाही बाबत आढावा बैठक. व त्यानंतर सोयीनुसार मोटारीने पुण्याकडे प्रयाण करतील.

# धोकादायक पुलावरुन सुरु आहे जीवघेणी वाहतूक

## कोंढारचिंचोली-डिकसळ पुलाचे काम रेंगाळले

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २१ मे -**

सोलापूर पुणे व अहिल्यानगर या तीन जिल्ह्याला जोडणारा उजनी धरणाच्या बॅकवॉटरवरील डिसकळ चा १७० वर्षापुर्वीचा ब्रिटिशकालीन पूल वाहतुकीस धोकादायक बनलेला असताना या पुलावरून करमाळा तालुक्यातील पश्चिम भागातून पुणे जिल्ह्यातील भिगवण कडे मोठ्या प्रमाणात वाहतूक होत आहे. पुलाचे कठडे खिळ खिळे झालेले असून पुलाच्या खालील भागात ठीक ठिकाणी दगड निखळलेले आहेत. या धोकादायक परिस्थितीत सुद्धा या पुलावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी या पुलावरून प्रवास करणे अधिक धोकादायक बनले आहे. स्थानिक नागरिकांनी अनेकवेळा या पुलाच्या दुरुस्तीची मागणी केली आहे, परंतु अद्याप यावर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. पुणे जिल्ह्यातील इंदापूर आणि सोलापूर जिल्ह्यातील करमाळा या दोन तालुक्यांना जोडणारा हा महत्त्वाचा पूल असून, याच्या दुरवस्थेकडे संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज आहे.






### नवीन पुलाचे काम रेंगाळल्याने धोकादायक वाहतूक सुरू

ब्रिटिश कालीन डिकसळ पुलाच्या कामाची मुदत ३६ महिन्यांची आहे. काम सुरू होऊन २० महिने उलटले तरी अपेक्षित काम पूर्ण झालेले नाही.उर्वरित १६ महिन्यांचा कालावधी हाती आहे.आतापर्यंत ११ पिलरपैकी एकही पिलर उभा करण्यात आलेला नाही.पावसाचे दिवस तोंडावर आले असल्यामुळे धरणाच्या पाणी पातळीत कधीही वाढ होऊ शकते. परिणामी दिलेल्या मुदतीत काम पूर्ण होणे शक्य दिसत नाही.

पूलाच्या कामास आठवड्यात गती घेतली जाईल. पूलाच्या एकूण ११ पिलर पैकी पावसापर्यंत सद्या ५ पिलर ऊभे केले जाणार आहेत.त्या पिलरवर डिसेंबर नंतर उर्वरीत स्लॅंपचे काम केले जाणार आहे.तसेच डीकसळ गावाकडील ६ पिलरचे काम व भरावाचे काम एप्रिल २०२६ मध्ये केले जाईल.

**- सोपान पाटील, अभियंता.**

धोकादायक ब्रिटिश कालीन डिकसळ पुलावरून वाहतूक करणे धोकादायक असल्याचे फलक दोन्ही बाजूला लावलेले आहेत. प्रवाशांनी आपला जीव धोक्यात घालू नये.सध्या पाणी पातळी कमी झाल्यामुळे कोंढार चिंचोली ते डिकसळ. पुलाचे काम करण्यासाठी संधी आहे.त्यामुळे जास्तीत जास्त यंत्रणा लावून वेगाने काम करावे यासाठी प्रयत्न सुरू असून सार्वजनिक बांधकाम विभागा कडून संबधित ठेकेदारास तशा प्रकारच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**- अभिषेक पवार, उपअभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, करमाळा**




# वेळापूर येथे २२ वर्षांनी दहावीतील विद्यार्थी आले एकत्र

## मोहिते-पाटील कनिष्ठ महाविद्यालयात रंगला स्नेहमेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२१ मे-**

दहावीनंतर आपापल्या मार्गाने शिक्षण, नोकरी, अन्न, वस्त्र, निवाऱ्यासाठी देशविदेशात उडून गेलेली सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी पाखरे २२ वर्षांनी पुन्हा एकत्र आली आणि शालेय आठवणीत डुंबून गेली.

वेळापूर येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील कनिष्ठ महाविद्यालयातील सन २००३ च्या दहावीच्या बॅचच्या विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा चिंचोली येथील कृषी पर्यटन केंद्रात आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यास दहावी नंतर शिक्षण, नोकरीच्या निमित्ताने देशविदेशात गेलेले विद्यार्थी, विद्यार्थिनी हे तब्बल २२ वर्षांनी एकत्र आले होते. गेल्या २२ वर्षात कोणी शिकण्यात, कोणी कामात, कोणी कुटुंबात रमून गेले होते. त्यांच्या शाळेच्या आठवणी फक्त फोटोत, काही व्हॉटसअप ग्रुप्स मध्ये आणि मनात घर करून बसलेल्या गोष्टींमध्येच उरल्या होत्या. पण तब्बल २२ वर्षांनी हे सगळे मित्र मैत्रिणी एकत्र आले. एकाच टेबलावर गप्पा मारल्या, जुन्या किस्स्यांवर मनमुराद हसले आणि काही क्षणांसाठी का होईना पुन्हा शाळकरी वयात हरवून गेले. त्यांच्या शालेय आठवणी ताज्या झाल्या. त्यांचे चेहरे, शरीर थोडे बदलले होते. पण मन अजूनही तेच होते. त्यांच्यासाठी हा स्नेहमेळावा म्हणजे फक्त एक कार्यक्रम नव्हता तर मैत्रीचा पुन्हा एकदा घातलेला घट्ट हात होता. २२ वर्षांनंतरही हे नातं जपले म्हणून प्रत्येकाने एकमेकांचे आभार मानले आणि पुन्हा भेटूच पण आता इतकं अंतर नको असे म्हणत त्यांनी एकमेकांचा निरोप घेतला. या स्नेह मेळाव्यास या विद्यार्थ्यांना दहावीला शिकवणारे शिक्षक दत्तात्रय माने देशमुख, शहाजी दुधकर, मुकुंद एकतपुरे, श्रीमती नवले, रामचंद्र लोंढे, दत्ता साळुंखे हे उपस्थित झाले होते. त्यांचा सन्मानचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. या विद्यार्थी स्नेह मेळाव्याचे आयोजन दादा जाधव, सचिन पांढरे, अवधूत भिसे, विवेकानंद भगत, आनंद देशपांडे, शिवप्रसाद शेटे, निशांत लोंढे, गजानन सावंत आणि मारुती मोरे यांनी केले.

# घरपट्टी, पाणीपट्टीवरील दंड व्याजासाठी अभय योजना

## सोपल यांच्या तारांकित प्रश्नानंतर शासन निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२१ मे-**

नगरपरिषद, नगरपंचायत, औद्योगिक नागरी क्षेत्रातील मालमत्ताच्या थकीत करावर आकरण्यात येणारे दोन टक्के मासिक दंड व्याजबाबत आ. दिलीप सोपल यांनी अर्थसंकल्प अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे सरकारचे लक्ष वेधल्यानंतर राज्य सरकारने कॅबिनेट बैठकीत निर्णय घेऊन अभय योजना शासन निर्णय निर्गमित केला आहे.



आ. सोपल यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, राज्यातील नगरपरिषद, नगरपंचायत आणि औद्योगिक नगरीमध्ये थकीत मालमत्ता कर अर्थात घरपट्टी, पाणीपट्टी वर मासिक दोन टक्के व्याज आकारण्यात येत होते. वार्षिक २४ टक्के इतके आवाजवी दंडव्याज आकारणीमुळे नागरिक त्रस्त होते. या पार्श्वभूमीवर अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्न सरकारचे लक्ष वेधले होते. उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांची समक्ष भेट घेऊन या प्रश्नाबाबत चर्चा केली व दंड व्याज माफीसह अभय योजनेची भूमिका स्पष्ट केली होती. हा प्रश्न सभागृहात चर्चेस न आणता सरकारने कॅबिनेटमध्ये निर्णय घेऊन महाराष्ट्रातील नागरिकांना दिलासा दिला होता. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे, असे आ. सोपल यांनी म्हटले आहे. आ. सोपल पुढे म्हणाले, शासन निर्णयाप्रमाणे नगरपरिषद, नगरपंचायती शासन आदेश निघाला त्या दिनांकापर्यतच्या थकबाकीबाबत जिल्हाधिकारी यांना प्रस्ताव सादर करतील. तीन दिवसांत जिल्हाधिकारी यांनी निर्णय घ्यावयाचा आहे. त्यानंतर आयुक्त तथा संचालक यांच्यामार्फत हा प्रस्ताव शासनाकडे जाईल, थकीत मालमत्ता करावरील दंड व्याज माफबाबत अभय योजना लागू करण्याचा निर्णय अभिनंदनीय आहे. मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि संपूर्ण मंत्रिमंडळाचे आभार. कॅबिनेट निर्णयाची अंमलबजावणी तत्काळ सुरू होईल, नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही आ. सोपल यांनी केले आहे.

### चार चाकी वाहनाच्या धडकेत बालिका जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर दि.२१ मे-**

घरासमोर खेळत असताना चार चाकी वाहनाने धडक दिल्याने पाच वर्षाची बालिका जखमी झाली.




हा अपघात दक्षिण सोलापूर तालुक्यातील धोत्री गावात बुधवारी दुपारी एकच्या सुमारास घडला. अंजना सुभाष आडूणगे (वय ५) असे जखमी बालिकेचे नाव आहे. अंजना ही बुधवारी दुपारी एकच्या सुमारास धोत्री गावातील घरासमोर खेळत होती. त्यावेळी तेथून जाणा-या चार चाकी वाहनाने तिला धडक दिली. यात तिच्या उजव्या पायाला मार लागल्याने वडील सुभाष याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# पिलीव येथे महाराजस्व शिबीरात १०५ दाखल्यांचे वाटप

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि.२१ मे -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव मंडलातील कर्मवीर भाऊराव विद्यालय व रमेश खलिपे कनिष्ठ महाविद्यालय पिलीव येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबीरात १०५ दाखल्यांची प्रक्रिया पूर्ण झाली असल्याची माहिती मंडळ अधिकारी विजय एकतपुरे यांनी सांगितले यावेळी पिलीव मंडळातील सर्व ग्राम महसुली अधिकारी, महा-ई-सेवा केंद्र सीएससी केंद्र व गावातील नागरिकांचे सहकार्य मिळाले. या शिबिरात खालील प्रमाणे दाखले प्राप्त झाले... उत्पन्न दाखले - ४०, जात प्रमाणपत्र - १८, डोमिसाईल - २२, नॉन क्रिमीलेअर- ८, ईडब्ल्यूएस व इतर प्रकरणे - १०, सेंट्रल ओबीसी - ३, शेतकरी +४ एकूण - १०५. शिबिर यशस्वीपणे राबवण्यासाठी प्रांताधिकारी श्रीमती विजया पांगारकर, तहसीलदार सुरेश शेजुळ, नायब तहसीलदार अमोल कदम, सिध्दनाथ जावीर यांचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन लाभले. पिलीव मंडळातील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व रमेश खलिपे कनिष्ठ महाविद्यालय पिलीव येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व दाखले शिबिर अभियान आज आयोजित केले होते यावेळी मंडळातील सर्व तलाठी, महा-ई-सेवा केंद्र, सीएससी केंद्र, व गावातील नागरिकांचे सहकार्य मिळाले. यावेळी मंडळ अधिकारी विजय एकतपुरे, तलाठी संकेत खाडे, ज्योत्स्ना लोखंडे, महेश रणखांब, सुशिल तपसे, दिलीप नाईकनवरे, धनराज साळवे, स्वप्निल पाटील, लक्ष्मण करे, सागर मदने, विजय सावंत, भिमराव सावंत, अशोक करांडे, अण्णासाहेब कोपनर उपस्थित होते.



# जलजीवनबाबतचे मोडनिंबमधील ठिय्या आंदोलन मागे

## १५ दिवसांत काम सुरू करण्याचे प्रशासनाचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.२१ मे-**

मोडनिंब (ता. माढा) येथील बहुचर्चित जलजीवन मिशन योजनेच्या रखडलेल्या कामाला गती देण्याच्या मागणीसाठी वेताळ परिवाराच्यावतीने मोडनिंब ग्रामपंचायत कार्यालयासमोर सुरू करण्यात आलेले बेमुदत ठिय्या आंदोलन बुधवार दि. २१ रोजी जलजीवन प्राधिकरणाच्या प्रशासनाने दिलेल्या लेखी आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले.

जलजीवन मिशन अंतर्गत मोडनिंब पाणी पुरवठा योजनेचे मुख्य संतुलन टाकीचे काम येत्या १५ दिवसांत सुरू करण्यात येईल, असे उपविभागीय अभियंता गुणवंत करळे व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सोलापूर) कार्यकारी अभियंता प्रवीण पाटील, उपकार्यकारी अभियंता युनूस चौधरी यांनी चर्चे नंतर स्पष्ट केले. मागील काही महिन्यांपासून ही योजना रखडल्यामुळे मोडनिंबकरांना आठ-आठ दिवस पाण्याच्या प्रतीक्षेत राहावे लागत होते. येवती तलावात मुबलक पाणी असूनही नागरिकांना त्याचा लाभ मिळत नव्हता. या पार्श्वभूमीवर वेताळ परिवाराने १९ मेपासून ठिय्या आंदोलन सुरू केले होते. आंदोलनाच्या दरम्यान मनसेचे जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे, माजी जिल्हा परिषद सदस्य भारत शिंदे, दिपक सुर्वे आदींनी ठामपणे पाण्याच्या कामाची मागणी केली होती. आंदोलनस्थळी जलजीवन प्राधिकरणाचे उपअभियंता गुणवंत करळे, कोष्टी यांनी भेट देत चर्चा केली. दरम्यान, सत्ताधारी गटाचे नेते कैलास तोडकरी, सरपंच प्रतिनिधी राहुल पाटील, उपसरपंच अमित कोळी, ग्रामपंचायत सदस्य बालाजी पाटील, कुरण गिड्डे, संजीव शिंदे, शिवाजी सुर्वे,मनसेचे प्रशांत गिड्डे, अमर ओहोळ, किरण खडके, शाखा अभियंता गुणवंत करळे आणि ग्रामसेवक सुनील कांबळे यांच्यात बैठक झाली. येवती मोडनिंब पाईपलाईनचे काम तातडीने सुरू करावे, सुर्वे प्रांत येथील जलशुद्धीकरण केंद्रात पाणी सोडावे ही सर्व कामे त्वरित सुरू करावीत, अशी मागणी यावेळी करण्यात आली. त्यानंतर मंगळवार(दि.२०) रोजी बार्शीचे उपविभागीय अभियंता गुणवंत कराळे व सोलापूरचे कार्यकारी अभियंता प्रवीण पाटील यांच्या उपस्थितीत बैठक झाली. त्यामध्ये रखडलेल्या योजनेच्या अडचणींवर चर्चा झाली. बुधवारी प्रशासनाने काम सुरू करण्याबाबत लेखी आश्वासन दिले. मुख्य संतुलन टाकीचे (एम.बी.आर.) काम १५ दिवसात सुरू करण्याचे चर्चेअंती ठरल्याचे उप-विभागीय अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उप विभाग बार्शी यांनी निवेदनात म्हटले आहे.



काम सुरू करण्याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने पंधरा दिवसांत काम सुरू करण्याचे लेखी निवेदनाद्वारे आश्वासन दिले आहे. काम सुरू करण्याचा ठोस निर्णय झाल्यामुळे आंदोलन मागे घेतले आहे. सुधारित अंदाजपत्रक, नकाशा, प्लॅन इस्टिमेटची मागणी केली आहे. संबधित विभागाकडून मात्र जर आश्वासन पाळले गेले नाही, तर पुढील लढ्याची रणनीती ठरवली जाईल.

**- प्रकाश गिड्डे, प्रमुख नेते, वेताळ परिवार**

कामास विलंब होण्यामागे काही तांत्रिक व प्रशासकीय कारणं आहेत. परंतु आता सर्व अडथळे दूर करून मुख्य संतुलन टाकीचे काम दिलेल्या नियोजित वेळेत पंधरा दिवसांत सुरू करण्याचे ठरले आहे.

**- गुणवंत करळे, शाखा उपअभियंता, जलजीन प्राधिकरण**

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## शासकीय हमीभाव हरभरा खरेदी ऑनलाईन नांव नोंदणीसाठी मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ मे-**

शासकीय हमीभाव हरभरा खरेदी ऑनलाईन नांव नोंदणी साठी शासनाने ३० जुनपर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्याचा लाभा घेण्याचे आवाहन पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरिष गायकवाड व उपसभापती राजुबापू गावडे यांनी केले आहे.

शासनाचे हमीभाव खरेदी योजने अंतर्गत दि.१५ एप्रिल २०२५ अखेर हरभरा उत्पादक शेतकरी बांधवांनी शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावरती ७/१२ उतारा, हरभरा पिकाची नोंदीसह, आधारकार्ड व बँक पासबुक झेरॉक्स इत्यादी कागदपत्रे जमा करून ऑनलाईन नांव नोंदणी करणेसाठी वरील कालावधी निश्चित केला होता. परंतु शासनाकडे सदर नोंदणी कामी मुदत वाढ मिळावी म्हणून मागणी केलेली होती.

त्यास राज्य शासनाने प्रतिसाद देत दि.३० मे २०२५ पर्यंत सदर खरेदीची ऑनलाईन नांव नोंदणीस मुदत वाढ दिलेली आहे. हरभरा या शेतीमालासाठी शासकीय हमीभाव रू.५६५०/- प्रति क्विंटल इतका आहे. तरी शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावरती हमीभावाने हरभरा विक्री करण्यासाठी पंढरपुर तालुक्यातील शेतकरी बांधवांनी दि.३० मे २०२५ अखेर आपल्या हरभरा या शेतीमालाची ऑनलाईन नांव नोंदणी पंढरपूर तालुका सह. खरेदी विक्री संघ लि., नवी पेठ, पंढरपूर येथे वरील नमूद कागदपत्रासह करावी, ऑनलाईन नांव नोंदणी शिवाय शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावरती हरभरा विक्री करता येणार नाही असेही सभापती गायकवाड, उपसभापती गावडे यांनी दिली.

### महत्वाचे...

## मंद्रूपच्या संतोष भीमराव पाटील महाविद्यालयात आज कॅम्पस भरती

**सोलापूर, दि. २१ मे-**

मंद्रूप येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालय व डॉ. आंबेडकर स्टुडंट यूथ असोसिएशनच्या वतीने गुरुवार, दिनांक २२ मे रोजी सकाळी १० वाजता संतोष पाटील महाविद्यालयात कॅम्पस भरतीचे आयोजन करण्यात आले आहे. देशभरातील ३६ मान्यताप्राप्त कंपन्यांमध्ये नोकरी करण्याची संधी प्राप्त होऊ शकते. कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील पदवीधर किंवा शिकत असणारे मुलाखत देऊ शकतात. १८ ते २३ वयोगटाच्या मुला-मुलींनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. एन. जगताप यांनी केले आहे. कॅम्पस भरतीसाठी येताना शैक्षणिक गुणपत्रकांच्या झेरॉक्स, पॅन कार्ड, आधार कार्ड झेरॉक्स, दहावी बोर्ड सर्टिफिकेट, दोन फोटो घेऊन उपस्थित राहावे. सुमारे १६ हजार रुपयांपासून स्टायफंड मिळेल, दरवर्षी त्यामध्ये वाढ होईल, डिप्लोमा पूर्ण झाल्यानंतर नोकरीची हमी देण्यात आली आहे. तरी पात्र इच्छुकांनी गुरुवारी कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. जगताप यांनी केले आहे.

## इंजिनिअरिंग प्रवेश प्रक्रियेला शिवाजी पॉलिटेक्निकमध्ये सुरुवात

**सांगोला, दि. २१ मे-**

सांगोला, जत, मंगळवेढा, पंढरपूर, माळशिरस, आटपाडी तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थी व पालक यांच्यासाठी दहावी नंतरच्या प्रथम वर्ष डिप्लोमा इंजिनिअरिंगच्या प्रवेश प्रक्रिया संबंधित कागदपत्रे जमविताना येणाऱ्या अडचणी व शंका याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज सांगोला येथे सुविधा केंद्र असून याचा लाभ विद्यार्थी व पालकांनी घ्यावा, असे आवाहन कॉलेज तर्फे करण्यात आले आहे. कॉलेजमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता डिप्लोमा इंजीनियरिंग प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेसाठी सुविधा केंद्र (६४७१) ला मान्यता मिळाली असून मंगळवार दि.२० मे पासून ऑनलाइन प्रवेश अर्ज भरणे, कागदपत्रे पडताळणी व अर्ज निश्चिती या प्रक्रिया सुरू झाल्या आहेत. विद्यार्थ्यांना फक्त दहावीच्या परीक्षेचा आसन क्रमांक टाकून प्रवेश अर्ज भरता येणार आहे. या प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांना जन्म प्रमाणपत्र किंवा रहिवाशी दाखला आवश्यक आहे. विद्यार्थी दि.२० मे ते १६ जून या कालावधीत प्रवेश प्रक्रियेसाठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या संकेतस्थळावरून अर्ज छाननीची योग्य पद्धत निवडून ऑनलाइन नोंदणी करणे, कागदपत्रांच्या स्कॅन छायाप्रती अपलोड करणे तसेच आपल्या प्रवर्गासाठी कागदपत्रांची पडताळणी करून आपला प्रवेश अर्ज निश्चित करू शकतात. दि.१८ जून रोजी मंडळाच्या संकेतस्थळावर तात्पुरत्या गुणवत्ता याद्या प्रदर्शित करण्यात येतील. विद्यार्थी त्यांच्या प्रवेश अर्जात काही त्रुटी असल्यास दि.१९ ते २१ जून यादरम्यान दुरुस्त्या करून घेऊ शकतात. मंडळाच्या संकेतस्थळावर दि.२३ जून रोजी अंतिम गुणवत्ता यादी प्रदर्शित करण्यात येतील.



## श्री विठ्ठल रुक्मिणीच्या चरणी सोन्याचा तुळशीहार अर्पण

**पंढरपूर, दि.२१ मे -**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीस ५ लाख २६ हजार रूपयांच्या किंमतीचा व ६१.४८ ग्रॅम वजनाचा सोने पदकासह तुळशी हार, नागपूर येथील भाविक आशा नवघरे यांनी अर्पण केल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. त्याबद्दल देणगीदारांचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन सन्मान केला. यावेळी देणगीदार यांचे कुटुंब व विभाग प्रमुख राजेंद्र सुभेदार उपस्थित होते.



## सांगोला लायन्स क्लबचा हिरो अवॉर्डने सन्मान

**सांगोला, दि.२१ मे -**

आंतरराष्ट्रीय लायन्स संघटनेने आखून दिलेल्या कार्यक्रमापैकी लायन्स क्लब ऑफ, सांगोला कडून माजी प्रांतपाल प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांचे मार्गदर्शनाखाली समाजाच्या अभ्युदयासाठी घेतलेले विविध कार्यक्रम प्रमाण मानून नाशिक येथे संपन्न झालेल्या ३२३४ बहुप्रांत परिषदेमध्ये सांगोला लायन्स क्लबचा हिरो अवॉर्डने सन्मान झाला. बहुप्रांताचे अध्यक्ष सुनील देसर्डा यांचे शुभहस्ते व बहुप्रांताचे उपाध्यक्ष भोजराज नाईक-निंबाळकर, सचिव बलबिर सिंग यांच्या उपस्थितीत सांगोला लायन्स क्लबचे अध्यक्ष उन्मेश आटपाडीकर यांना सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी कॅबिनेट ऑफिसर प्रा.धनाजी चव्हाण, सांगोला लायन्स क्लबचे सचिव अजिंक्य झपके, सदस्य प्राचार्य अमोल गायकवाड, प्रा.शिवशंकर तटाळे, प्रा.डी.के. पाटील, प्रा.मिलिंद देशमुख उपस्थित होते.

# जिल्ह्यात पूर्वमोसमी कृत्तिका नक्षत्राचा सर्वदूर तुफान पाऊस

### ✔ फळबागांचे थोडे नुकसान पण पिण्याच्या पाण्याची चिंता मिटली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.२१ मे-**

यंदा उन्हाळा कडक असल्याचे जाणवत असतानाच जिल्ह्यात पूर्वमोसमी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने पावसाळा सुरू झाल्याचे चित्र आहे. परंतू मान्सूनच्या आगमनापूर्वीचा हा पूर्वमोसमी पाऊस आहे. साधारण ७ जूननंतर मृग नक्षत्रापासून मोसमी पाऊस सुरू होतो. यंदा मात्र १५ दिवस अगोदरच कृत्तिका नक्षत्रात तुफान पाऊस पडत आहे. गेल्या तीन दिवसापासून जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात कमी अधिक प्रमाणात वादळी वाऱ्यासह या पावसाने तुफान रचल्याने अनेकांचे मोठे नुकसानही झाले आहे. दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, अक्कलकोट, पंढरपूर, सांगोला, करमाळा, मंगळवेढा, बार्शी तालुक्यातील बहुतांश गावात पावसाने हजेरी लावली आहे. खरीपपूर्व मशागत झालेल्या शेतासाठी हा पाऊस उपयुक्त असल्याचे शेतकऱ्यातून बोलले जात आहे.





## अकलूज परिसरात सलग तिसऱ्या दिवशीही पाऊस

**तभा वृत्तसेवा**
**अकलूज, दि.२१ मे-**

अकलुज व परिसरात सलग तिसऱ्या दिवशीही मेघगर्जनेसह मोठ्या पावसाने हजेरी लावली. या अवकाळी पावसाने हवेत गारवा निर्माण झाला असला तरी मोठ्या प्रमाणावर हा हानिकारकच पाऊस असल्याचे शेतकरी वर्गातून बोलले जाते.



काल मंगळवारी सायंकाळी तसेच आज बुधवारी सायंकाळी पाच ते सायंकाळी आठ वाजेपर्यंत जोरदार पावसाने हजेरी लावली. विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुल वर सायंकाळी फिरण्यास आलेल्या नागरिकांची मोठी तारांबळ उडाली. पाऊस हा हा म्हणता मोठा झाला आणि काही मिनिटातच क्रीडा संकुल पाण्याने तुडुंब भरलेले तळे बनले. त्यामुळे नागरिकांना क्रीडा संकुलमध्ये बराच काळ अडकून पडावे लागले. तर कामावरून सुटलेल्या कामगारांचीही मोठी दयनीय अवस्था झाली. नवीन बसस्थानकास एका बाजूला कामानिमित्त खोदकाम केले आहे. ते सुद्धा पूर्ण पाण्याने भरले आहे. पूर्वेकडून आलेल्या मोठ्या पावसाने अनेक सकल भागात पाणी साठले .नेहमीप्रमाणे शिवशंकर बाजार, सदुभाऊ चौक येथे पाणी साठल्याने वाहतुकीस अडचण निम र्ण झाली. जुन्या बसस्थानकामध्येही पाण्याचा डोह साठलेला दिसत आहे. शेतीमध्ये कांदा, आंबा, डाळिंब व उन्हाळी बाजरी यांचे नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांचा कांदा काढणीस आलेला आहे. उन्हाळी बाजरी काढणीस आलेली आहे. उन्हाळी भुईमूग ही काढणीस आलेला आहे. त्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होईल असे शेतकरी वर्गातून बोलले जाते.

मात्र ऊस पिकास या पावसाचा फायदा होणार असून ऊसाची उंची वाढणे व वजन वाढणेस उपयोग निश्चित होईल. या पावसाने जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न थोडाफार मिटेल तसेच खुरटी गवते उगवतील त्याचा फायदा शेळ्या मेंढ्या यांना चरण्यासाठी निश्चित होईल. पुढे लवकरच मान्सून येणार असल्याने शेतकरी वर्ग खरीपाच्या पेरणीची तयारी करत आहे. यावेळेस मका, बाजरी, तूर, सोयाबीन आदि पिकांची पेरणी होईल. त्यामध्ये मका पिकाला प्राधान्य दिले जाईल कारण जनावराचा चारा व पीक दोन्ही मकामधून मिळते.

## सांगोला तालुक्यात घरांची पडझड, एक महिला जखमी



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२१ मे-**

मंगळवार दि.२० मे रोजी वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसात सांगोला तालुक्यात काही घरांची पडझड झाली असून एक महिला जखमी झाली आहे. तसेच काही ठिकाणी वीज व झाड पडून जनावरांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे.

पावसात नराळे येथील शिवाजी साहेबराव भोसले व सुमन साहेबराव भोसले यांचा गट क्र.११०/१ मध्ये वादळ वारे व पावसाने राहते घरावरील पत्रे उडून गेले आहेत. घराची काहीशी पडझड झाली आहे. डिकसळ येथील बापू आनंदा करांडे यांचा गट क्र.३१०/३/अ/२/अ तसेच लक्ष्मण सदाशिव करांडे यांचा गट क्र.३१०/३/अ/२/ब मध्ये वादळ वारे व पावसाने राहते घरावरील कौले उडून गेले आहेत. गोडसेवाडी येथील गोपीनाथ महादेव बनसोडे यांची एक शेळी व एक बोकड यांच्या अंगावर झाड पडून मृत्यू झाला आहे. कडलास, सावंतवाडी येथील अंकुश सुग्रीव सावंत यांच्या गट क्र.२०१/१ मध्ये बांधलेल्या जर्शी गायीचा वीज पडून मृत्यू झाला आहे. पारे येथील समाधान अंकुश माने यांच्या घरासमोरील अंगणातील निलगिरीचे झाड वादळ वारे व पावसाने पडून त्यांची पत्नी रंजना समाधान माने जखमी झाल्या त्यांना उपचारासाठी दक्षता हॉस्पिटल, सांगोला येथे दाखल करण्यात आले आहे.



## पिलीव परीसरात पावसाची दमदार हजेरी

**तभा वृतसेवा**
**पिलीव दि २१ मे -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव व आसपासच्या परिसरात यंदा लवकरच पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. मंगळवार दि २० मे व बुधवार २१ मे रोजी पावसाने सलग दुसऱ्या दिवशी दमदार हजेरी लावली. हवामान खात्याने सांगीतलेल्या अंदाजाप्रमाणे पिलीव व आसपासच्या सर्वच गावात दमदार हजेरी लावली आहे.

मंगळवारी अचानक दुपारी चारच्या सुमारास पावसास सुरुवात झाली यामुळे आठवडा बाजारातील व्यपारी व नागरिकांची मोठी दाणादाण उडवली. यामुळे व्यापारी व शेतकऱ्यांनचे नुकसान झाले. लवकर पाऊस सुरू झाल्यामुळे शेतकरी वर्गातुन समाधान व्यक्त केले जात आहे. दरवर्षी जुन महीन्यात पाऊस पडत नव्हता यामुळे शेतकऱ्यांनचे मोठे नुकसान होते. पण यंदा मे महीन्यातच समाधान कारक पाऊस सुरु झाला आहे. यामुळे शेतकरी ऊस लागवड, बाजरी, मका पेरणीच्या तयारीला लागला आहे. मशागत करुन शेतकरी सध्या पावसा च्या प्रतिक्षेत होता .यामुळे सध्या शेतात असणाऱ्या ऊस, फळबागा, भाजीपाला या पिकांना चांगलाच फायदा होणार आहे. वेळेवर पाऊस सुरु झाल्यामुळे शेतकरी वर्गात सध्या समाधान आहे. यामुळे शेती तसेच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटणार आहे. पिलीवसह, सुळेवाडी, कुसमोड, बचेरी, शिंगोर्णी, काळमवाडी, चांदापुरी, झिंजेवस्ती या पिलीव परीसरातील सर्व गावात सध्या समाधान कारक पाऊस पडत आहे. सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी येथे यंदा पिण्याच्या पाण्याचा भिषण प्रश्न होता याठिकाणी टँकर सुरु आहेत. पण समाधान कारक पावसामुळे सध्या या गावांना दिलासा मिळाला आहे.

## उजनी धरणाचे पाणी व वळवाच्या पावसाने शेतकरी समाधानी

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २१ मे -**

श्रीपूर (ता.माळशिरस) व परिसरात गतवर्षीच्या तुलनेत यावेळी उजनी धरणातील पाण्याचे झालेले नियोजन तसेच मे महिन्यामध्ये पडलेल्या सुमारे ५ इंच (१२५ मिमी) वळवाचे पावसाने शेतकरी वर्ग सुखावला आहे.



उजनी उजवा कालवा ऐन उन्हाळ्यात काठोकाठ भरून वाहत आहे.

गतवर्षीचा विचार करता उजनीच्या पाण्याचे आवर्तन हुकल्याने पर्यायाने बोअर व विहीरांना होणारे पाण्याचे परक्युलेशन बंद झाले. त्याला परिणामी बोअर व विहीरीचे पाणी आटल्याने ऐन उन्ह्याळ्यात पाण्याची टंचाई निर्माण झाली होती. त्यामुळे उजनीच्या पाण्याच्या अवर्तनावर नको तेव्हा पाणी सोडून पाण्याचा उपव्यय झाल्याची टीका झाली होती. यावेळी मात्र उन्हाळी हंगामापूर्वीच शासनाने संबंधित खात्याचे मंत्री तसेच लोकप्रतिनिधींची बैठक घेतली व यामध्ये उजनी धरणातून कालव्यात सलग ८४ दिवस पाणी सोडण्याचा निर्णय झाला. त्यामुळे ऐन उन्ह्याळ्यात मार्च, एप्रील व मे च्या म ध्यापर्यंत उजनी कालवा वाहता राहीला. याचा शेतातील बागायती ऊस व केळी पिकास चांगला फायदा झाला. परक्युलेशन मुळे बोअर व विहीरींचे पाण्याची पातळी चांगली राहण्यास मदत झाली. याबरोबरच भिमा नदीच्या पात्रातही पाणी सोडण्यात आल्याने नदी काठचा भाग ही चांगला ओलिताखाली आला.उजनीच्या पाण्याच्या अवर्तनाबरोबरच वीर धरणाचे पाण्याचे आवर्तनही वेळच्या वेळी सोडण्यात आले. या साऱ्याचा परिणाम यंदा पिण्याच्या पाण्याची तसेच शेतीच्या पाण्याची टंचाई कमी जाणवली. उजनीचे ८४ दिवसाचे आवर्तन संपताच यावेळी वळीवाच्या पावसाने या परिसरात जोरदार हजेरी लावत मे महिन्यात आज पर्यंत ५ इंच म्हणजेच १२५ मि.मि. पावसाची हजेरी लावली. त्यामुळे पावसाळ्याचा माहोलच तयार झाला आहे. वळीवाच्या पावसाबरोबर झालेल्या वादळी वाऱ्यामुळे काही ठीकाणी केळीच्या बागांचे नुकसानही झाले आहे. एकूणच उजनी, वीर धरणातील वेळेत सुटलेली पाण्याची आवर्तने व वळीवाच्या पावसाची जोरदार साथ यामुळे शेतकरी वर्ग सुखावला आहे.

### प्रथमच मे महिन्यात उच्यांकी पाऊस

या परिसराचा विचार करता जूनमध्ये जरी पावसास सुरुवात झाली तरी अपवाद वगळता या भागात साधारण जुलै महिन्यात पावसास सुरुवात होते . तर मे महिन्यातील उन्हामुळे अंगाची लाही लाही होते. यावेळी मात्र मे महिन्यातच ५ इंचापेक्षा जास्त पाऊस पडला असून हा उच्चांक असल्याचे बोलले जाते. बुधवारीही परिसरात पाऊस बसरला आहे.

## भारुडातून संस्कार आणि सशक्तीकरणाचा मार्ग : चंदाताई तिवाडी

### मोडनिंबमध्ये भारुड लोककला प्रशिक्षण शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**मोडनिंब, दि.२१ मे-**

जिजाऊंच्या संस्कारातूनच शिवाजी महाराज घडले. धर्मकारण हे संस्कार तर राजकारण हे शक्तीचे प्रतीक आहे. या दोन्हींच्या एकत्रित असण्यानेच आपण सुरक्षित राहू शकतो असे उद्गार ज्येष्ठ भारूडकार चंदाताई तिवाडी यांनी काढले.

त्या एकवीरा मंच बहुउद्देशीय संस्था पंढरपूर व महालक्ष्मी भजनी मंडळ मोडनिंब आयोजित 'भारुड लोककला प्रशिक्षण' शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. निशिगंधा कोल्हे, ज्येष्ठ नागरिक संघाचे हनुमंत कुंभार, प्रशिक्षिका संध्याताई साखी, सरिता जोशी, उमराव वागज, राम सुतार आदी उपस्थित होते. तिवाडी म्हणाल्या, की आज सुरू असलेले युद्ध आपण पाहतोय. याकरिता आपल्याला योग्य घडवायचे आहेत. एखादा विध्वंसक घरात निर्माण होऊ नये म्हणून संत साहित्यातील संस्कारांची आज नितांत गरज आहे. ज्येष्ठांनी



घरातील बालके संस्कारक्षम घडविली पाहिजेत.भारुडातील रूपकातून समाजातील समस्या समजतात, भारुड समजले की त्यातील अर्थ व गहनता समजते. संत परंपरेत जातपात मानली गेली नाही तर कर्म प्रधानतेस महत्त्व दिले गेले. म्हणूनच सावता महाराजांनी 'कांदा, मुळा, भाजी अवघी विठाई माझी' म्हणत कर्म प्राधान्याला महत्त्व दिले. संत परंपरेतील भारुड साहित्याची समाजाला गरज आहे. ही कला पुढे वाढली पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.भारुड हे भारतीय संस्कृतीला जतन करणारे आहार, आरोग्य, विहार, विचार, आचार जपणारे आहे. रुपकार्थ भारुड सर्वांना रमवणारे मनोरंजनात्मक आहे. या प्रशिक्षण शिबिरातून महिला हा वारसा पुढे चालवतील असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

> ग्रामीण महिलांमध्ये अपार क्षमता आहे. त्यांना योग्य संधी, मार्गदर्शन आणि व्यासपीठ मिळाले तर त्या विविध क्षेत्रांत चमकू शकतात. भारुडासारख्या लोककलेतून त्या आपले विचार, अध्यात्म, अनुभव प्रभावीपणे मांडू शकतात. अशा प्रशिक्षण शिबिरांमुळे महिलांना आत्मविश्वास मिळतो आणि संस्कृतीशी नाळ जोडली जाते
>
> **- डॉ. निशिगंधा कोल्हे, माजी जि. प. अध्यक्षा**